नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)


महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत



अनुक्रमणिका

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचें त्रैमासिक

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

वर्ष २० वें : अंक ४ था

जानेवारी–मार्च १९४८

संपादक

अनुक्रमणिका

— महात्माजींचें निर्याण —

ता. ३० जानेवारी १९४८ रोजीं दिल्लीच्या बिर्लाभवनाच्या आवारांत पिस्तुलाचे तीन बार कडकडले. त्यांनी हिमालयाला तडे गेले, सारा भारत हादरून गेला आणि हिंदुस्थानच्या स्वराज्याचा विधाता व हिमालयतुल्य पाठीराखा कोलमडून पडला. केवळ आपल्या मातृभूमीच्याच नव्हे तर साऱ्या विश्वाच्या उद्धारासाठी अवतरलेल्या महामुनीने "राम" म्हटलें आणि जगांतील बहुसंख्य राष्ट्रांच्या ध्वजांनी माना खाली घातल्या ! ही घोर हिंसा करणाराने काय मिळविलें ?

फोडुनि पणत्या ज्योतितत्त्व कां जाई जगतांतुनी ?

*　　*　　*

अहिंसेच्या अवताराचा बळी घेण्यांत हिंसेला हें प्रासंगिक यश मिळतांच तिने दख्खनमध्ये अनेकांच्या अंतःकरणांत प्रवेश करून भयंकर धुमाकूळ मांडला—माणुसकीला काळिमा आणला ! घडलेले प्रकार, त्याचें निदान आणि त्यांवरील भाष्य ह्या सर्वांवर श्री. वि. स. खांडेकर यांच्या पत्रांतील परिच्छेदाने चांगला प्रकाश पाडला आहे. समाजपुरुषाच्या रोमरोमांत सत्य आणि अहिंसा भिनावी ह्यासाठी महात्माजींनी आमृत्यु तपश्चर्या केली. पण अहिंसेतील 'अ' आपली जागा सोडून सत्याच्याच पाठीमागे लागत असल्याची दृश्यें पाहून त्यांचा आत्मा तळमळून म्हणाला असेल—"हें फळ काय मम तपाला !" त्या आत्म्याला शान्ति मिळावी म्हणून एकच प्रार्थना करावयाची की—

"सबको सन्मति दो भगवान् !"

—संपादक

वैष्णवजन

["वैष्णवजन तो" या महात्माजींच्या आवडत्या भजनाचें रूपांतर]

धन्य जगीं तो वैष्णवजन जो
　दुःख न दे कधि कोणा

वेचुनि कणकण परकल्याणा
　भिरवीना अभिमाना

निर्मल तनमन प्रेमळ वाणी
　भेदभाव नच मानी
न करी निंदा द्वेष कुणाचा
　मित्र गमे जगताचा

दीन जिवांचा जीवनदाता
　जया परस्त्री माता
सत्य अहिंसा ज्याचा बाणा
　लुब्ध न जो धनमाना

जो न बुडे या मायामोहीं
　लोभ कशाचा नाहीं
गातां महिमा हरिनामाचा
　दावी मार्ग सुखाचा

शोकभयें कधि न ढळे शांती
　शोधी मन एकान्तीं
संतपदीं त्या भेटे शरणा
　भगवंताची करुणा

—सी. म. बापट

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका

वर्ष २० वें] जानेवारी-मार्च १९४८ [अंक ४ था

साहित्यिकांस—

“ तुमच्या पत्रांतील चाफळची सर्व हकीगत वाचून फार वाईट वाटलें. मध्यम वर्गांतल्या आपल्यासारख्या माणसांना, चिमणीच्या घरट्याप्रमाणें काडीकाडी जमवून संसार उभा करावा लागतो ! अनेक पिढ्यांच्या अविरत कष्टांनीं उभा राहिलेला असला संसार एका दिवसांत राखरांगोळीला मिळाल्यावर मनुष्य उद्विग्न व विषण्ण न होईल तर काय करील ! तुमच्या मनःस्थितीची मला पूर्ण कल्पना आहे. पण आपण ज्या काळांत राहात आहोत तो कुणालाहि शांति लाभूं देणारा नाहीं हें लक्षांत घेऊन तुम्ही मानसिक विषादाच्या छायेंतून मुक्त होण्याचा प्रयत्न कराल अशी मला खात्री आहे, चीन-जर्मनी मधल्या हकीगती आपण आजपर्यंत वाचीत होतों, कल्पनेनें पहात होतों. आतां त्या प्रत्यक्ष पहाव्या लागणार, अनुभवाव्या लागणार ! गांधीजींच्या मृत्यूनें एक गोष्ट निश्चित झाली ती ही कीं आपलें राजकारण हें सत्ता आणि हिंसा यांच्या छायांनीं आज ना उद्या ग्रासलें जाणार ! तें तसें संपूर्णतः ग्रासलें जाऊं नये, जनतेचा आत्मा सदैव जागा रहावा, या जितक्या सुदैवी तितक्याच दुर्दैवी असलेल्या आपल्या मातृभूमीचें भवितव्य मानवी मूल्यें पायाखालीं तुडविणारांच्या हातांत जाऊ नये म्हणून येती दहा वर्षे तरी प्रामाणिक पुढाऱ्यांना, सच्च्या समाजसेवकांना व जीवनवादी साहित्यिकांना निकराचे प्रयत्न करावे लागतील. त्या साहित्यिकांतले तुम्ही एक आघाडीचे सैनिक आहांत. घडलेल्या घटनांकडे अशा रीतीने आपण पाहायला शिकलों तरच यापुढे आपलीं वैयक्तिक दुःखें हलकीं होण्याचा संभव आहे.

— वि. स. खांडेकर

[महात्माजींच्या वधानंतर सातारा जिल्ह्यांत गुंडगिरीने जी भयंकर जाळपोळ केली तींत कवि यशवन्त (आणि त्यांचे बंधू) यांचें चाफळ येथील घरदार, मालमत्ता, ग्रंथ-संग्रह आणि प्रकाशित ग्रंथांच्या विक्रीच्या प्रतीचे गठ्ठे या सर्वांची राखरांगोळी झाली. ती कळल्यावर श्री. वि. स. खांडेकर यांचेकडून जें पत्र आलें त्यांतील हा परिच्छेद सर्वच साहित्यिकांना चिंतनीय वाटेल या कल्पनेनें इथे उद्धृत करण्यांत आला आहे.—संपादक]

महात्मा गांधींचें
विभूतिमत्त्व व तत्त्वज्ञान

लेखक :
कृ. के. कोल्हटकर

"India has an unbroken tradition of Non-violence from times immemorial. But at no time in her ancient history, as far as I know it has, it had complete non-violence in action pervading the whole land. Never-the-less it is my unshakable belief that her destiny is to deliver that message to mankind. It may take ages to come to fruition. But so far as I can judge no other country will precede her in the fulfilment of that mission." (Harijan, 12 Oct. 1935).

"I cling to India like a child to its mother's breast; because I feel that she gives me spiritual nourishment I need, she has the environment that responds to my highest aspirations." (Young India, 6 April 1921)

* * *

हिंदुस्थानच्या सर्वांगीण जीवनावर झगझगीत पण अत्यंत प्रशांत प्रकाश पाडून सर्व हिंदवासीयांना आपली जीवनयात्रा प्रेम, सेवा, सत्य, अहिंसा इत्यादि सात्त्विक साधनांच्या सहाय्याने सुखावह रीतीने चालविण्याचा मार्ग दाखविणारी महात्माजींची जीवनज्योति मालवली या गोष्टीस महिना लोटून गेला ! दिव्याच्या लखलखीत उजेडांत काम करीत असतां तो दिवा अकस्मात गेला तर डोळ्यांपुढे एकदम अंधेरी येऊन आसपासचें कांही दिसेनासें होतें. महात्माजींच्या आकस्मिक मृत्यूमुळे नुसत्या हिंदुस्थानांतलिच नव्हे तर या पृथ्वीगोलावरील सर्व देशांतील सर्व विचारी माणसांची स्थिति अशीच केविलवाणी झालेली आहे ! दुसऱ्या जागतिक युद्धांत द्रव्याचा, मालमत्तेचा आणि मानवांचा मोठा संहार होऊन युद्ध कसेंबसें संपलें आणि आतां तरी जगांवर शांतता नांदावी म्हणून सर्व राष्ट्रें आपआपली घडी नीट कशी बसवितां येईल याचा आतुरतेने विचार करून नव्या योजनांची मांडामांड नुकतीच कोठें आरंभीत आहेत तोच तिसऱ्या अधिक भयंकर अशा जागतिक युद्धाची दुःस्वप्नें मुत्सद्यांना पडूं लागलीं आहेत ! भौतिक शास्त्रांतील विलक्षण शोध इतक्या झपाट्याने वाढत आहेत की पहिल्या जागतिक युद्धाच्या काळचें युद्धशास्त्र दुसऱ्या युद्धांत कुच कामाचें ठरलें आणि दुसऱ्या युद्धाच्या काळांतील युद्धशास्त्र तिसऱ्या युद्धांत अगदीं निरुपयोगी ठरणार आहे ! दुसऱ्या युद्धाच्या अखेरीस निर्माण झालेला अणुबॉंब म्हणजे पुढील संभवनीय तिसऱ्या जागतिक युद्धाची जणूं नांदीच होय. नव्या नव्या शास्त्रीय शोधांमुळें मालमत्तेचा, वित्ताचा आणि मानवी जीवितांचा किती अत्यल्प काळांत केवढा भयंकर संहार होऊं शकतो याचें जणूं प्रात्यक्षिकच अणूबॉंबने जगास दाखवून दिलें आणि त्याचबरोबर त्याने हेंहि दाखवून दिलें कीं कोण चांगला, कोण वाईट, कोण सज्जन, कोण दुर्जन, कोण अपराधीं कोण निरपराधी अशासारखा कसलाहि विचार थोडासुद्धा न करतां लहान अर्भकें, निरपराधी स्त्रिया, दुर्बळ म्हातारीकोतारी माणसें आणि दवाखान्यांतून रुग्णशय्येवर विव्हळत पडलेले रोगी अशा सर्वांसह लक्षावधि नागरिकांचा आपल्या राजकीय स्वार्थी-

साठी कांहीं क्षणांत एकदम संहार करण्यास तत्पर असलेलीं राक्षसी मनोवृत्तीचीं माणसें या जगांत अजून जोरावर आहेत ! आणि भावी तिसऱ्या युद्धाची सूत्रें अशा लोकांच्या हातीं आहेत ! भौतिक संपत्ति व बुद्धिमत्ता यांच्या अनुकूलतेमुळे अणुबाँब हें अस्त्र अमेरिका व रशिया हीं दोन राष्ट्रेंच निर्माण करूं शकतात. पण हें निर्माण करण्यास अवाढव्य खर्च व परिश्रम लागत असल्यामुळे या राष्ट्रांतील शास्त्रज्ञ कमी श्रमानें व खर्चानें अणुबाँबपेक्षां शेकडो पटीनी संहारक असे उपाय शोधून काढण्यांत गढून गेलेले आहेत व आज मितीला हीं राष्ट्रें असल्या संहारक साधनांनी सुसज्जहि झालीं आहेत. यामुळे तिसरें महायुद्ध अटळ आहे व तें विषारी द्रव्यें आणि रोगोत्पादक जंतु यांच्या सहाय्यानेच लढलें जाणार असें तज्ज्ञ सांगत आहेत ! अशा या भयंकर परिस्थितीला, आपल्या विभूतिमत्त्वाने, धीरोदात्त चारित्र्याने आणि अत्यंत विशुद्ध आणि लोककल्याणकारी विचारप्रणालीने आळा घालून, मानवी अंतःकरणांतील सद्वृत्तींना जागें करून, त्या संघटित व सामर्थ्यसंपन्न करून, राक्षसी वळणावर गेलेल्या मानवी मनाला सात्त्विक वळणावर आणून, हिंदुस्थानच्याद्वारा पृथ्वीवरील सर्व देशांच्या इतिहासाला सात्त्विक कलाटणी देऊं शकणार अशी एकमेव व्यक्ति म्हणजे महात्मा गांधी हेच होते ! आणि म्हणून त्यांच्या निधनाची वार्ता कानीं पडतांच जगांतील सर्व देशांतील कोटयावधि लोकांचीं अंतःकरणें अत्यंत व्यथित झालीं, त्यांच्या डोळयांतून अविरत अश्रुधारा वाहुं लागल्या आणि एकसमयावच्छेदें करून सर्वांच्या तोंडून पंडित जवाहिरलालजींच्या तोंडून बाहेर पडलेलेंच उद्गार पडले की, The Light has gone out and there is darkness all around.' आम्हांस मार्ग दाखविणारी ज्योति मालवली गेली आणि आमच्या सभोंवार गडद अंधकार झाला आहे !

महात्माजींच्या निधनाने पृथ्वीवरील सर्व देशांतील विचारवंतांना धक्का बसला याचें कारण असें कीं त्यांचे सर्व चरित्र व त्याच्यामागे असलेली तत्त्वज्ञानप्रणाली यांचें स्वरूपच असें आहे कीं त्यांपासून देश–काळ–समय–जाति–धर्म–निरपेक्ष असें मार्गदर्शन सर्व मानवसमाजाला व्हावें. तसेंच पाहिलें तर गेलें सुमारें अर्धशतक सामान्यतः व त्यांतहि अलीकडचा पाव शतकाचा काळ विशेषतः त्यांनी राजकारण प्रामुख्याने केलें. तथापिहि हें राजकारण करीत असतां त्यांनी सर्व मानवजातीला इतक्या विविध प्रकारें मार्गदर्शन केलें आहे कीं मानवी जीवनांतील असें एकहि महत्त्वाचें अंग नाही की ज्यावर महात्माजींनी आपले मौलिक विचार मांडून लोकमताला वळण लावलेलें नाहीं. महात्माजींच्या सर्व आचार–विचारांचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां असें आढळून येतें की त्या त्या वेळीं त्याना राजकारण कीं समाजकारण करायचे होतें म्हणून तें त्यांनीं केलें असें नसून मानवी मनाची सांस्कृतिक पातळी श्रेष्ठ दर्जाला पोचली असतां समाजाचें धारण, पोषण व संवर्धन होण्यासाठीं अत्यंत आवश्यक असलेले असे जे मौलिक व शाश्वत सद्‌गुण त्यांच्या बुद्धींत स्फुरतात त्यांचा अविष्कार दैनंदिन व्यवहारांत कसा करावा व त्यायोगें सामुदायिक मानवीजीवन अधिक उन्नत व अधिक सुखावह कसें करावें हें जनतेस शिकविण्यासाठी तें त्यांनी केलें. उदाहरणार्थ, अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हे पाच यम आपण घेऊं. आपल्या प्राचीन वाङ्मयात या पाचहि यमांचें महत्त्व ठिकठिकाणीं वर्णिलें आहे. पतंजली मुनींनी तर असंप्रज्ञात समाधिद्वारा आत्मसाक्षात्कारार्थ योगाभ्यासास प्रवृत्त होणाऱ्या साधकास हे पाचहि यम, योगाचें अगदीं महत्त्वाचे अंग म्हणून, अनुष्ठेय असल्याचें सांगितलें आहेत. आणि योगशास्त्राचा असा अगदीं कटाक्ष आहे कीं योगाचें दुसरें अंग असलेले शौच, संतोष, तप, स्वाध्याय, व ईश्वरप्रणिधान हे जे

पाच नियम त्यांच्या अनुष्ठानांत आळस किंवा शैथिल्य एक वेळ झालें तरी चालेल पण सत्य, अहिंसादि यमांच्या अनुष्ठानांत केव्हाही आळस किंवा शैथिल्य होता कामा नये. कारण – पतति नियमवान् यमेष्वसक्तः । न तु यमवान् नियमालसोऽवसीदेत् । नियम पाळून यम न पाळणारा साधक पतित होतो. पण यम पाळणाऱ्याकडून नियमानुष्ठानांत आळस झाला तर तो योगभ्रष्ट होत नाही. अशा तऱ्हेने प्राचीन मुनींनी वैयक्तिक आत्मसाक्षात्काराकरितां किंवा आत्मविकासाकरितांच केवळ वरील यम सांगितले असल्यामुळे त्याचें अनुष्ठान त्या व्यक्तीला शुभफलदायी होईल. पण समाजांत अशा व्यक्ति कितीशा असणार ! ''मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ' ' हजारों माणसांत एखादाच माणूस सिद्धीकरितां यत्न करतो ' ही वस्तुस्थितीच आहे. हजारो माणसांत एखाद्या माणसाला आत्मविकासार्थ सत्य–अहिंसादि यम आचरणीय म्हणून सांगितले तर ते व्यक्तिधर्म होतील पण समाजधर्म होऊं शकणार नाहींत. महात्माजींनी समाजाला अशी शिकवण दिली कीं अहिंसादिकांच्या आचरणाने जर व्यक्तीचे जीवन उन्नत होतें तर समाजाने सामुदायीक रीत्या आपल्या दैनंदिन व्यवहारांत जर हे धर्म पाळल तर त्यांचें सामाजिक जीवन अधिक उन्नत व अधिक सुखावह कां होणार नाही ? म्हणजे त्यांनी अहिंसादि व्रतांना व्यक्तीपुरतीच मर्यादा न घालतां ते सामुदायिक धर्म म्हणून समाजाला स्वीकारणीय आहेत ही गोष्ट आपल्या उपदेशाने व आचरणाने सर्वांस पटवून दिली आणि जनतेकडून स्वीकारल्या जाणाऱ्या अनिभव मानव–धर्माचा जणूं पायाच घालून दिला.

महात्माजींच्या या अभिनव उपक्रमाला थोडेंबहुत यश आलें आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गेल्या सत्तावीस वर्षांत निःशस्त्र प्रतिकार, सत्याग्रह, सविनय कायदेभंग इत्यादि नांवाखालीं हिंदवासीयांनी परकया राजसत्तेशी जे अटीतटीचे सामने दिले त्या सर्वांत प्रजापक्षाकडून अहिंसा बहुंशी पाळली गेली म्हणून प्रत्येक चळवळ दडपून टाकण्याची पराकाष्ठा राज्यकर्त्यांनी केली तरी महात्माजींच्या प्रभावी नेतृत्वाखाली प्रजापक्षाचें सामर्थ्य व आत्मविश्वास हीं वाढतच गेलीं ही गोष्ट कोणालाच नाकबूल करतां येणार नाही. इंग्लंडने या देशातील आपली सत्ता आश्चर्यकारक अशा सामोपचाराने सोडली, याला इतर अनेक कारणें असलीं तरी जागा झालेला हिंदुस्थान महात्माजींच्या मार्गदर्शित्वाखाली स्वतंत्र झाल्याशिवाय राहाणार नाही याची मनोमन खात्री इंग्रज राज्यकर्त्यांना पटली हेंहि एक कारण होतें यांत शंका नाहीं. राजकीय क्षेत्रांत अहिंसामय मार्गाने जसें हें यश मिळालें तसेंच सामाजिक क्षेत्रातहि जे अनेक विग्रह काही सामाजिक वैगुण्यामुळे किंवा कांही परकयाच्या कुटिल राजनीतीमुळे निर्माण झाले होते ते देखील शांततेच्या, सामोपचाराच्या, प्रेमाच्या, सेवेच्या, सत्याच्या व अहिंसेच्या मार्गांनी आपण नाहीसे करूं असा विश्वास महात्माजींना वाटत होता व या विग्रहांमुळे उत्पन्न होणारे संघर्ष नाहीसे करण्यासाठी ते कायेने वाचेने व मनाने रात्रंदिवस झटत होते. त्यांच्या उदात्त शिकवणीमुळे हिंदुसमाजांतील अंतर्गत विग्रह इतके सौम्य झाले आहेत की ते आतां थोड्याच काळांत नाहीसे होण्याच्या मार्गांत आहेत असें म्हणण्यास हरकत नाही. हिंदी प्रजेतील महत्त्वाचा एकच विग्रह असा उरला आहे कीं जो मिटविण्याचा प्रयत्न पूर्ण होण्याच्या आधींच महात्माजींची जीवनयात्रा संपली ! हा विग्रह म्हणजे हिंदु व मुसलमान यांच्यांतील जातीय तेढ होय. ही तेढ इंग्रज राज्यकर्त्यांनी आपली सत्ता या देशांत चिरकाल टिकावी म्हणून जाणून बुजून उत्पन्न केली व वाढविली आणि तिचें पर्यवसान अखेरीस हिंदुस्थान दुभंगण्यांत झालें ! ही तेढ नाहीशी करण्याचे महात्माजींचे त्यांच्या विभूतिमत्त्वाला शोभतील असे कांहीं मार्ग होते व ते मार्ग लोकांना पटविण्यासाठी त्यांनी आपल्या आयु-

त्याच्या अखेरच्या काळांत अविश्रांत परिश्रम केले. पण भारतीयांच्या कमनशिबामुळे या परिश्रमांचें चीज होण्यापूर्वीच त्यांची इहलोकची यात्रा संपली !

महात्माजींच्या जीवनाचें, त्यांनीं विविधक्षेत्रांत केलेल्या कामगिरीचें आणि त्या कामगिरीच्यामागें प्रेरकशक्ति म्हणून असलेल्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानाचें साकल्याने निरीक्षण या पुढील कित्येक वर्षांत होत राहील. आज मितीला तें यथावत् होणें शक्य नाही. याचें कारण एकतर असें कीं त्यांच्या आकस्मिक निधनामुळे आपली मनें अगदी गोंधळून गेलीं आहेत. त्याचप्रमाणे ज्या अमानुष प्रकाराने त्यांस मृत्यु आला त्या प्रकारामुळे आपलीं मनें संताप, उद्वेग, दुःख, लज्जा इत्यादि राजस-मनोविकृतीनी भारावलेलीं आहेत. शिवाय त्यांच्या मृत्युमुळे असे अनेक भानगडीचे प्रश्न उत्पन्न झाले आहेत कीं त्यांचे आघात—प्रत्याघात आपल्यास सोसावे लागत आहेत व आणखी कांहीं काळ सोसावे लागणार आहेत. आणि सर्वांत मुख्य कारण असें कीं, महात्माजींच्या आचारांची, विचारांची, भावनांची, श्रध्देची आणि तत्त्वज्ञानाची उंची ज्या अलिप्तपणाने अजमावितां येणें शक्य आहे तो अलिप्तपणा राखून या सगळ्यांचा विचार करणें हें अतिनिकटत्वामुळे आज शक्य नाही. जयरामदासांनी हरिजनमध्यें 'We are too close to the mountain to measure its height असें म्हटलें आहे तें खरेंच आहे. त्यांच्याप्रमाणें आपल्यालाहि असेंच वाटतें कीं 'Remote posterity will correctly assess the true greatness of the soul which has departed so suddenly from this earth' या पृथ्वीतलावरून इतक्या आकस्मिकपणें निघून गेलेल्या या जीवात्म्याच्या खऱ्या थोरवीचें मोजमाप भावी पिढ्याच बिनचूकपणें करूं शकतील !

वरील कारणांमुळे महात्माजींच्या विभूतिमत्त्वाचा व तत्त्वज्ञानाचा आजला साकल्याने विचार होणें शक्य नसलें तरी त्यांच्या विशुद्ध चारित्र्याची छाप आपल्या जीवनावर इतकी पडली आहे कीं आपण त्यांचा विचारच करावयाचा नाही म्हटलें तर तेहि शक्य नाही. पृथ्वीवरील सर्व देशांत आणि त्यातल्या त्यांत आपल्या हिंदुस्थानांत असा एकहि विचारी माणूस सांपडणार नाही कीं ज्यांच्या आचारविचारांवर कळून वा नकळत महात्माजींच्या विभूतिमत्त्वाचा आणि तत्त्वज्ञानाचा थोडासुद्धां परिणाम झालेला नाही ! त्यांची अगदीं निकटवर्ती माणसें तर त्यांच्या जीवनाशीं अत्यंत समरस झालेलीं आहेत. आणि म्हणून आपण स्वतःचें कांहीं वेगळें जीवन जगत नसून महात्माजींचें जीवन जगत आहों व येथून पुढें जगणार आहों अशा भावनेने प्रेरित होऊन ते आपआपली जीवनयात्रा चालवीत आहेत. तसेंच महात्माजींच्या मुखातून किंवा लेखणींतून अखंडपणें स्रवणारें उपदेशामृत ज्या दूरवर्ती सज्जनांनी आपल्या कानांनीं आणि डोळ्यांनी प्राशन करून आपल्या हृदयांत सांटवून ठेविलें आहे त्यांस असें वाटत आहे कीं महात्माजींच्या विशुद्ध विचारांचा हा आपल्याजवळील ठेवा म्हणजे महात्माजींचें आपल्यावरील एक प्रकारचें ऋण होय आणि या ऋणांतून उत्तीर्ण होण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे त्या विचारांच्या आधारें महात्माजींचीं अपूर्ण कार्यें पूर्णतेला नेऊन त्यांचीं उच्च ध्येयें (highest aspirations) प्रत्यक्ष सृष्टींत उतरवून दाखविणें हा होय. वस्तुस्थिति अशी असल्यामुळे महात्माजींच्या आकस्मिक निधनामुळे आपल्यापुढें गाढ अंधार पसरला आहे असें पहिल्या क्षणीं वाटतें न वाटतें तोंच दुसऱ्या क्षणीं असेंहि वाटतें कीं बाहेर जरी गाढ अंधार असला तरी आपल्या हृदयांत महात्माजींनी प्रज्वलित केलेली सात्त्विक विचारांची प्रशांत ज्योत अखंड तेवत असून तिच्या उजेडांत पुढील मार्गक्रमण करून महात्माजींच्या मनःसृष्टींत असलेला आदर्श समाज व त्यांचें रामराज्य प्रत्यक्ष सृष्टींत मूर्त रूपाला आणण्याच्या

कामीं आपण काया-वाचा-मनाने झटून तें मूर्त रूपाला आणूं ! महात्माजींच्या निधनानंतर ध्वनिक्षेपकावर पं. जवाहरलालजींनीं जें पहिलें भाषण केलें त्यावेळीं पहिल्या शोकावेगांत ' 'The light has gone out and there is darkness all around' हें वाक्य त्यांच्या तोंडांतून निघतांच 'No, the light shines and will continue to shine thousands of years hence' असे जे सहजोद्गार बाहेर पडले त्यांचें कारण हेंच होय ! राष्ट्राच्या इतिहासाची घडण त्या राष्ट्रांतील बुद्धिमान्, त्यागी, कार्यकुशल व सुविचारी जनतेच्या कर्तृत्वावर अवलंबून असते. महात्माजींच्या अनुयायांत अशा थोर अधिकारी व्यक्ति हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत असून राजसत्ता त्यांच्या हातीं आलेली आहे. शांतताप्रिय व सुजाण जनता त्यांच्या पाठीशी उभी असून ती राजसत्तेशीं सहकार्य करण्याला सदैव तत्पर आहे. अशा स्थितींत महात्माजींचीं उच्च ध्येयें सत्यसृष्टींत सिद्ध करून दाखविणें सर्वथा शक्य आहे. आणि हें सिद्ध करून दाखविण्याची पात्रता पृथ्वीच्या पाठीवर जर कोठें असेल. तर ती भारतीयांच्या विशुद्ध अस्मितेंत खात्रीने आहे असें आमचा प्राचीन इतिहास सांगत आहे. आपण या इतिहासाचें नीट समीक्षण केलें, आपला मूळचा स्वभाव दैवी संपत्तीने समलंकृत कसा आहे याची नीट ओळख करून घेतली, महात्माजींचे विचार तत्त्वतः दैवी संपत्तीशी सर्वथा सुसंगत कसे आहेत हें नीट समजाऊन घेतलें, त्या विचारांचें यथार्थ आकलन ज्यास होणार नाहीं त्यांच्याशीं संघर्ष किंवा विग्रह उत्पन्न होऊन राष्ट्राचें एकीचें सामर्थ्य कमी होऊं नये म्हणून त्यांचे विचार आचारांत उतरवितांना त्या तात्त्विक विचारांना आवश्यक असलेली व्यवहार्य मुरड घालून जनतेची एकी कायम राखिली, आणि मग महात्माजींच्या उच्च ध्येयांच्या दिशेने निर्धाराच्या कृतीचीं पावलें टाकीत गेलों तर मानवजातीला सत्य-अहिंसा-प्रेम-त्याग-सेवा इत्यादिकांचा संदेश पोंचविण्याच्या कामाला महात्माजींच्या अटकळीप्रमाणे, कित्येक पिढ्यांचा काळ (ages) न लागतां, ती गोष्ट आपण एकच पिढीच्या काळांत म्हणजे पुढील वीस-पंचवीस वर्षांच्या काळांत सिद्ध करून दाखवूं शकूं !

हें करीत असतां महात्माजींचें तत्त्वज्ञान कांहीं लोकांना जें पटत नाहीं, तें कां पटत नाहीं याचाहि विचार करावयास पाहिजे. त्यांच्या एकंदर तत्त्वज्ञानप्रणालीचा सारांश त्यांच्याच शब्दांत सांगतां येण्यासारखा आहे. अमेरिकेंतील एक तत्त्वज्ञ बुद्रुक ड्यूरंट याने जगांतील अनेक विचारवंतांस 'आपला जीवनहेतु काय, आयुष्य कंठण्यास धर्माचें कितपत साहाय्य आपल्यास होतें, आपल्या कर्तृत्वशक्तीला मूलाधार कशाचा आहे म्हणजे कोणत्या ध्येयाच्या बळावर आपण श्रम करता, कोणत्या गोष्टीपासून आपल्यास सुखसमाधानाचा ठेवा मिळतो' इत्यादि प्रकारचे महत्त्वाचे प्रश्न विचारून त्यांचेकडून जीं उत्तरें आलीं तीं त्याने जिज्ञासूंकरितां प्रसिद्ध केलीं. त्यांत महात्माजींनी जीं उत्तरें दिलीं त्यांचा सारांश असा आहे:—" मानवी जीवित हा ईश्वराचाच एक अंश आहे असें मी मानतों. आणि म्हणून मानवी जीवन सुखाचें करूं शकणारीं जीं शाश्वत नैतिक तत्त्वें त्यांचें पालन करणें हाच माझा धर्म मी समजतों. या धर्मापासून मला स्फूर्ति मिळते आणि या धर्माचें आचरण मी आत्मविकासासाठीं करतों. प्राणिमात्राची सेवा करावी आणि त्यांच्या मनांतील तमोगुण व दुष्टावा नाहींसा करावा हें माझें जीवितध्येय होय." महात्माजींनी आपल्या जीवनास आधारभूत असलेलें जें हें तत्त्वज्ञान अगदी थोडक्यांत सांगितलें तें आपल्या धर्मांतील अत्यंत उदात्त शिकवणीस सर्वस्वी धरूनच आहे. सत्य, अहिंसा, प्रेम, सेवा, त्याग, न्याय इत्यादि शाश्वत नीतितत्त्वांच्या आधारावरच वैयक्तिक व सामाजिक जीवन सुखावह होत

असतें. यांचें आचरण करीत असतां कोणाकडून विरोध झाला तर त्यांच्याशी कसलाहि दुष्टावा किंवा वैर न करितां निःशस्त्र प्रतिकार, सविनय कायदेभंग, सत्याग्रह, उपवास इत्यादि शांततेच्या मार्गांनी त्यांच्या मनांत पालट करावा ही त्यांची शिकवण असून या शिकवणीस अनुसरून त्यांनी आपलें आचरण अगदीं तंतोतंत ठेविलें होतें. अशा स्थितींत वास्तविक पाहतां त्यांच्याशीं कोणाचा विरोध येण्याचें कारण नव्हतें. पण ऐतिहासिक घटना मात्र फारच वेगळ्या तऱ्हेने घडून आली आहे. या घटनेच्या कार्यकारणभावाची मीमांसा निर्दोषपणे होण्याला काही काळच लोटावयास पाहिजे हें खरें असलें तरी त्या विषयाचा ढोबळ विचार आजहि करतां येण्यासारखा आहे. महात्माजींचें निधन झालेलें समजतांच त्यांच्या मृत्यूची नैतिक जबाबदारी आपल्यावर पडते असे उद्गार एका मुसलमान पुढाऱ्याने काढल्याचें आपण वर्तमानपत्रांतून वाचलेंच आहे. या उद्गाराच्या मागें असलेला युक्तिवाद सहज समजण्याजोगा आहे. हिंदुस्थान दुभंगणें केव्हांहि इष्ट नव्हतें. मुसलमानांच्या समाधानाकरितांच केवळ राष्ट्रसभेने पाकिस्तानला मान्यता दिली; पण पाकिस्तान मिळताच मुसलमानांनी अमानुष अत्याचार करून हिंदूंना पाकिस्तानांत राहणें अशक्य करून सोडलें. याची प्रतिक्रिया म्हणून हिंदूंचाहि तोल सुटला. अशा तऱ्हेने हिंदुस्थानातील उभा दोन मोठ्या जमातींच्या एकीकरिता महात्माजी गेल्या पाव शतकांत सतत झटले त्यांनी माणुसकी सोडलेली पाहून महात्माजी बेचैन झाले व ते आपल्या शांततेच्या मार्गांनी ही परिस्थिति सुधारण्याच्या प्रयत्नास लागले. त्यांनी पायी प्रवास करून नौखालींतील मुसलमानांच्या हृदयाचा पालट करण्याचे आटोकाट प्रयत्न केले. उपवास करून कलकत्त्यांतील हिंदुमुसलमानांत एकीचें वातावरण निर्माण केलें. तसाच दुसरा उपवास करून दिल्लीचें खवळलेलें स्वरूप शांत केलें व थोडी विश्रांति घेऊन पाकिस्तानांत जाण्याचा त्यांचा विचार होता. ही संधि त्यांस मिळाली असती तर न जाणो महात्माजींच्या आजपर्यंतच्या सेवेने कदाचित् पाकिस्तानवाल्यांच्या हृदयात पालट झाला असता व हिंदु-मुसलमानांच्या समजुतीच्या तडजोडीचे त्यांचे प्रयत्न यशस्वी झाले असते !

महात्माजींचे हे प्रयत्न यशस्वी होण्याला हिंदुस्थानांतील वातावरण शांततेचें आणि सलोख्याचें राहणें अत्यंत आवश्यक होतें. आणि हिंदुस्थानची उज्ज्वल परंपरा आणि हिंदूंचा मूळचा सात्त्विक स्वभाव लक्षांत घेतां तसें घडणें त्यांना सर्वथा शक्य वाटत होतें. हिंदुस्थानविषयीं त्यांस मोठ्या अपेक्षा होत्या व त्या त्यांनीं अनेक प्रसंगीं व्यक्तहि केल्या होत्या. ता. ५ ऑक्टोबर १९४७ च्या हरिजनमध्यें त्यांनीं म्हटलें आहेः—

"If India fails Asia dies. It has been aptly called the nursery of many blended cultures and civilizations. Let India be and remain the hope of all the exploited races of the earth whether in Asia, Africa or in any part of the world."

हिंदुसंस्कृतीविषयीं महात्माजींच्या या अपेक्षा ऐतिहासिक आधारावर प्रतिष्ठित असल्याने पाकिस्थानच्या निर्मितीमुळे हिंदु-मुसलमानांची पराकाष्ठेच्या विकोपास पोचलेली तेढ आपण शांततेच्या व आत्मक्लेशाच्या उपायांनीं शमवूं असा त्यांस विश्वास वाटत होता. ता. ४-१२-४७ च्या हरिजनांत त्यांच्या अपेक्षा स्पष्ट शब्दांत दिल्या आहेत त्या अशा

"He (Mahatmaji) had said that he would not rest until every Hindu and Sikh had returned to his home with safety and honour.

Similarly he wanted to see every Muslim return to his home in the Union. The Hindu and the Sikh houses and lands occupied by the Muslims in Lahore and other places in Pakistan had to be vacated. And that was bound to happen soon if the Hindus and the Sikhs in the Union behaved correctly."

हिंदुस्थानांतील आणि पाकिस्थानांतील निर्वासित लोक सुरक्षितपणें आणि सन्मानपूर्वक आपआपल्या घरीं जाईपर्यंत महात्माजी स्वस्थ बसणार नव्हते. आणि त्यासाठी संघराज्यांतील हिंदु व शीख यांनी योग्य वागणूक ठेवणें आवश्यक होतें. त्यासाठीं प्राणांतिक उपोषणाचा आत्मक्लेशाचा मार्ग महात्माजींनी स्वीकारला आणि हृदयपालटामुळें नसलें तरी त्यांच्याविषयीच्या नितांत प्रेमामुळे दिल्लींतील हिंदूनी व शिखांनी आपल्या सहनशक्तीला आणि संयमाला पराकाष्ठेचा ताण देऊन त्यांना पाहिजे असलेली स्थिति दिल्लींत निर्माण करून दाखविली. महात्माजींना समाधान वाटलें व त्यांनी महिनाभऱ्याने प्रकृति पूर्ववत् होतांच पाकिस्थानांत जाण्याचें ठरविलें. तिकडे जाण्याची संधि त्यांस मिळाली असती तर ' अर्थं वा साधयेत् देहं वा पातयेत् (Do or Die) या वृत्तीचे ते असल्याने एक तर मुसलमानांचा हृदय पालट घडवून आणून हिंदुस्थानच्या उज्ज्वल परंपरेला अधिकच उज्ज्वल करणारें अभूतपूर्व यश त्यानी मिळवून दिलें असतें किंवा त्या प्रयत्नांत त्याचा अंत तरी झाला असता ! पण Man proposes and God disposes या म्हणीप्रमाणें या दोहोंतील कांहीच घडून न येतां निराळाच शोचनीय प्रकार घडला आणि महात्माजींचे मनोरथ त्यांच्या हयातींत सफळ होण्याच्या भाग्ययोगाला ते स्वतः, हिंदी जनता आणि पृथ्वीवरील सर्व सात्त्विक लोक मुकले ! आणि सर्व जनता शोकसागरांत बुडून गेली ! कबीरानी एके ठिकाणीं म्हटलें आहे– ' जेव्हां तूं पैदा झालास तेव्हां जग हंसत होतें व तूं रडत होतास ! आतां तूं अशी कृति कर कीं, तूं जेव्हां जाशील तेव्हां तूं हंस आणि जग रडत बसेल ' ! महात्माजींच्या बाबतींत असें अगदीं अक्षरशः घडलें आहे. अखेरीच्या क्षणीं त्यांच्या तोंडीं 'राम, राम' असें देवाचें नांव आणि हृदयांत शत्रुत्व करणाऱ्यांविषयीं नितांत प्रेम व क्षमावृत्ति अशा स्थितींत त्यांचें देहावसान झालें आणि सर्व जगभर दुःखाची लाट उसळली !

पण आतां नुसतें शोक व दुःख करीत बसून चालणार नाही. आपल्या बाह्य शत्रूंशी व आंतर शत्रूंशी झगडून देशांत रामराज्य निर्माण करण्याचें महनीय कार्य आपल्यास अद्यापि करावयाचें आहे. त्यासाठीं महात्माजींचें विभूतिमत्त्व आणि तत्त्वज्ञान सतत डोळ्यांपुढें बाळगून पुढील मार्ग आक्रमण करतांना बाबू राजेंद्रप्रसाद यांच्याच शब्दांत आपण आपल्या शोकविव्हल मनाची अशी समजूत करूं कीं:—

"Mahatmaji is no more in flesh and blood to speak to us, to encourage us, to guide us. But did he not tell us often that the body is mortal and transient, that the Atma alone is immortal and imperishable ! May be that his Spirit, freed from the limitations of body, will work all the more freely and create instruments to complete and fulfil what remains unaccomplished."

मराठींतील लिपिसुधारणांचा संक्षिप्त विचार

ले० श्री. गोविंद कृष्ण मोडक

आपली मराठी लिपि म्हणजे प्रायः देवनागरीच होय. देवनागरी ही आपल्या पूर्वजांची लिपि असून ती लिखित वेदादि वाङ्मयांत दिसून येते. आपण ती लिपि अत्यंत शुद्ध मानितों व तशी ती आहेही. मराठी लिपि तिचीच प्रतिकृति असली तरी तिच्यांत कांहीं वैगुण्यें उद्भवलीं आहेत. आपल्या पूर्वजांचा अनार्यप्रभृति इतर लोकांशीं संसर्ग आल्यानें आपल्या उच्चारांत कांही बदल झाले किंवा आपल्यांत नवीन उच्चार आले. या बदललेल्या किंवा नवीन उच्चारांची लेखनव्यवस्था अर्थातच देवनागरींत असणें शक्य नाहीं. तेव्हां या नवीन उच्चारांची व्यवस्था आपणांसच केली पाहिजे.

१. **लांबट अ**– 'तुला कसें वाटतें ?' या वाक्यांत सें–चा संस्कृत उच्चार मराठींमध्यें, निदान बोलींत तरी, बदलला आहे. यांतील स्वरोच्चार **लांबट अ**– सारखा म्हणजे संस्कृताहून निराळा ऐकूं येतो. तसेंच यांतील नस्योच्चारही अनुस्वार व अनुनासिक यांहून दुर्बल ऐकूं येतो. हा नस्योच्चार **नामधारीच** होय. अशा रीतीनें लांबट अ आणि नामधारी नस्य हे दोन उच्चार मराठींत नवीन आले आहेत. हे दोन आणि इतर तीन नवीन अशा पांच उच्चारांची लेखनांत व्यवस्था कशी करावी, याचा विचार येथें करीत आहें.

२. हें 'असें आईनें सांगितलेलें मुलाचें सगळें म्हणणें तिकडे कोठें खरें वाटलें असतें !'

या वाक्यांत १२ शब्द आहेत. प्रत्येकाच्या अंतीं ए हा स्वर आहे; मात्र हा प्रायः तीनच ठिकाणीं यथास्थित ऐकूं येतो. इतरत्र त्याचा लांबट–अ–सदृश उच्चार होतो. हे सर्व शेष ९ शब्द न. लिंगी नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियाविशेषण किंवा क्रियापद असे आहेत. हा येथील भिन्न स्वरोच्चार म्हणजे **लांबट अ उलट्या मात्रेनें** दर्शवावा, असें मी सुचवितों. जसें–

'तुला कस वाटत !'

या सोईनें लेखन भेददर्शक झाल्यानें यथोच्चारही होईल. यावर कोणी म्हणेल,–

'लांबट अ निराळा न दर्शविल्यास काय बिघडेल !' **उत्तर**– मराठींतील (१) अन्त्य लांबट अ अलीकडे नुसत्या अ–नेच दर्शवितात; आणि (२) मराठीच्या वर्तमान स्वभावानुसार अन्त्य अ प्रायः अश्रुत असतो. 'लवकर, येईन, गरूड' इत्यादि शब्दांतील अन्त्य अ–कार आपण दर्शवितों, पण तो उच्चारीत नाहीं. या दोन गोष्टींमुळे वरील वाक्य 'तुला कस वाटत !' असें लिहिलें जाईल; आणि 'तुला कस् वाटत् !' असें वाचलें जाईल. हें प्राप्त होणारें वाचन अर्थात् इष्ट नाहीं. येथें सुचविलेली उलटी मात्रा योजिल्यास हें अनिष्ट टळेल.

३. अ– ची बाराखडी

क् इत्यादि व्यंजनांची बाराखडी क या एकाच व्यंजनाकारापासून निरनिराळ्या संस्कारांनीं बनते. तींत सर्वथा नवीन असें अक्षर मुळींच येत नाहीं. यामुळें एका बारा-

खडीची मोडणी कळली म्हणजे सर्वच बाराखड्या साध्य होतात. तशी स्थिति अ, आ, इ, ई इत्यादि स्वरपंक्तीची नाहीं. या बारा किंवा (अं अः सोडिल्यास) दहा स्वरांत चारच ठिकाणीं अ आढळतो. इतर सहांचे आकार स्वतंत्र आहेत. यामुळें जर व्यंजनांची बाराखडी एक व्यंजन कळल्यानें हस्तगत होते, तर या स्वरांच्या बाराखडीसाठीं (अथवा दहाखडी-साठीं) सात अक्षरें शिकावीं लागतात. हा सातपट प्रयास अ– ची बाराखडी व्यंजनांच्या धर्तीवर लिहिल्यास टळेल. करितां ही स्वरपंक्ति अ आ अि अी अु अू अे अै ओ औ अशी लिहावी. यास परंपरेचा आधार—

परंपरेचा प्रवाह आपण सुचविलेल्या स्वरपंक्तीच्या लेखनास सर्वस्वीं अनुकूलच आहे. पुरातन कालीं ॐ असा एकच आकार आपण नियमानें लिहीत होतों. मध्यकालीं ज्ञाने-श्वरींत ॐ आणि ओ असे दोन्ही आकार सरमिसळ सांपडतात. वर्तमानकालीं प्रायः ओ असाच आकार सार्वत्रिक आहे. यांत प्रस्तुत स्वराचा स्वतंत्र आकार आरंभीं नित्य, पुढें वैक-ल्पिक आणि सांप्रत नष्ट झालेला आढळतो. यावरून स्वतंत्र आकार नष्ट करण्याकडेच परंपरेचा ओघ स्पष्ट दिसून येतो. आतां आपणांस परंपरा ही केव्हांही प्रियच असणार. तेव्हां वरील परंपरेचा ओघ लक्षांत आणून ओ-प्रमाणें इतरही स्वरांचे स्वतंत्र आकार टाकून इतर बाराखड्यांच्या धर्तीनुसार प्राप्त होणारे आकार स्वीकारणें आपलें कर्तव्यच ठरतें. एतदनुसार अ-ची बाराखडी लिहिण्यांत सोय आहेच. ओ–चा सांप्रतचा स्वतंत्र आकार दीर्घकाल आपल्या प्रचारांतही आहेच. तोच प्रकार औ–चा. या दोन स्वरांच्या को, कौ यांच्या धर्तीवरील लेखनाला एवढ्या दीर्घतम कालांत आक्षेप आल्याचें ऐकिवांत नाहीं. यावरून या लेखनाची शास्त्रीयताही अनुमित होते. सारांश– शास्त्र, परंपरा आणि सोय यांवर आधारलेली ही अ– ची बाराखडी विद्वानांनी स्वीकारण्यास योग्य दिसते.

४. च – वर्गाचे द्विविध उच्चार—

'चमचा चहांत पडला.' या वाक्यांत च – वर्ण तीन ठिकाणीं आहे; आणि त्याचे उच्चार दोन प्रकारचे होतात. एकाच्या ठिकाणीं दुसरा ऐकूं आल्यास तो कानांस बोचतो. या दोन शब्दांतील च अन्योन्यांत आढळणाऱ्या धर्तीवर उच्चारावे, म्हणजे कानाला कसेंसेंच वाटेल. याचा अनुभव कोणासही घेतां येईल. येथील अनिष्ट उच्चार टाळण्यासाठीं वरील वाक्य असें लिहावें—

च़मच़ा चहांत पडला.

यांत संस्कृत उच्चार करावा, असें विशेषतः सांगणें असल्यास च–वर्ग–वर्णांतील गांठ पोकळ काढावी आणि मराठींतच आढळणारा उच्चार विशेषतः सांगणें असल्यास च–वर्ग–वर्णांत खालच्या ठिकाणीं टिंब द्यावें. जसें—च़टणी, उच्छाह, ज़सा, झ़बलें.

५. द्विविध संयोग – यथार्थ व नामधारी––

(क) 'आश्विन वद्यांत नद्यांत कागदाचे दिवे सोडितात.' यांत द्या हें जोडाक्षर दोनदा आलें आहे. वद्यांत मध्यें (१) द्या–च्या पूर्वाक्षराचा उच्चार साघात होतो. आघात म्हणजे खटका. (२) संयोगांतील आद्य घटक द् पूर्वस्वराबरोबर उच्चारिला जातो; व (३) त्यामुळें पूर्वस्वर गुरु होतो. अशा या त्रिविध कारणांमुळें हा द्या यथार्थ संयोग ठरतो.

याचे उलट–नद्यांत–मधील द्या-मुळें मागील स्वराच्या उच्चारांत आघात प्राप्त होत नाहीं. आद्य घटक द् मागील स्वरापासून सुटा उच्चारण्यांत येतो; आणि (३) त्यामुळें मागील स्वरास गुरुत्व येत नाहीं. असा हा संयोग नामधारी होय. येथील संयोगांत अन्तीं य् उच्चार भासतो. य् तालुस्थानापासून निघतो. म्हणून अशा संयोगास आपण तालव्यन्त संयोग म्हणूं.

(ख) प्राणित संयोग–चिन्हाने आणि उन्हाने या दोन्ही शब्दांत न्ह आहे. पहिल्यांत न्ह–च्या पूर्वी चि– ला गुरुत्व आलें आहे, तर दुसऱ्यांत तत्पूर्वी उ लघूच राहिला आहे. या संयोगांच्या अन्तीं ह् हा महाप्राण वर्ण ऐकूं येतो.. म्हणून हे संयोग प्राणित ठरतात.

'नद्यांत' आणि 'उन्हानें' यांतील जोडाक्षरांचे निराघात उच्चार संस्कृतकालीं नव्हते. यामुळे त्यांच्या उच्चारांचा लेख संस्कृतांत नाहीं. अर्थात् तो आपणच योजिला पाहिजे. येथें मी पुढील मार्ग सुचवितों—

(१) आश्विन वद्‌द्यांत नद्यांत दिवे सोडितात.

(२) हें चिन्‌न्ह उ|न्हांत स्पष्ट दिसेल.

यांतील योजना अशी —

यथार्थ संयोगाचा आद्य घटक द्विरुक्त करावा. आणि नामधारी संयोग पूर्वाक्षरापासून उभ्या रेखाछेदानें विभक्त दर्शवावा.

द्विविध नस्योच्चार—'सापाच्या कांतीनें तो फसला' येथें सं० √कम् (प्रेम करणें) + ति = कान्ति (तेज, चमक), आणि सं. √कृत् (कापणें) + ति = कृत्ति > कत्त > कन्त > कांत म्हणजे 'सापानें टाकलेली आपली त्वचा', यांतील भेद पुढीलप्रमाणें दर्शवावा—

पहिला अनुस्वारयुक्त शब्द कान्तीने असा पंचमवर्णयुक्त लिहावा; आणि दुसरा अनुनासिकयुक्त शब्द कांतीने असा पोकळ शून्यानें युक्त दर्शवावा.

निगमन – याप्रमाणें (१) लांबट अ– स्वरोच्चार उलट्या मात्रेनें दर्शवावा. (२) अ इत्यादि स्वरपंक्ति व्यंजन–बाराखडीच्या धर्तीवर लिहावी. (३) आवश्यक असेल तेथें च– वर्गाचा संस्कृत उच्चार वर्णांतील पोकळ गाठीनें सुचवावा, आणि मराठी उच्चार भरीव टिंबाने दर्शवावा. (४) तालव्यन्त आणि प्राणित संयोग, आवश्यक वाटेल तेथें, ते यथार्थ असल्यास आद्य घटकाच्या द्विरुक्तीने, आणि नामधारी असल्यास रेखाछेदानें सुचवावे. (५) स्पष्ट अनुस्वारोच्चार पंचम वर्णाने लिहावा; आणि निभृत, मळमळीत, अनुनासिक पोकळ शून्यानें व्यक्तवावा.

याप्रमाणे मराठींत पदोपदीं आढळणाऱ्या लिपींतील पांच उणिवांचा आविष्कार करून त्यांच्या परिहाराच्या योजना सुचविल्या आहेत. यांचा विचार तज्ञ लोकांनी करावा, अशी आशा करून हा लेख संपवितों.

आनन्दवर्धनाचा ध्वन्यालोक

अनुवादक :
प्रा. पु. ना. वीरकर,
एम्. ए., बी.टी., टी.डी.
(लंडन).

लेखांक तिसरा

ध्वनीचा आत्मा (म्हणजे व्यंग्यार्थ) केव्हां केव्हां वाच्यार्थानंतर क्रमाक्रमाने, स्पष्टपणें प्रतीत होऊं लागतो, तर कित्येकदां तो वाच्यार्थाच्या बरोबरच प्रकट झाल्यासारखा वाटतो. या दुसऱ्या प्रकारांत व्यंग्यार्थाचा बोध होण्याचें काम इतक्या जलद होतें कीं, तो अर्थ प्रगट होण्याचा क्रमच नीटसा समजून येऊं शकत नाही. हाच 'रस'प्रकार होय. अशा काव्यामध्यें रस, भाव[1], रसाभास[2], भावाभास, इत्यादींपैकीं कांही ना कांही प्रधान असतें. वाच्यार्थ व तद्वाचक शब्द, त्या उभयतांचे निरनिराळे अलंकार वगैरे (काव्याचीं) अंगें जेव्हां 'रस-पर' असतात, म्हणजे रसाभिव्यक्ति करणें हेंच जेव्हां त्यांचें मुख्य उद्दिष्ट असतें, तेव्हां तें काव्य 'ध्वनी'च्या प्रांतांत येतें. पण ज्या काव्यांत दुसराच एकादा अर्थ प्रधान असून रस वगैरे[3] त्याचें केवळ अंग म्हणूनच असतात, त्या काव्याला 'रसवदलंकारा'चें[4] उदाहरण मानावें. उदा० कोणी एक भाट राजाची मर्जी संपादन करण्यासाठीं म्हणतोः—

---

१ कवि, वाचक, नट इत्यादींच्या हृदयांत ज्या रसानुकूल भावना असतात, त्यांना 'भाव' असें म्हणतात. काव्यनाटकादिकांच्या द्वारें योग्य परिपोष केलेले जे भाव आस्वादिले जातात, ते रस होत. भाव हे दोन प्रकारचे आहेत. १ स्थायी भाव—म्हणजे ज्या भावना वासनारूपानें जन्मजात, स्वयंसिद्ध असून विभावादिकांनीं परिपुष्ट झाल्या असतां रसावस्थेस पोहोंचतात, त्या. २ व्यभिचारिभाव—म्हणजे स्थायी भावांच्या निर्मितीस, परिपोषास अनुकूल असणारे, क्षणभर उद्भवून जाणारे भाव. उदा० रति हा शृंगाररसाचा स्थायिभाव होय आणि लज्जा इत्यादि मनोविकार हे व्यभिचारी भाव होत.

२ रसांमध्यें किंवा भावांमध्यें कांही अनौचित्य असलें, तर त्यांना अनुक्रमें 'रसाभास' व 'भावाभास' म्हणतात. उदा० कनिष्ठ मानव किंवा मानवेतर प्राणी यांच्या भावनांचें वर्णन.

३ या लेखांत 'रस वगैरे', 'रस इत्यादि' 'रसादि' किंवा 'रस' असा शब्दप्रयोग 'रस, भाव, रसाभास, भावाभास', इ० सर्वांबद्दल केला आहे.

४ जेथें रस गौण असून दुसऱ्या अर्थास प्राधान्य असेल, तेथें 'रसवदलंकार' मानावा. कारण तेथे तो दुसरा अर्थ मुख्य असतो, व रस हा गौण, मुख्य अर्थाची शोभा वाढविणारा असतो. अशा ठिकाणीं खुद्द रसालाच अलंकाराचें स्वरूप प्राप्त होतें. 'रसवदलंकारा'चें एक सोपें उदाहरण पुढीलप्रमाणेंः—'ज्याने समुद्रहि एका आचमनांत प्राशन केला, त्या अगस्त्यास नमस्कार असो' ! येथें 'एका आचमनांत समुद्र प्राशन केला' या वाक्यांत 'अद्भुत रस' आहे. पण अगस्त्याचा मोठेपणा सांगणें, त्याची स्तुति करणें हा जो मुख्य हेतु, त्याचें तो अद्भुतरस अंग आहे.

'आतां तूं वाटेल तेवढा हंसलास, तरी त्यामुळें तुला कांहींहि फायदा होणार नाहीं; कारण आज किती तरी काळाने तूं मला दिसला आहेस. आतां मी तुला पुन्हां माझ्यापासून दूर होऊं देणार नाहीं. हे निष्ठुर रमणा, हें कसलं तुझं प्रवासाचं वेड! कशामुळें तूं माझ्यापासून इतका दुरावला होतास बरं!' (हे राजा) अशा प्रकारचीं वाक्यें स्वप्नामध्यें आपल्या प्रियकराच्या गळ्याला मिठी मारून त्याला उद्देशून म्हणणाऱ्या, तुझ्या शत्रूंच्या स्त्रिया, झोंपेंतून जाग्या होतांच आपला बाहुपाश रिकामाच आहे, म्हणजे प्रियकराविरहित आहे हें कळून येऊन तारस्वराने आक्रोश करतात.

या ठिकाणीं करुण रस आहे; पण तो 'राजाची स्तुति करणें' या मुख्य हेतूचें अंग म्हणून आहे. त्यामुळें हें उदाहरण ध्वनीचें नाही, तर रसवदलंकाराचें होय.

कोणताहि अलंकार 'अलंकार' या संज्ञेस पात्र केव्हां समजावयाचा? तर ज्या वेळीं तो रस, भाव इ० चें प्राधान्य कायम ठेवून त्यांची शोभा वाढवणारा, त्यांना उपकारक म्हणून काव्यांत समाविष्ट केला गेला असेल त्या वेळीं. ज्या काव्यांत रस, भाव इत्यादि मुख्य असतील, तें काव्य 'रसादि अलंकारा'[१]चा विषय होणार नाही. तें 'ध्वनि' काव्य होय, आणि त्यांत असणारे उपमा, रूपक वगैरे त्याचे अलंकार होत. परंतु जेथें दुसरा अर्थ मुख्यत्वेंकरून विवक्षित असेल आणि रस हा केवळ त्यांचें सौंदर्य खुलवणाराच असेल, तेथें (रसालाच अलंकारपण प्राप्त होत असल्याने) 'रसादि अलंकार' आहे असें समजावें. अशा रीतीने 'ध्वनी'चा विषय निराळा, उपमादि अलंकारांचा निराळा आणि 'रसवदलंकारा'चा निराळा.

काव्यांत जेव्हा एकादा रस प्रधान असेल, तेव्हा त्या रसाचे स्वतःचे पोटप्रकार, आणि त्याचीं अंगें असलेल्या अलंकार वगैरेंचे निरनिराळे प्रकार असे लक्षांत घेऊन रस-ध्वनीचे प्रकार करूं गेल्यास ते असंख्यच होतील. उदा० शृंगारच घेतला, तर त्याचे संभोग आणि विप्रलम्भ[२] असे दोन प्रकार आहेत. त्या प्रत्येकाचे विभाव, अनुभाव, व्यभिचारिभाव यांना अनुसरून होणारे पोटप्रकार, त्यांत पुनः देशकाल इत्यादींमुळें उत्पन्न होणारी नानाविधता— अशा रीतीने रसाचे स्वतःमुळेंच होणारे प्रकार अगणित आहेत, मग त्याच्या अंगांचेहि भेद मोजूं लागल्यास काय सांगावें! अशा एकंदर प्रकारांना अर्थात् मर्यादाच राहाणार नाही.

तथापि या ठिकाणीं आम्ही थोडेंसें दिग्दर्शन मात्र करितों, म्हणजे तेणेंकरून जाणत्या रसिकांची बुद्धि, सगळ्याच प्रकारांची यथार्थ कल्पना करावयास समर्थ होईल.

शृंगार हा रस ज्या वेळीं प्रधान म्हणजे अंगी म्हणून व्यक्त करावयाचा असेल, त्या वेळीं त्याच्या कोणत्याहि प्रकारांत अनुप्रास हा उपकारक (म्हणजे शृंगारनिर्मितीस अनुकूल) होऊं शकत नाही; कारण त्या ठिकाणीं तोच तो वर्ण पुनःपुनः उपयोगांत आणण्याकडेच लक्ष गुंतवावें लागतें; त्यासाठींच सारखा प्रयत्न करीत रहावें लागतें.

'ध्वनी'चा आत्मा असणाऱ्या शृंगारामध्यें, आणि त्यांतल्या त्यांतहि विप्रलंभ शृंगाराचे वेळीं 'यमकादि' अलंकार समाविष्ट करणें, हें कवीमध्यें तशी ताकद असली तरी

---

१ 'रसवदलंकार' आणि 'रसादि अलंकार' हीं दोन्ही नांवें एकाच अर्थाचीं आहेत.

२ प्रेमी जीव ज्यावेळीं विरहावस्था अनुभवीत असतील, त्यावेळच्या त्यांच्या भावनांचें वर्णन हें विप्रलंभ शृंगारांत येतें. अर्थात् तीं दोघें एकमेकांसन्निध असूनहि जर त्यांच्या मनांत ईर्ष्यादि भावना असतील, तर तो 'ईर्ष्या विप्रलंभा'चा विषय होईल.

चुकीचेंच होय. अर्थात् काकतालीय न्यायानें एकाद्या ठिकाणीं यमकासारखा अलंकार सहजासहजीं निष्पन्न झाला, तर गोष्ट वेगळी. परंतु मुद्दाम आणि मोठ्या प्रमाणावर अशा अलंकारांची रचना करूं नये, हा भावार्थ.

रस निर्माण करण्याकडेच कवीचें सारें लक्ष लागलें असतांना जो अलंकार आपोआप, सहजासहजीं गुंफला जाईल, ज्यासाठीं वेगळा प्रयत्न करावा लागणार नाही, तोच ध्वनीमध्यें खराखुरा ' अलंकार ' मानावा. रसाभिव्यक्तीची इच्छा क्षणभर कां होईना, पण बाजूला पडून अलंकार रचण्याची इच्छा बळावत असेल, तर तो अलंकार थोडाहि रसानुकूल होणार नाही. अशा प्रकारचा वेगळा प्रयत्न अनुप्रास, यमक, कठीण कठीण श्लेष इत्यादि अलंकाराचे बाबतींत करावा लागतो. बाकीच्या अलंकारांचें मात्र तसें नाही. ' आतां अमुक एक अलंकार घालावयाचा ' असा पूर्वसंकल्प न करतांच एकादा अलंकार सहजासहजीं निष्पन्न झाल्यामुळें ती ती कृति तयार झाल्यावर कवीला स्वतःलाच ' मी हें कसें करूं शकलों बुवा ! ' म्हणून आश्चर्य वाटलें, तरी वस्तुतः वर सांगितलेल्या अलंकारांखेरीज इतर अलंकार, प्रतिभावान् कवीच्या सेवेला, तो रस निर्माण करीत असतांनाच आपण होऊन सादर होतात. आणि हें असें घडणें योग्य आणि स्वाभाविकहि आहे, कारण रसनिर्मिति ही विशेष प्रकारच्या वाच्यार्थाच्या द्वारेंच होऊं शकते, आणि असा विशेष प्रकारचा वाच्यार्थ म्हणजेच रूपकादि अलंकार. म्हणून रसाभिव्यक्तीचे कामीं ते रूपकादि अलंकार कक्षेपलीकडचे, म्हणजे निरुपयोगी नाहीत. यमकादि अलंकार मात्र वेगळ्या प्रयत्नानें बनवावे लागत असल्यानें ते रसनिर्मितीच्या दृष्टीनें निरुपयोगी होत. आतां कांहीं काव्यामध्यें रसयुक्त असलेलीं कांही यमकें आपल्या दृष्टीस पडतात, नाही असें नाही. पण तें ध्वनिकाव्य नव्हे. तेथें यमकें मुख्य आणि रस गौण अशी परिस्थिति असते.

रूपकादि अलंकार जर नीट, सारासार विचार करून काव्यांत समाविष्ट केले, तरच ' रसध्वनी 'च्या बाबतींतहि त्यांचें ' अलंकार ' हें नांव सार्थ होतें. पण हा सारासार विचार करावयाचा, म्हणजे काय काय करावयाचें ? तर तें हें :—(१) अलंकार समाविष्ट करावयाचा, तर तो रसाचें प्राधान्य कायम ठेवून, त्याचें अंग म्हणून, म्हणजे त्याला उपकारक म्हणूनच करावयाचा. त्या रसाऐवजीं हा अलंकारच अंगी म्हणजे मुख्य बनेल, अशा रीतीनें नव्हे. (२) अलंकार अगदीं योग्य वेळीं, म्हणजे जरूर तेव्हांच ग्रथित करावयास घ्यावयाचा, आणि योग्य वेळींच, म्हणजे काम होतांच त्याचा प्रपंच आंखडताहि घ्यावयाचा. त्याचा नको असतांना, म्हणजे वाजवीपेक्षां जास्त विस्तार करण्याची इच्छा मनांत आणू नये. (३) आणि जेवढा विस्तार करणें अवश्य आहे तेवढा करितांना देखील तो अलंकार अंग म्हणूनच राहातो आहे ना, तो अंगी तर होऊन बसत नाही ना, याबद्दल नीट खबरदारी घ्यावी. असें केलें म्हणजेच रूपकादि अलंकार रसोपयोगी ठरतात.

रसनिष्पत्ति हेंच मुख्य ध्येय ठेवून अलंकार त्याचें अंग म्हणून कसा उपयोगांत आणावा, याचें उदाहरणः—

शकुन्तलेच्या प्राप्तीची अभिलाषा असलेला दुष्यन्त भ्रमराला[१] म्हणतो:—

---

१. शकुंतला दुष्यन्ताच्या प्रथम दृष्टीस पडते, ती बागेंतील तरुलतांना पाणी घालतांना. तिला पाहिल्याबरोबरच तो तिच्यावर मोहित होतो. त्याच वेळीं पाणी शिंपडल्यामुळें उडालेला एक भ्रमर शकुंतलेच्या तोंडाभोंवतींच घोंटाळत असलेला पाहून दुष्यन्त त्याला उद्देशून स्वतःशीच वरीलप्रमाणें म्हणतो.

‘ चंचल कटाक्ष असलेल्या आणि भीतीने कम्प पावणाऱ्या अशा हिच्या डोळ्यास तूं वारंवार स्पर्श करीत आहेस. हिच्या कानांच्या अगदीं जवळ जाऊन एकादें रहस्य कथन करणाऱ्याप्रमाणें तूं हळूहळू गुणगुणतो आहेस. हातांच्या हालचालीने ही तुला दूर सारीत असतांनाहि तूं प्रीतीचें सारसर्वस्व असलेल्या अशा हिच्या अधराचें पान करीत आहेस. हे मधुकरा, खरी परिस्थिति (म्हणजे ही शकुंतला ब्राह्मण कण्वाचीच मुलगी आहे कीं माझ्यासारख्या क्षत्रियानेहि वरण्याजोगी आहे, हिचें माझ्यावर प्रेम आहे किंवा नाही, इत्यादि) मला अजून माहीत करून घ्यावयाची असल्याने आमचे सारे मनोरथ फुकटच आहेत. तूं मात्र खरोखर धन्य आहेस ! ’

या ठिकाणीं ‘ तूंच माझ्याहून श्रेष्ठ ’ असें म्हटल्याने व्यतिरेक अलंकार स्पष्ट झालेला दिसतो. पण तोच या ठिकाणीं मुख्यत्वें करून विवक्षित नाही, तर साधन म्हणून विवक्षित आहे. शृंगाररस निर्माण करण्यांतच गुंग झालेल्या कालिदासाने मुद्दाम प्रयत्न न करितां सहज गुंफलेल्या या अलंकारामुळे शृंगाररसाचाच अधिक परिपोष होत आहे.

दुसरी खबरदारी घ्यावयाची ती ही, कीं वस्तुतः अलंकार हा रसाचें अंग म्हणूनच समाविष्ट करण्याचें मनांत असून देखील परिणामीं मात्र रसाऐवजीं त्या अलंकारालाच प्राधान्य दिल्यासारखें भासेल असें होऊं देतां कामा नये. अशा प्रकारचा प्रमाद एकादे वेळीं घडतोहि. उदाहरणः—

प्रहार करण्याबद्दल सुदर्शन चक्रास अनुल्लंघनीय अशी केवळ आज्ञा फर्मावूनच विष्णूनें राहूच्या स्त्रियांचा शृंगार आलिंगनादि विलासांविरहित करून टाकला, आणि तो फक्त चुंबनापुरताच उरवला.

या ठिकाणीं “ विष्णूनें राहूचा शिरच्छेद केला ” ही घटना ज्या प्रकाराने वर्णिली आहे त्या प्रकारांतील चमत्कृतीवरच, म्हणजे पर्यायोक्त[1] अलंकारावरच वाचकाचें मन इतकें खिळून रहातें, कीं विष्णूची स्तुति करणें हा जो कवीला मुख्यत्वेंकरून विवक्षित असलेला हेतु, तो त्याच्या दृष्टीआड होतो. अशा रीतीने येथे रसाऐवजी अलंकारच प्रधान होऊन बसला आहे.

अलंकार अगदीं योग्य वेळीं, म्हणजे आवश्यक तेव्हांच ग्रथित करावयास घेतल्याचें उदाहरणः—

‘ जीवर कळ्या अगदीं दाटीने उगवल्या आहेत, (दुसरा अर्थ—वल्लभाच्या भेटीसाठीं जी उत्कंठित झाली आहे), जी अतिशय गौरवर्ण आहे, जी नुकतीच फुलूं लागली आहे (दुसरा अर्थ–मदनविकाराच्या उद्भवामुळें जिचीं गात्रें आळसावलीं आहेत), वसंत वाऱ्याच्या एकसारख्या वाहणाऱ्या झुळुकींनी (दुसरा अर्थ–जी मदन नांवाच्या वृक्षानें युक्त आहे), म्हणजे एकंदरींत जी जणूं एखाद्या स्त्रीप्रमाणेंच आहे, अशा या वेलीकडे मी फार वेळ बघत राहिल्यास वासवदत्तेचें मुख खात्रीने क्रोधानें लाल होईल. ’

---

१ एकादी घटना सरळसरळ म्हणजे तद्वाचक शब्दांनी न सांगतां निराळ्या प्रकाराने सुचवणें, याला पर्यायोक्त अलंकार म्हणतात. उदा० ‘ विष्णूनें राहूचा शिरच्छेद केला ’ ही गोष्ट वरील उदाहरणांत निराळ्या प्रकारानें सुचवली आहे. अर्थात् हा ध्वनीचा प्रकार नव्हे, कारण सूचित घटनेपेक्षां येथे सांगण्याचा प्रकारच, म्हणजे वाच्यच अधिक चमत्कृतिपूर्ण असतें.

हा श्लोक म्हणजे पुढें उत्पन्न होणारा जो ईर्ष्या विप्रलम्भ शृंगार, त्याची पूर्वसूचना आहे. नायक उदयन राजानें वेलीकडे पाहिल्याने राणी वासवदत्ता क्रुद्ध[1] होण्याचें काय कारण? असा प्रश्न वाचकांच्या मनांत उद्भवूं नये म्हणून वेलीला स्त्रीची उपमा देणें जरूरीचें होय. आणि ती उपमा समर्पक ठरण्यासाठीं द्व्यर्थी शब्दांची योजना म्हणजे श्लेषालंकारहि अवश्य पाहिजे. म्हणून भावी ईर्ष्या विप्रलंभाला वरील उपमा उपकारकच असल्याने उपमेला आवश्यक म्हणून, म्हणजे अगदीं जरूर त्यावेळींच कवीने श्लेषालंकार हातीं घेतला आहे.

पण अलंकार नुसता वेळेवर घेतल्यानेच सर्व संपत नाही. रसास अनुकूल असलेल्या दुसऱ्या अलंकाराची जरूर पडतांच, म्हणजे अगदीं योग्य वेळींच पहिल्या अलंकाराचा त्यागहि करावयास पाहिजे. उदा०

एक विरही मनुष्य अशोक वृक्षाला उद्देशून म्हणतोः--

नव्या पल्लवांमुळें तूं, तर प्रियेच्या स्तुत्य गुणांमुळें मीहि रक्त (१ तांबुस, २ अनुरक्त) आहे. हे मित्रा, तुझ्याकडे पुष्पावरून उडालेले शिलीमुख म्ह० भ्रमर येतात, तर मजकडेहि फुलापासूनच म्हणजे मदनाच्या धनुष्यापासून सुटलेले शिलीमुख, म्हणजे बाण येतात. कान्तेच्या पायांचा[2] प्रहार जसा तुला तशीच कान्तेच्या पावलांची चाहूल मलाहि प्रसन्न करिते. हे अशोका, आपलं सगळया बाबतींत साम्य आहे. फरक इतकाच, कीं विधात्याने मलाच तेवढे ' स-शोक ' निर्मिलें आहे.

या ठिकाणीं, बोलणारा हा विरही असल्याने आपल्या मनांतील व्यथा व्यक्त करणें हा त्याचा मुख्य हेतु आहे. पहिल्या तीन चरणांत चालू असलेला श्लेष अत्यंत रम्य वाटतो, पण अन्तःकरणांतील दुःख सूचित करण्यासाठीं ' व्यतिरेक ' अलंकाराची (तूं अ-शोक आहेस आणि मी मात्र स-शोक, तुझ्याहून अधिक दुर्दैवी आहे) जरूर असल्याने तो अलंकार गुंफण्याची वेळ येतांच कवीनें केलेला श्लेषालंकाराचा त्याग विप्रलंभ शृंगाररसाच्या परिपोषास फारच मदत करीत आहे.

अलंकाराचा वाजवीपेक्षा जास्त विस्तार करीत बसूं नये हें तर खरेंच, पण एकादे वेळीं अलंकाराचा थोडाफार विस्तार करणें रसपरिपोषास इष्ट असलें, तरीहि तो करितांना कवीने त्या अलंकाराचें ' अंगत्व ' प्रयत्नपूर्वक कायम राखलें पाहिजे. उदा०

हे भीरु[3] कान्ते, प्रियंगुलतांच्या ठिकाणीं तुझी देहलता, चकित हरिणीच्या

---

१ वरील श्लोक 'रत्नावली' नाटिकेंत आहे. नाटिकेची नायिका 'रत्नावली' ही प्रथम ' सागरिके 'च्या वेषांत असते. तिच्यावर ' उदयन ' राजाचें प्रेम जडतें, व तें राणी वासवदत्तेस कळून ती अर्थात् त्याच्यावर क्रुद्ध होते. हाच नाटिकेंत उत्पन्न होणारा विप्रलम्भ शृंगार होय. त्याची वरील श्लोक ही केवळ पूर्वसूचना आहे.

२ ' गर्भवती स्त्रीनें लाथ मारिली असतांना अशोक वृक्ष बहरतो ' असा कविसंकेत आहे.

३ मेघदूतांतील विरही यक्षाने आपल्या दूरस्थ प्रियतमेस उद्देशून स्वतःशीं काढलेले हे उद्गार आहेत. ' भीरु ' या विशेषणावर अभिनवगुप्तानें समर्थनादाखल केलेली टीका मोठी बहारीची आहे. ' जो भीरु म्हणजे भित्रा असतो, तो आपलें सर्वस्व एके ठिकाणीं कधींहि ठेवीत नसतो. त्या प्रमाणें तूंहि भीरु असल्याने आपलें सर्व सादृश्य कोठेंहि एके ठिकाणीं ठेवलेलें दिसत नाहीस. '

दृष्टीमध्यें तुझे कटाक्ष, चन्द्रम्यामध्यें तुझ्या मुखाची कान्ति, मयूराच्या पिसाऱ्यामध्यें तुझा केशभार आणि नदीच्या लहरींमध्ये तुझ्या भ्रुकुटींचे विलास पहाण्याचा मी प्रयत्न करितों. पण हाय ! कोणत्याहि एका ठिकाणीं तुझें साम्य एकत्रित झालेलें मात्र मला आढळत नाहीं.

या उदाहरणांत ' उत्प्रेक्षा ' अलंकारास कारणीभूत असलेलें साम्य भरपूर विस्तार करून दाखविलेलें असलें, तरी त्या सादृश्याला प्राधान्य मात्र मुळींच मिळालेलें नाहीं. उलट शेवटच्या ओळीमुळें मुख्य असलेल्या विप्रलंभ शृंगाराच्या परिपोषास तें साम्य (म्हणजे तो उत्प्रेक्षालंकार) मदतच करीत आहे.

अशा रीतीनें वर सांगितल्याप्रमाणें अलंकाराची रचना केल्यास तो अलंकार रस-निष्पत्तीस उपकारक ठरतो. पण वर सांगितलेल्या नियमांचें अतिक्रमण केलें, तर मात्र तो अलंकार रसभंगासच कारणीभूत होतो. आणि याचीं उदाहरणें महाकवींच्या काव्यांतहि पुष्कळ आढळतात. परंतु अशा महाकवींनी हजारों सुंदर सुंदर वाक्यें लिहून आपली श्रेष्ठताच प्रस्थापित केली असल्याने अशा महात्म्यांचे दोष दाखवणें हा परिणामीं आपलाच दोष ठरतो, म्हणून त्यांतलीं सदोष उदाहरणें या ठिकाणीं मुद्दाम काढून दाखविण्याचा प्रयत्न आम्हीं केला नाहीं. परंतु रसाभिव्यक्ति करितांना रूपकादि अलंकार समाविष्ट करण्याबाबत हें जें दिग्दर्शन आम्ही केलें, तदनुसार चालून, आणि आमच्या सांगण्यांत न आलेला असाहि एकादा नियम स्वतःला दिसला, तर तो पाळून सत्कवि जर सावधान चित्ताने ध्वनीचा वर सांगितलेला ' अलक्ष्य–क्रम ' म्हणजे ' रस ' प्रकार निर्माण करील, तर त्याला स्वतःला फार मोठा फायदा होईल.

(अपूर्ण)

पै० महंमदाचीं वचनें

अनुवादक– कुन्दर दिवाण प्रका० ग्रामसेवामण्डळ, वर्धा. मूल्य एक रु.

The sayings of Muhamed by Suhrawardy ह्या पुस्तकाचा हा अनुवाद आहे. "आपल्या धर्माचीं वचनें जशीं आपण अनुकूल बुद्धीनें पाहतो, तशीच दुसऱ्या धर्मांचीहि पाहावी; शक्य तर अधिक अनुकूलतेनें पाहावी आणि उंचांतला उंच भाव लाभेल तो घ्यावा. अशा रीतीनें सारग्रहण केल्यास ह्या मेहनतीचें सार्थक होऊं शकेल " असें जें विनोबा भावे यांनीं प्रस्तावनेंत म्हटलें आहे त्याचेशीं कोणीहि सहमतच होईल.

<u>पुस्तक-परीक्षण</u>

लेखक

केशवसुत

श्री. वि. स. खांडेकर.

प्राध्यापक रा. श्री. जोग यांचा केशवसुतावरला प्रदीर्घ प्रबंध मी प्रथम पाहिला तेव्हां माझ्या मनाला विलक्षण आनंद झाला. ३५० पृष्ठांचें सुंदर छपाईचें केशवसुतांच्यावरलें हें पुस्तक म्हणजे त्यांचें एक प्रकारचें वाङ्मयीन स्मारकच आहे असें मला वाटलें. सर्वच अविस्मरणीय माणसांची जगांत स्मारकें होतात असें नाही. जन्म, लग्न आणि मृत्यू यांच्याप्रमाणे स्मारक हाहि मानवी आयुष्यांतला एक अपघात आहे असें म्हणण्यांत पूर्ण नसलें तरी अर्ध सत्य आहे.

गडकऱ्यांसारख्या प्रतिभावंताला प्रेरक होण्याची पात्रता अंगीं असलेल्या आधुनिक मराठी कविकुलगुरूवर विस्तृत विवेचनात्मक ग्रंथ निर्माण व्हायला त्याच्या मृत्यूनंतर चाळीस वर्षांचा काळ लागावा ही गोष्ट टीकात्मक वाङ्मयाविषयी आपल्यामध्यें वसत असलेल्या उदासीनतेचेंच द्योतक आहे असें म्हणावें लागेल. एखादे निसर्गरमणीय स्थळ पाहून ज्याने त्याने कौतुकाने उद्गार काढावे, तिथल्या एखाद्या वृक्षराजाच्या तळाशी पडलेल्या देवाच्या चिमुकल्या मूर्तीला प्रत्येकाने आदराने वंदन करावें, पण तिथें छोटेसे का होईना मंदिर बांधून त्यांत त्या मूर्तीची स्थापना करण्यांची कामगिरी मात्र कुणाच्याहि हातून होऊं नये, तसें कांहीसें केशवसुतांच्या बाबतींत झालें होतें. हरीभाऊ आपट्यासारखा स्नेही लाभला असूनहीं त्यांचा कवितासंग्रह मृत्यूनंतर एका तपाने प्रसिद्ध झाला. आणि या कवितेचें कन्यादान हरिभाऊंनी केलें तें तरी कसें ! तर अंगावर गुंजभर सुद्धां सोनें न घालतां एखाद्या दरिद्री पालकानें मुलीचें लग्न करावे तसे ! पुढे डॉ. गुणे, प्रि. राजवाडे, रहाळकर, प्रो. लागू वगैरेंनीं केशवसुतांच्या काव्याची यथाशक्ति परीक्षणें केली. पण त्यांत कौतुकाचा, आदराचा, कर्तव्याचा आणि पांडित्याचाच भाग अधिक होता. ही आदराची लाट ओसरताच माधवराव पटवर्धनानी केशवसुत मानले जातात तेवढे मोठे नाहीत हें सिद्ध करण्याचा तर्ककर्कश अट्टाहास केला. 'स्त्रैण न व्हा तर' असा आवेशानें उपदेश करणारा कवि स्त्रैण होता असा माडखोलकरानीं जावई शोध लावला. अशा परिस्थितींत जोगांनीं शक्य तेवढ्या साक्षेपानें आणि समतोलपणानें लिहिलेल्या ह्या प्रबंधाने मराठी टीकावाङ्मयांत फार दिवस जाणवणारी एक उणीव दूर होत आहे याबद्दल केशवसुतांचे असंख्य चाहते त्यांना धन्यवाद देतील.

जोगाचा हा टीकाग्रंथ वाचतां वाचतां अनेक आठवणी माझ्या मनःचक्षूंपुढे तरळूं लागल्या. इंग्रजी तिसरी चौथींत असताना 'काव्यदोहन' या तत्कालीन शालेय काव्यसंग्रहांत केशवसुताची 'तुतारी' ही कविता प्रथम मी वाचली. तिच्यांतल्या 'पूर्वी पासुनि अजुनि सुरासुर। तुंबळ संग्रामाला करिती । संप्रति दानव फार माजती । देवावर झेंडा मिरवीती। देवाच्या मदतीस चला तर। या शेवटच्या कडव्यांत मानवी जीवनांत सत् आणि असत् ह्यांचा जो चिरंतन संग्राम सुरू असतो त्यांचें केशवसुतानीं केलेलें सूचक चित्रण कळण्याचें माझें तें वय नव्हतें. पण या एकाच कवितेमुळे त्यांची विशाल कल्पकता आणि उत्कट ओजस्विता यांची माझ्या बालमनावर छाप पडली. 'प्राप्त काल हा विशाल भूधर। सुंदर लेणीं तयांत खोदा । निजनामें

त्यांवरती नोंदा । ' या ओळी केशवसुतानीं ज्या काळांत लिहिल्या त्या काळाइतक्याच त्या चालू घटकेलाही लागू आहेत. अजून त्याची प्रेरकता रतिमात्रही निःसत्त्व झालेली नाही. ' धार धरलिया प्यार जिवावर । रडोत रडतिल रांडा पोरें । गत शतकाचीं पापें घोरें । क्षाळायाला तुमचीं रुधिरें । पाहिजेत रे, स्त्रैण न व्हा तर । ' या ओळी गेल्या तीन तपांत मी अनेक वेळां वाचल्या आहेत, शिकविल्या आहेत, गुणगुणलों आहे. त्यांच्यातला जिव्हाळा; आर्तता, आवेश आणि विशाल दृष्टिकोन हीं सर्व बाळपणाइतकींच प्रौढपणींहि मला आकर्षक वाटत आली आहेत. कॉलेजांत गेल्यानंतर गडकऱ्यांचा परिचय होण्याची सुसंधि मला मिळाली. केशव-सुताविषयीचें माझें प्रेम गडकऱ्यांच्या सहवासांत जितकें उत्कट तितकेंच डोळस झाले. त्या वेळीं केशवसुतांच्या कविता एकत्रित करण्याचा विचार कुणा धंदेवाईक प्रकाशकाच्या डोक्यांत सुद्धा आला नसावा. पण गडकरी रंगात येऊन केशवसुतांच्या एखाद्या कवितेचें आपल्या सुंदर रसवंतीनें विवरण करूं लागले म्हणजे माझ्या मनाची मोठी तगमग होई. त्या कवितेंत विशेष भव्य, रम्य, किंवा उदात्त असें कांहींतरी आहे हें मला जाणवें. पण अस्फुट-पणानें जाणवणाऱ्या त्या सौंदर्याचें पूर्ण आकलन होण्याकरितां केशवसुतांच्या विविध कवितांचीं पारायणें करण्याचा मार्ग मात्र मला सांपडत नसे. पुढे कांहीं दिवसांनीं गडकऱ्यांनीं स्वतःच्या हस्ताक्षरानें उतरून काढलेल्या केशवसुतांच्या अनेक कविता असलेली एक वही मला मिळाली. त्या वहींतल्या साऱ्या कविता नकलून घेतांना गुप्तधन सांपडल्याचा आनंद मला झाला. त्या वेळीं मराठी काव्यप्रेमी जग मासिक मनोरंजनांतून प्रसिद्ध झालेल्या गडकरी आणि बालकवि यांच्या ' राजहंस, मुरली, फुलराणी, निर्झरास, इत्यादि कवितांच्या मोहिनीने मुग्ध होऊन गेले होते. मीहि त्या कवितांचा परम भक्त होतो. पण साध्या एक्झरसाईज बुकांत उतरून घेतलेल्या केशवसुतांच्या कविता वाचतांना अनेकदां माझ्या मनांत येई, ' गडकरी आणि बालकवि हे चांगले कवि आहेत हें खरें, पण केशवसुत नुसते चांगले कवि नाहींत. ते मोठे कवि आहेत. या महानद्या आहेत. केशवसुत समुद्र आहेत. नदी कितीहि मोठी झाली तरी तिला समुद्राची सर येईल का ? जीवनांतलें आर्तत्व, भव्यत्व, विशालत्व, विविधत्व आणि उदात्तत्व केशवसुतांच्या इतकें कुणाही आधुनिक कवीच्या कवितेंत प्रतिबिंबित झालेलें नाहीं. त्यांच्या काव्यांत बाह्यसौंदर्य कमी असेल; पण अंतःसौंदर्य विपुल आहे यांत शंका नाहीं. सोन्याची खाण पृथ्वीच्या पोटांत असते आणि तिथेंही सोने मातींत मिसळलेलें असतें. त्या सोन्यासारखें केशवसुतांचें कवित्व आहे. चटकन् लोकप्रिय व्हायला लागणारे गुण त्यांच्या काव्यांत कमी असतील. पण त्यांचा पिंड अभिजात कवीचा आहे, अमर साहित्यिकाचा आहे. '

विद्यार्थिदशेंत केशवसुतांच्या कवितेविषयी माझें हें जें मत बनलें तें तीस वर्षांचा काळ लोटून गेला तरी अजूनहि कायम आहे. एखादें रंगविलेलें नवें घर प्रथमदर्शनीं मोठें मोहक दिसतें. पण कांहीं वर्षांनी त्याच्या भिंतींचा रंग उडून गेला आणि वरचीं लाल मंग-लोरी कौलें काळवंडलीं कीं त्याची ती मोहकता नाहींशी होते. प्रसिद्धीबरोबर लोकप्रिय होणाऱ्या वाङ्मयाच्या बाबतींतही हा अनुभव वारंवार येतो. अशा वाङ्मयाचें खरें आयुष्य पहिल्या पांच दहा वर्षांपुरतेंच मर्यादित असतें. सिनेमांतली नटी किंवा शर्यतींतला घोडा यांच्याप्रमाणे अशा वाङ्मयकृतीचा थोडे दिवस फार गाजावाजा होतो आणि मग पुढे त्या विस्मृतीच्या धुक्यात लुप्त होतात. केशवसुतांची कविता या वर्गांतली नाहीं. ती एखाद्याला फारशी आवडणार नाही. पण ज्याला ती आवडते त्याची ती जन्माची जिवलग मैत्रीण होऊन बसते. तिच्यांतली मोहकता आणि दाहकता हे दोन्ही गुण कालांतराने फिके होत नाहींत.

उलट जीवनांतल्या अनुभूतींच्या अभावीं विशीपंचविशींत त्यांच्या ज्या कवितांचें मर्म आपल्याला पूर्णपणें कळलेलें नसतें त्या प्रौढपणीं अधिक हृदयंगम वाटूं लागतात.

आधुनिक काव्याचा प्रणेता म्हणून यथार्थपणें गौरविल्या गेलेल्या अशा या श्रेष्ठ कवीवरला हा प्रबंध वाचायला सुरवात करतांना आपलें मन पूर्वग्रहांपासून सर्वस्वी अलिप्त ठेवण्याची माझी इच्छा मात्र अनेक नियतकालिकांनी सफल होऊं दिली नाहीं. एक आणा टाकला कीं यंत्रांतून जसें फलाटाचें तिकिट मिळतें तशी हल्लींच्या नियतकालिकांतून हुकमेहुकूम परीक्षणें तयार होत असतात. वाङ्मयाशी बरेंच दूरचें नातें असलेले लोकही झटपट रंगारी बनून अशा वेळीं आपलें संपादकीय कर्तव्य पार पाडतात ! या पुस्तकावरलीं असलीं कांहीं परस्पर विरोधी परीक्षणें वाचून माझें मन आरंभीं थोडेसें गोंधळून गेलें. एकाने म्हणावे, प्राथमिक शाळेंतल्या पंतोजींच्या पद्धतीने जोगांनीं केशवसुतांच्या कवितांचा अन्वय आणि अर्थ या पुस्तकांत दिला आहे.' दुसऱ्याने सांगावे, ' या पुस्तकानें मराठी टीकावाङ्मयाची उंची वाढविली आहे !' अशा स्थितींत बिचाऱ्या वाचकाची स्थिति वैद्य आणि डॉक्टर यांच्या तडाक्यांत सांपडलेल्या ताळिरामासारखी होत असली तर त्यांत नवल कसलें ?

पण ' म्हातारा आणि त्याचा बैल ' या गोष्टींतला म्हातारा किंवा बैल होण्याची माझी इच्छा नसल्यामुळे हे सर्व अजब अभिप्राय विसरून जाण्याचा मी शिकस्तीनें प्रयत्न केला आणि जोगांचे पुस्तक वाचून काढलें. टीकाकार या नात्यानें जोगांच्या अंगीं कांहीं विशेष गुण निश्चित आहेत. ते व्यासंगी अभ्यासक आहेत, साक्षेपी संशोधक आहेत, निःपक्षपाती रसिक आहेत. पै न पैचा हिशेब ठेवणाऱ्या एखाद्या सावकाराप्रमाणे केशवसुतांच्या बारीक सारीक गुणदोषांची नोंद त्यांनी मोठ्या कसोशीने केली आहे. इंग्रजी, संस्कृत व मराठी साहित्यशास्त्राचें त्यांनी जें अध्ययन केलें आहे आणि त्यावरून त्यांनीं जे निष्कर्ष काढले आहेत त्यांच्या निकषावर केशवसुतांच्या काव्याचें मूल्यमापन करण्याचा प्रयत्न त्यांनीं प्रामाणिकपणाने केला आहे. प्रेमकाव्य, निसर्गपूजा, गूढगुंजन, सामाजिक तत्त्वज्ञान, अशी कवितांची विभागणी केल्यामुळें आणि प्रत्येक कवितेचे गुणदोष थोडक्यांत सांगायची पद्धत अंगिकारल्यामुळे त्यांच्या लेखनशैलीला मरगळ असें स्वरूप कुठेहि प्राप्त झालेले नाहीं हें खरें ! पण याचें मर्म त्यांच्या मर्यादांतच आहे. सौंदर्याच्या आस्वादाला अगदी मान विसरून रंगून जाण्याचा त्यांचा स्वभावच नाही. त्यांची रसिकता सर्वसामान्य संसारी गृहस्थाची आहे. ती सौंदर्यावरून जीव ओवाळून टाकणाऱ्या कलावंताची नाही. मात्र त्यांच्या टीकालेखनाला चटकदारपणा दुःसाध्य आहे असें मुळीच नाही. 'केशवसुतांचे आक्षेपक' या प्रकरणांत त्यांची लेखनपद्धति थोडी अधिक प्रवाही व आकर्षक झाली आहे असें दिसून येईल. केशवसुतांच्यावर घेण्यांत येणाऱ्या अनेक आक्षेपांचा उल्लेख करून ते म्हणतात, ' यांतील एक विधान सोडून बाकी साऱ्या विधानांत अल्पसंख्य कवितांचा विशेष बहुसंख्य कवितांवर लादला गेला आहे. अल्पसंख्याकांची बहुसंख्यांकांवर होणारी ही कुरघोडी सध्याच्या राजकारणाप्रमाणेंच वाङ्मयकारणांत आली कीं काय अशी शंका येते ! ' केशवसुतांनी कित्येक स्थळीं निसर्ग व कविता याविषयीं उत्कट प्रेम व्यक्त केलें असल्यामुळें त्यांना पत्नी-प्रेमापेक्षां याच गोष्टी अधिक प्रिय होत्या असा आक्षेप घेणाऱ्या वावदूकांना उद्देशून ते उद्गारतात, ' पत्नीप्रेम, काव्यप्रेम आणि निसर्गप्रेम यांत खरोखर विरोध नाहीं. कवि हा मुलांनी आणि पत्नीप्रेमाने भरलेल्या गृहांत राहूनहि कांहीं काळ निसर्गप्रेमामुळें घरांतून बाहेर पडूं शकतो. त्याप्रमाणेंच पत्नीवर प्रेम असूनही तो कवितेवरही प्रेम करूं

शकतो. तिच्यावर स्त्रीचें रूपक केल्यानें लगेच कांहीं द्विमार्यात्वाचा गुन्हा होत नाहीं, किंवा पहिली नावडती होऊन दुसरीकडे लक्ष लागलें असें होत नाही.'

केशवसुतांच्या लहान मोठ्या सर्व कवितांचा जोगांनीं सुबोध व चर्चात्मक परिचय करून देण्याचा या पुस्तकांत प्रयत्न केला असल्यामुळे त्यांच्याशीं अपरिचित किंवा अल्प परिचित असलेल्या वाचकांना तें फार उपयुक्त वाटेल यांत शंका नाहीं. परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या बाबतींतही तें बहुमोल ठरण्याचा संभव आहे. एखाद्या नवख्या गावात जाऊन तिथलीं प्रेक्षणीय स्थळें झटपट पाहायचीं असलीं तर स्टेशनावर भेटणारा मार्गदर्शक जसा आपल्या उपयोगी पडतो, तसें हें पुस्तक केशवसुतांचा सर्वसामान्य वाचकांना स्थूल पण सर्वस्पर्शी परिचय करून देण्याच्या दृष्टीने निःसंशय यशस्वी झालें आहे. पण त्यांच्या या गुणांमुळेंच त्यांत अतिशय मोठीं अशी कांहीं वैगुण्यें राहून गेली आहेत. केशवसुतांच्या कवितांचे गुणदोष जोगांनी अगदी काटेकोरपणाने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. पण केशवसुतांच्या प्रभावी प्रतिभेचें स्वरूप आणि तिच्या पोषणाला प्रेरक झालेलें त्यांचें व्यक्तित्व यांची आपल्या वाचकांना स्पष्ट कल्पना आणून देण्याचें अवघड काम त्यांच्या लेखणीला साधलेलें नाही. ' कविता ही वीज आहे. तिला धरूं पाहणाऱ्या शंभर लोकांपैकीं नव्याण्णव जळून अथवा होरपळून जातात. तिच्या मागून धावणाऱ्या शंभरांतला एखादाच तिला पकडूं शकतो !" अशा अर्थाचें केशवसुतांचे उद्गार प्रसिद्ध आहेत. या उद्गारांत काव्यनिर्मितीविषयीं केशवसुतांची जी कल्पना व्यक्त झाली आहे तिच्या अनुरोधाने त्यांच्या काव्यगुणांचें मूल्यमापन अवश्य व्हायला हवें होतें. त्याशिवाय त्यांना न्याय मिळाला असे होणारच नाहीं. पण जोगांनीं हा दृष्टिकोनच स्वीकारलेला नाही. केशवसुतांनी पालग्रेव्हची गोल्डन ट्रेझरी पुनःपुन्हा वांचली असावी. त्यांतल्या थोड्या कवितांची रूपांतरें त्यांनी केली असून त्यांच्या इतर कांही कवितांवरहि त्या काव्यसंग्रहांतल्या कवितांची छाया आहे, ही पूर्वीपासून अनेक टीकाकारांनी सांगितलेली गोष्ट लक्षांत घेऊन केशवसुतांच्या वाङ्मयऋणाचा एका स्वतंत्र प्रकरणांत त्यांनी अगदी चोख हिशेब केला आहे. परंतु ही गोल्डन ट्रेझरी केशवसुतांच्या मुळच्या सौंदर्यनिष्ठ पण बंडखोर अशा कविप्रकृतीचा विकास व्हायला कितपत व कशी उपयोगी पडली असेल याची तात्विक मीमांसा करण्याच्या फंदांत ते कुठेंच पडले नाहीत. शेले, कीटस्, बायरन् व वर्ड्स्वर्थ या सर्वांचीच काव्यें केशवसुतांनी थोडीफार अभ्यासलीं असावींत. पण त्यांचें कविमन कीटस् व बायरन् यांच्यापेक्षां शेले व वर्ड्स्वर्थ यांच्याशी अधिक जुळते होते. त्या दृष्टीनें जोगांनी केशवसुतांच्या कवितांचें वर्गीकरण करून आपलें विवेचन रंगविलें असतें तर तें अधिक रसाळच नव्हे तर अधिक उद्बोधकहि झालें असतें. केशवसुतांची कविता जितकी व्यक्तिनिष्ठ तितकीच कालनिष्ठ आहे. त्याही दृष्टीनें जोगांना त्यांच्या व्यक्तित्वावर आणि कवित्वावर विशेष प्रकाश टाकतां आला असता. प्रेमकाव्य, सामाजिक काव्य, निसर्गकाव्य, तत्त्वज्ञानपर काव्य असे फराळाच्या डब्यासारखे स्थूल विभाग कल्पून काव्यविवेचन करण्याची पद्धत त्यांनीं अंगीकारल्यामुळे त्यांची टीका अनेक स्थळीं निव्वळ अभिप्रायवजा झाली आहे. जीवन व साहित्य यांचे संबंध जितके निकट तितकेच सूक्ष्म असतात. त्यांचे गुंतागुंतीचे धागेदोरे उलगडून दाखविण्याचे कौशल्य या ग्रंथांत प्रगट झालेलें नाही. केशवसुतांचें पहिलें पंधरा सोळा वर्षांचें आयुष्य कोंकणांत गेलें. कविमनाच्या दृष्टीनें महत्त्वाचे असे अनेक संस्कार त्यांच्यावर याच काळांत झाले. त्यांच्या जीवनाचे तीन कालखंड कल्पून ' भृंग ' या कवितेपर्यंतच्या पहिल्या एकेचाळीस कवितांचा एक विभाग, ' भृंगा ' पासून

'वातचक्र' पर्यंतचा एक विभाग व 'वातचक्रापासून' 'हरपले श्रेय' या कवितेपर्यंतचा एक विभाग, अशी वाटणी विवेचनाच्या सोईकरितां जोगांनीं केली असती तर केशवसुतांच्या कल्पकतेचा, भावनांच्या विविधतेचा आणि सूक्ष्मतेचा, जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा आणि त्यांच्या सामाजिक मनाचा विकास कसकसा होत गेला याचा आलेख त्यांना काढतां आला असता. अशा आलेखाच्या साहाय्यानेंच सामान्य वाचक श्रेष्ठ साहित्यिकाच्या आत्म्याशी समरस होऊन त्याच्या सहवासांत सौंदर्य व साधुत्व यांचा अलौकिक आस्वाद घेऊं शकतो. केशवसुतांची शैली त्यांच्या संग्रहाच्या पूर्वार्धांत फारशी मधुर किंवा प्रसन्न नाही हें सर्वश्रुतच आहे. उत्तरार्धांत त्यांची आविष्काराची शक्ति विकसित झालेली दिसते यांत शंका नाही. पण टिळकांचा प्रसाद, गोविंदाग्रजाची मोहकता किंवा बालकवींचे मार्दव त्यांच्या शैलींत विशेषत्वानें कधीच प्रगट झाले नाही. असें होण्याचीं अनेक कारणें असूं शकतील. त्यांतलें एक कारण केशवसुतांच्या कविप्रकृतीचें घराणें निराळें आणि त्यांच्या भाषाशैलीचें घराणें निराळें हें असूं शकेल. हे विचित्र प्रकारचे अंतर्द्वंद्व आहे पण तें अनेक लेखकांत आढळतें. कलेचें शरीर आणि कलेचा आत्मा यांत संवादित्व नसल्यामुळें गडकऱ्यांसारख्या प्रथम श्रेणीच्या कलावंतांत सुद्धां हें वैगुण्य जाणवतें. शेले आणि वर्डस्वर्थ या एकोणिसाव्या शतकांतल्या सौंदर्यवादी इंग्रजी कवींचे केशवसुतांच्या प्रतिभेवर कळत न कळत अनेक संस्कार झाले. त्या संस्कारांनीं त्यांच्या कलेचा आत्मा फुलविला. या विशिष्ट प्रतिभेच्या आविष्काराला योग्य अशी भाषाशैली तुकाराम, श्रीधर किंवा लावणीकार आणि पोवाडेकार कवि यांच्यांत बाळपणापासून रमणारा कलावंत कमावूं शकला असता. पण या कवींपेक्षां केशवसुतांच्याकडून मोरोपंतांचेच अध्ययन लहानपणीं अधिक झाले असावें असें दिसतें. 'कचाप्रत देवयानी' व 'राजा शंतनु' या त्यांच्या कविता या दृष्टीनें वाचनीय आहेत. मनुष्याचें मन व शरीर यांच्यात विरोध उत्पन्न झाला म्हणजे माणसाच्या हातून जसें असंबद्ध वर्तन होऊं लागतें, तशी ललित लेखकाची आत्मप्रकृति आणि त्याची आविष्काराची शैली यांत मूलभूत विरोध असला तर त्याच्या भाषेंतही एक प्रकारची क्लिष्टता किंवा कृत्रिमता उत्पन्न होते. जोगांनीं अशा दृष्टीनें केशवसुतांच्या शैलीचा विचार कुठेच केलेला दिसत नाही.

या व अशा प्रकारच्या अनेक गोष्टींकडे जोगांचे दुर्लक्ष होण्याचें मुख्य कारण टीकाकार या नात्यानें त्यांनी घेतलेल्या भूमिकेच्या संकुचितपणांतच आहे. मोरोपंत व तुकाराम यांच्या काव्यांच्या भूमिका स्वभावतःच भिन्न नाहींत काय? टीकाकारांतही असेच दोन वर्ग पडतात—बहिर्मुख आणि अंतर्मुख. बहिर्मुख टीकाकार कलाकृतीच्या आत्म्यापेक्षां तिच्या शरीराच्या सौंदर्याचीच चिकित्सा करण्यांत गढून जातो. Who touches a book' touches a man हे व्हिटमनचे उद्गार त्यांच्या कानांवर बहुधा पडलेलेच नसतात. फडक्यांच्या 'प्रतिभासाधनांत' अनेक चिरंतन वाङ्मयीन सिद्धांतांना जें केवळ तांत्रिक स्वरूप प्राप्त झालें आहे, त्याचें मूळ बहिर्मुख पद्धतीनें वाङ्मयाचा विचार करण्याच्या फडक्यांच्या संवयींतच आहे. ही पद्धति सदोष, अशास्त्रीय किंवा निरुपयोगी आहे, असा मात्र याचा मुळींच अर्थ नाही. एका मर्यादेपर्यंत ती वाचकाला वाङ्मयाचें रसग्रहण करण्याच्या कामीं सहाय्य करते. पण समुद्राच्या पृष्ठभागावर लीलेने तरंगतां आले म्हणून कांहीं कुणाला समुद्राच्या तळाशी असलेले मोत्यांचे शिंपले वर काढतां येत नाहींत. बहिर्मुख पद्धतीला अंतर्मुख पद्धतीची जोड मिळाली तरच कोणत्याहि कलाकृतीचें सजीव, प्रेरक आणि यथार्थ मूल्यमापन होऊं शकते.

रवींद्रांचा 'शाकुंतला' वरला लेख किंवा शिवरामपंत परांजप्यांचें 'प्रणयिनीचा मनोभंग' या चित्राचें रसग्रहण ही या अंतर्मुख टीकापद्धतीची रमणीय उदाहरणें आहेत. स्टीफान झ्वाइग हा तर अशा प्रकारच्या लेखकांचा मुगुटमणि मानला जातो. Three Masters या पुस्तकांत डिकेन्सवरती त्यानें अवघी पंचेचाळीस पाने लिहिलीं आहेत. पण तेवढ्यांत हजारों सुरस पृष्ठें लिहिणाऱ्या एकोणिसाव्या शतकांतल्या त्या महान् कादंबरीकाराचें किती सूक्ष्म, मार्मिक, आणि परिणामकारक शब्दचित्र रेखाटलें आहे. त्यांतल्या चिकित्सेमुळेंच तें अधिक रसाळ झालें आहे. या टीका-निबंधांतल्या छोट्या प्रकरणांचे नुसते मथळे पाहिले तरी झ्वाइगच्या अंतर्मुखतेची कल्पना येईल.—"लोकांच्या प्रीतीला सर्वांत अधिक पात्र झालेला साहित्यिक,' 'इंग्लिश परंपरेचा मूर्तिमंत अवतार,' मध्यमवर्गीयांचें सुख आणि समाधान,' 'डोळ्यापुढें मूर्तिमंत चित्रें उभीं करणारा जादुगार,' 'नाटकी आणि नीतिवादी कादंबरीकार,' 'सर्व सामान्य मनुष्याचें दुःख हलकें करणारा लेखक.' डिकेन्सच्या काळांतला इंग्लिश समाज, त्याच्या आशा आणि आकांक्षा, त्या समाजाची विशिष्ट गुणदोषांनीं युक्त अशी परंपरा सामान्य इंग्रज माणसांत सुद्धां प्रतिबिंबित होणारा परंपरागत गुणदोषांचा आविष्कार, इत्यादि अनेक गोष्टींनीं डिकेन्सचें वाङ्मय कसें घडविलें याचें मोठें मार्मिक वर्णन झ्वाइगनें केलें आहे. एके ठिकाणीं तो म्हणतो, 'डिकेन्सच्या सर्व कलाकृतींना आधारभूत असें जें जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे तें स्वतंत्र कलावंताचें नाहीं; तें तत्कालीन इंग्रज नागरिकाचें तत्वज्ञान आहे.' दुसरीकडे तो उद्गारतो, 'डिकेन्स ज्या देशांत आणि समाजांत जन्माला आला त्याच्या गरजा त्याकाळीं विशिष्ट प्रकारच्या होत्या. श्रेष्ठ लेखक या दृष्टीनें डिकेन्सचें हें दुर्दैव होतें.' तिसऱ्या ठिकाणीं तो डिकेन्सचा गौरव करतो, 'एकोणिसाव्या शतकांतल्या साहित्यसृष्टींतले सर्व अतिरथी महारथी घेतले तरी त्यांत जगांतला आनंद वृद्धिंगत करण्याचें श्रेय इतरांपेक्षा डिकेन्सलाच अधिक द्यावें लागेल.'

या अंतर्मुख पद्धतीनें केशवसुत, त्यांचें जीवन, त्यांचा समाज आणि त्यांचें काव्य यांची संगति लावून जोगांनीं विवेचन केलें असतें तर या पुस्तकांतली सर्व महत्त्वाची माहिती कायम राहूनही त्यांत अधिक रसिकता, अधिक मार्मिकता आणि वाचकाच्या अंतःकरणांत कवीनें अनुभवलेल्या सुंदर व उदात्त संवेदना निर्माण करण्याइतकी परिणामकारकता येऊं शकली असती. टीका ही सुद्धां एक प्रकारची श्रेष्ठ कलाकृतिच आहे. आणि कुठल्याही कलेचें अमर आकर्षकत्व निर्मात्याच्या विश्लेषणाच्या शक्तीपेक्षा संयोजनाच्या कौशल्यावर अधिक अवलंबून असतें. जोग बाह्य विश्लेषणांतच अधिक रमतात. त्यामुळें अनेक कवितांतले त्यांनी दर्शविलेले लहान लहान गुणदोष वाचकाला पूर्णपणें पटत असले तरी त्यांचें परीक्षण त्याला सौंदर्याची किंवा समरसतेची रम्य अनुभूति देऊं शकत नाहीं. दवाखान्यांत ठेवलेल्या एखाद्या स्त्रीच्या शरीराचा सांगाडा आणि एखाद्या शिल्पकारानें तयार केलेला तिचा सुंदर पुतळा यांत जसें आणि जेवढें अंतर पडेल तसें आणि तेवढेंच अंतर विश्लेषणप्रधान टीका आणि संयोजनचतुर टीका यांच्यांत आहे. फुलाची एक एक पाकळी खेडून आणि तिच्या रंगरूपाचें यथार्थ वर्णन करून त्या फुलाच्या सुगंधाची प्रेक्षकांना पूर्णत्वानें कल्पना आणून देणें कुणाही वक्त्याला शक्य आहे काय? केशवसुतांच्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण कवितांच्या बाबतींत जोगांची हीच गत झाली आहे. त्यांनी लावलेला कवितेचा अर्थ स्थूलमानानें बरोबर असतो. पण तिच्यांतलें सौंदर्य मात्र नेमकें त्यांच्या हातांत सांपडत नाहीं. पुस्तकी पांडित्य व साहित्यशास्त्रांतले सिद्धांत आणि

संकेत यांच्यावर अनेकदां रसग्रहणाची सर्व भिस्त ठेवल्यामुळें कित्येक स्थळीं इच्छा नसूनही त्यांच्या हातून केशवसुतांना-अन्याय घडला आहे. त्यांची भूमिका हातांत ताजवा घेऊन माल विकणाऱ्या दुकानदाराची किंवा गंभीर मुद्रेनें रोग्याच्या छातीला रबरी नळी लावणाऱ्या डॉक्टराची वाटते. आपल्या साथीनें गायनाचा गोडवा वाढविणाऱ्या सारंगियाचा कलावंतपणा त्यांच्यांत नाही.

उदाहरणार्थ एक अगदीं सरळ, सुबोध पण सरस अशी केशवसुतांची कविता आपण घेऊं. 'गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे ' हें तिचें नांव आहे. केशवसुतांच्या प्राथमिक लेखनांतील ही एक चांगल्यापैकीं कविता आहे. सारे बालपण आणि थोडा फार मुग्धपणाचा काळ कोंकणांत घालविल्यानंतर केशवसुतांना पुढील शिक्षणाकरितां पुण्यासारख्या दूरच्या गांवीं जावें लागले. घरापासून दूरावलेल्या भावनाशील जीवाला पर ठिकाणीं किती चुकल्या-चुकल्यासारखे होते ही प्रत्येकाच्या परिचयाची गोष्ट आहे. केशवसुतांनी सुद्धां याच अनुभवावर ' आई, आई ' ही आणखी एक कविता लिहिली आहे. त्या कवितेंत शिक्षणाकरितां एक मुलगा परगांवीं जातो आणि नेहमींच्या सवयींप्रमाणे तिथें रात्रीं झोंपेत ' आई, आई ' म्हणून हांका मारूं लागतो, अशी भूमिका आहे. यांच भावनेवर 'गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे ' ही कविता आधारलेली आहे. प्रियजनापासून दूर जावें लागलेल्या मनुष्याला दिवसाच्या व्यापातापांत आपल्या आवडत्या माणसांची, त्यांच्या प्रेमालापाची, त्यांच्या सुखद स्पर्शांची आणि त्यांच्या सहवासांतल्या अनुपम उत्कट आनंदाची विशेष तीव्रतेनें आठवण होत नाहीं. पण रात्र झाली, कामधाम संपवून तो बिऱ्हाडीं परत आला, जेवणखाण आटपून त्याने अंथरुणावर अंग टाकलें कीं त्याच्या मनांतल्या साऱ्या मधुर स्मृती जाग्या होतात. अशा वेळीं एकमेकापासून दूर असलेलीं मायलेकरें, रमणी-वल्लभ किंवा पतिपत्नी हीं शरीराने अंथरुणावर असली तरी मनानें आपल्या प्रियजनांच्या आवतींभोवतींच घिरट्या घालीत असतात. पत्नीच्या विरहानें व्याकुळ होऊन मेघाबरोबर संदेश पाठविणारा यक्ष हा जेवढा काव्यदृष्ट्या सुंदर विषय आहे, तेवढाच प्रियजनांच्या विविध आठवणींनें बेचैन होऊन मनाने त्याच्याकडे धांवत जाणारा भावपूर्ण सामान्य मनुष्य हें ही कविता-कामिनींचे क्रीडास्थान आहे. सर्वकाळीं आणि सर्वस्थळीं प्रत्येकाला जाणवणाऱ्या या करुणरम्य अनुभूतीवर केशवसुतांनीं आपली ही कोमल भावनांनीं युक्त अशी कविता लिहिली आहे. आता तिच्यावरले जोगांचे भाष्य पहा.

शरीराने पुण्यांत आपल्या बिछान्यावर पडलेला पण मनाने कोंकणांतल्या आपल्या घरापाशी आलेला कवि कवितेच्या आरंभींच आपल्या मित्राला म्हणतो,

' ही देख म्हैस पडवीमधिं बांधलेली
रोमंथ भाग हळु चावित बैसलेली '

ह्या दोन ओळींवर जोग मल्लिनाथी करतात, ' कवितेच्या प्रारंभींच हा म्हशीचा उल्लेख हास्योत्पादक वाटतो. ' जोगानी कोंकण पाहिलें आहे किंवा काय यांची मला कल्पना नाही. म्हैस ह्या प्राण्याविषयीं त्यांचें फार वाईट मत होण्याचें काही मानसशास्त्रीय कारण आहे किंवा काय (उदाहरणार्थ, लहानपणीं एकाद्या म्हशीचे अणकुचीदार शिंग लागल्यामुळे मनामध्यें त्या भीतीचा गंड निर्माण होऊन बसणें) हेंही मला ठाऊक नाही. म्हशीचा प्राणनाथ हा शब्दप्रयोग नेहमीं विडंबनाकरितांच वापरला जात असल्यामुळें म्हैस हा शब्द हास्योत्पादक आहे अशी तर त्यांची समजूत झालेली नाहीं ना ! कवि रात्रीच्या वेळीं कोंकणांतल्या खेड्यांत असलेल्या

आपल्या घरीं मनानें येतो. त्यावेळीं आंब्याच्या झाडावरून कोकिळा पंचमांत गात होती किंवा माडांच्या राईतून चंद्राची कोर अमृतसिंचन करीत होती. असें कांही तरी वर्णन कवीने केलें असतें तर जोगांनी त्याच्यावर हास्योत्पादकतेचा शिक्का खास मारला नसता. कारण त्या कल्पना प्रचलित सौंदर्याच्या संकेतांना मंजूर आहेत. पण केशवसुत संकेताच्या चाकोरींतून जाणारे कवि नव्हते. कवितेच्या आरंभीं त्यांनीं नमनालाच म्हैस पुढे उभी केलेली पाहून तांबड्या चिंधीला बुजणाऱ्या बैलासारखी जोगांच्या रसिकतेची स्थिति झाली आहे. ते म्हणतात, 'कवितेच्या प्रारंभींच हा म्हशीचा उल्लेख हास्योत्पादक वाटतो. पण वस्तुस्थिति तशी असल्याने कवीचा नाइलाज झाला.' वस्तुस्थिति अशी आहे कीं जोगांच्या सौंदर्याच्या कल्पना अनुभूतीपेक्षां परंपरेने पुनीत केलेल्या संकेतांवर आणि भावनेच्या तृप्तीपेक्षां बुद्धीच्या संतोषावर अधिक अवलंबून आहेत. त्यामुळेच ते पडवींत बांधलेल्या केशवसुतांच्या घरच्या गरीब म्हशीकडे असे मारक्या दृष्टीने पाहत आहेत! कविमनापुढें कोंकणांतल्या घरच्या आठवणींचीं जीं चित्रें उभी राहिली त्यांत पडवींत रवंथ करणारी म्हैस दिसणें अत्यंत स्वाभाविक आहे. खेडवळ जीवनक्रमांत घरांतल्याच एखाद्या माणसासारखा भासणारा तो मुका प्राणी! या म्हशीच्या दुधावरच घरांतल्या साऱ्या माणसांची नित्याची ताकाची तहान भागायची-लहान मुलांचें पोषण व्हायचें! तिला चरायला सोडणें, चोळून धुणें, तिच्यापुढे वेळेवेळीं चारा घालणें, तिची धार काढणें, हे घरांतल्या लहान मुलांचे आणि म्हाताऱ्या माणसांचे आवडते व्यवसाय असायचे. अशा रीतीनें घराशीं पूर्णपणें एकरूप झालेल्या या उपयुक्त प्राण्याबद्दल कविमनाला ममता वाटण्यांतच त्याचें मोठेपण नाही काय? ह्या ममतेच्या भावनेनेच केशवसुतांनी प्रारंभींच्या या दोन ओळी लिहिल्या. नाइलाजाने नव्हे! इथें सक्तीचा प्रश्नच नव्हता! या दोन ओळींनी आपल्या काव्याच्या सौंदर्याची हानी होईल अशी केशवसुतांची कल्पना असती तर त्यांना पडवींत म्हशीऐवजी कुत्रा दाखवितां आला असता किंवा पडवीवरून अलगद उडी मारून एकदम घरांत प्रवेश करतां आला असता. ते कविता लिहित होते; कोंकणांतल्या घरचा कांही नकाशा काढींत नव्हते. खरी स्थिति अशी आहे कीं जोगांच्या व केशवसुतांच्या सौंदर्यविषयक विचारप्रणालींतच मुलभूत भेद आहे. घराची सेवा करणारा मुका उपयुक्त प्राणी या दृष्टीने केशवसुतांना घरांतल्या म्हशीचीही आठवण आहे. केवळ वास्तवाचें चित्र नव्हें तर प्रेमळ कविमनाचें दर्शन म्हणूनहि या वर्णानांत अनुचित असें कांहीच नाही. राजवाड्याचें वर्णन करतां करतां कांही केशवसुतांनी त्याच्या रत्नजडित महाद्वारांत म्हैस दाखविलेली नाही. बर्न्स किंवा वर्डस्वर्थ यांच्या काव्यांत रसपरिपोषक ठरलेले अशा प्रकारचे उल्लेख सहज काढून दाखवितां येतील. पण ते पाहायला संकेताच्या क्षेत्रांतून बाहेर पडण्याची इच्छा हवी!

पुढे घरांत प्रवेश केल्यावर कवि आपल्या वडिलापाशीं झोंपलेल्या धाकट्या भावाला पाहून खालील उद्गार काढतो,

> बापू, गड्या ध्वज उभा करशील काय ?
> तूं देशकारण करूं झटशील काय ?
> बापू, जनांत दिवटी धरशील काय ?
> स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ?

या चार ओळींचें जोगांचें रसग्रहण पहा— ' वडिलांच्या शेजारीं धाकटा भाऊ बापू झोंपला आहे. तो हुशार असल्याने केशवसुतांना त्याच्याविषयीं प्रेम वाटतें. पुढे देशकारण करून स्वातंत्र्यदेवीची उपासना त्याने करावी अशी आशा ते प्रगट करतात. त्या बापूने (सीताराम केशव दामले) आपल्या परीने देशकारण केलें व स्वातंत्र्य देवाची उपासना केली ही गोष्ट परिचितच आहे. '

या चार चरणांची गोडी बापू उर्फ सीताराम केशव दामले यांनी पुढील आयुष्यांत काय केलें यांवर मुळीच अवलंबून नाही. आपल्या धाकट्या भावाने कांही तरी देशकार्य केलें पाहिजे; ही केशवसुतांची तळमळ या श्लोकांत प्रगट झाली आहे. ती पुढे सफल झाली किंवा नाही हा इतिहासाचा भाग आहे ! काव्याचा नाही. वाचकाला हा श्लोक सरस वाटतो याचें कारण एकच आहे. तें म्हणजे त्यांत प्रतिबिंबित झालेलें केशवसुतांचें देशाच्या स्वातंत्र्यासाठीं तडफडणारें आणि समाजाच्या प्रगतिसाठी तळमळणारें मन ! ते यावेळीं अवघे एकवीस वर्षांचे होते. त्यांच्या व्यावहारिक जीवनाचा जम अजून बसायचा होता. पण त्यांचें अंतर्मन आपल्या वैयक्तिक संसाराची काळजी करीत नव्हते. तें सामाजिक विचारांनी व्यग्र झालें होतें. साठ वर्षांपूर्वींच्या त्या काळांत सर्वसामान्य सुशिक्षितांना सुखवस्तुपणाची दृश्यें दिसत असतांना केशवसुत मात्र निराळीच स्वप्नें पाहत होते. 'हल्ला करण्या तर दंभावर, शूरानों या त्वरा करा रे, 'वैर तयांना जे गरिबी शिकवितात बालास', 'ब्राह्मण नाही, हिंदुहि नाहीं न मी एक पंथाचा। तेच पतित कीं जे आखडिती प्रदेश साकल्याचा,' 'देवदानवा नरें निर्मिलें हें मत लोकां कवळूं द्या,' इत्यादि तेजस्वी चरण ज्या कविमनांतून पुढें प्रकट झालें त्याचें विशीच्या आंतबाहेरचें स्वरूप इथें आपल्याला चांगल्या रीतीने प्रचीत होतें.

जोगांची काव्यविवेचनाची पद्धति किती बहिर्मुख आहे हें या कवितेंतल्या सोळाव्या श्लोकाची त्यांनी जी संभावना केली आहे तिच्यावरूनहि दिसून येईल. तो श्लोक असा आहे—

कांताच ही मम ! अहा ! सखये ! मदीय !
स्वप्नें अतां तुज गडे दिसतात काय ?
आतां असो पण पुढें तुजला दिसेन
स्वप्नें तुझी मग समग्र तुला पुसेन !

जोग म्हणतात, 'तत्कालयोग्य अशा विनयाने आपल्या पत्नीचा उल्लेख अगदीं शेवटीं करून माझी स्वप्नें तुला पडत आहेत काय ? आतां नाही पुण पुढे मी तुला दिसेन व सारी स्वप्नें विचारून घेईन असें आश्वासन देऊन आपलें वळणें गांव सोडून कवि परत पुण्यांत खाजगीवाले यांच्या वाड्यांत परत येतो. कांतेला मी आज नाही पण पुढे दिसेन व सारी स्वप्नें विचारून घेईन असें म्हणणें हेंहि आतांचे येणें खरें नव्हे, याची जाणीव असल्याचें द्योतक आहे–'. या कवितेंत पत्नीचा शेवटीं उल्लेख करण्यांत केवळ सामाजिक संकोचाचा भाग नाही. कलादृष्टिहि त्याला कारणीभूत झाली आहे. जीवनांतल्या प्रीतिस्थानांचा नैसर्गिक अनुक्रम हाच आहे. गोड घांस शेवटी घेण्याकरितां बाजूला काढून ठेवतात ना ? तसें इथें केशवसुतानी केलें आहे. पण जोगांचें या गोष्टीकडे लक्षच गेलें नाही. स्वप्नें तुझी मग समग्र तुला पुसेन ' या ओळींत जी मधुर हृदयंगम कल्पना व्यक्त झाली आहे तिचा सविस्तर परामर्श घेण्याचें मानहि त्यांना राहिलेलें नाही.

ध्वन्यर्थापेक्षा वाच्यार्थाला आणि कल्पनेच्या अथवा भावनेच्या सूक्ष्म विलासापेक्षां व्यावहारिक बुद्धीला प्राधान्य देऊन कवितेचा रसास्वाद घ्यायला जाणें म्हणजे फुलें चोखून त्यांचें सौंदर्य अजमावण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. या पद्धतीचा आश्रय केल्यामुळे अनेक ठिकाणीं जोगांना कविमनच पुरें कळलें नसावें असा भास होतो. 'पद्य पंक्ति' या चिमुकल्या पण विचारगर्भ कवितेचें रहस्य विशद करतांना त्यांनीं केलेली कसरत या विशिष्ट दृष्टीनें पाहण्याजोगी आहे. ही चवदा छोट्या ओळींची कविता अशी आहे—

आम्ही नव्हतो अमुचें बाप
उगाच का मग पश्चात्ताप ?
आंसवें न आणूं नयनीं
मरुन जाऊं एक दिनीं
अमुचा पेला दुःखाचा
डोळे मिटुनी प्यायाचा,
पितां बुडाशीं गाळ दिसे.
त्या अनुभव हें नांव असें !
फेंकुनि द्या तो जगावरी
अमृत होउं तो कुणा तरी
जें शिकलों शाळेमाजी
अध्याहृत ही टीप तया
द्वितीय पुरुषीं हे योजीं
प्रथम पुरुष तो सोडुनिया !

जोग या कवितेची अवघ्या तीन वाक्यांत भलावण करतात. ते म्हणतात, 'आम्ही नव्हतों अमुचे बाप। उगाच का मग पश्चात्ताप?' या तिखट सुभाषिताला योग्य ती प्रसिद्धि मिळाली नाही. 'जे शिकलो शाळेमाजी । अध्याहृत ही टीप तया। द्वितीय पुरुषीं हें योजीं प्रथमं पुरुष तो सोडुनियां' या सुभाषितामधील अर्थ संदिग्ध असला तरी जगाच्या व्यवहाराचें मार्मिक ज्ञान दर्शवितो'. संदिग्ध अर्थ मार्मिक ज्ञान दर्शवितो! 'मूकं करोति वाचालं' सारखाच हा टीकेचा प्रकार दिसतो. त्यांचें तिसरें वाक्य असें आहे–'अमुचा पेला दुःखाचा वगैरेओळींत नैराश्य असलें तरी कणखरपणा व्यक्त होतो.' नैराश्य व कणखरपणा ह्यांची जोगांनी घालून दिलेली जोडी सुद्धां मोठी विनोदी वाटते. उद्यां वैराग्य आणि शृंगार सुद्धां हातांत हात घालून फिरूं लागतील असें यावरून म्हणायला हरकत नाही.

जोग मानतात तशी ही चार दोन तिखट उक्तींनी नटलेली सुभाषितवजा कविता नाही. प्रामाणिकपणानें जीवन जगतांना भावनाशील मनुष्याला येणाऱ्या कटु अनुभवांचें तें चित्रण आहे. आजच्या जगांत सत्प्रवृत्त ध्येयवादी जीव कितीहि धडपडला, त्यानें प्रयत्नांची अगदी पराकाष्ठा केली, तरी आपल्या नशिबींचें अपयश तो चुकवूं शकत नाही. समाज सुधारावा, भोंवतालचें जग बदलावें, सारीं माणसें सुखी व्हावींत या भावनेनें आमरण काम करणाऱ्यांच्या हातांत सुद्धा अनेकदा आपल्या सात्त्विक आकांक्षांची राखच उरते. या कटु अनुभवांनी मनुष्य नुसता निराशच नव्हे, तर प्रसंगीं जीवनाविषयीं अश्रद्ध (Cynic) होण्याचा संभव असतो. पंचविशींत ध्येयवादी दिसणारीं माणसें चाळिशींत प्रवाहपतित

झालेली दिसतात यांचें मूळ असल्या अश्रद्धेतच आढळतें. पण हे सर्व अनुभव घेऊनहि कवि-मन आशावादी राहतें. त्याची मानवतेवर असीम श्रद्धा आहे. मनुष्य मर्त्य असला तरी मानवता अमर आहे हें तो जाणतो. झुंजार व्यक्तींच्या जखमांतून वाहणाऱ्या रक्तांतूनच जगाला संजीवनी देणारें अमृत मिळतें हें त्याला पटलेलें असतें. म्हणून तो म्हणतो, 'तुम्हा आम्हाला सद्-बुद्धीनें हातीं घेतलेल्या कार्यांत यश आले नाही म्हणून निराश किंवा दुःखी होण्याचें काय कारण आहे ? आपणास जीं पापें धुवुन काढायचीं आहेत तीं कांहीं लहान सहान नाहींत आणि तीं कांहीं सारीं आपल्या हातून झालेलीं नाहीत. मागच्या अनेक पिढ्यांची सांठत आलेली पातकें आहेत तीं. म्हणून धैर्य न सोडतां, डोळ्यांतून एक टीपहि न गाळतां आपण लढत राहूं या, झुंजत राहूं या ! या युद्धांत आपण एके दिवशीं लढतां लढतां कामीं येऊं हें खरें आहे पण आपलें मरण निश्चित जगाच्या उपयोगी पडेल. आपल्या आयुष्याचा प्याला दुःखानें भरलेला असेल. पण त्या दुःखाच्या तळाशीं जो अनुभव आहे तो कधींहि फुकट जाणार नाहीं. आपल्या प्याल्यांतल्या आजच्या विषाचें उद्यां अमृत होईल.

या कवितेंतल्या पहिल्या दहा ओळींतल्या प्रतिपादनाचा रोख अशा प्रकारचा आहे. शेवटच्या चार ओळींत या विचाराला थोडी निराळी कलाटणी दिली आहे. जोगांनी डोळ्यांवर चढविलेला सुभाषिताचा चष्मा थोडा बाजूला ठेवून पाहिले असतें तर सुनीताशीं सदृश अशा पद्धतीने आपल्या विचारगर्भ कल्पना मांडण्याची केशवसुतांना जी हौस होती तिच्यांतूनच ही कविता स्फुरली आहे हें त्यांच्या सहज लक्षांत आलें असतें. या कवितेंतल्या ओळी तोकड्या आहेत, कलाटणी आठ किंवा बारा ओळींनंतर यायची ती या कवितेंत दहा ओळींनंतर आली आहे. खरी प्रतिभा नेहमींच प्रयोगशील असते. त्या दृष्टीनेच या रचनेकडे पाहिलें पाहिजे. पहिल्या दहा ओळींमध्यें जो जीवनविषयक गंभीर विचार व्यक्त केला आहे, त्याला पोषक अशाच पुढच्या चार ओळी आहेत. मात्र या कलाटणींत कवि हंसत खेळत जगांतल्या कटु अनुभवांचा स्वीकार करीत आहे. तो थोडासा मिस्किल झाला आहे. म्हणून तो म्हणतो, 'लहानपणीं शाळेंत आपण खूप सुंदर गोष्टी शिकतों, अनेक मधुर स्वप्नें पाहतों, भावी जीवनाची मोहक चित्रें रेखाटतों पण त्या चिमण्या जगांत फक्त एकच गोष्ट आपल्या लक्षांत येत नाही. ती म्हणजे शाळेंतल्या व्याकरणाला प्रथम पुरुषाला मान आहे. पण जीवनाच्या व्याकरणांत मुळींच महत्त्व नाहीं.

कवीच्या सूक्ष्म, कोमल किंवा उदात्त अनुभूतीशी समरस होऊन काव्यांतले सौंदर्य वाचकांच्या अंतःकरणापर्यंत नेऊन पोंचविणें हें जें टीकाकाराचें मुख्य काम तें जोगांच्या स्थानीं अस्थानीं वर डोकें काढणाऱ्या व्यावहारिक बुद्धीमुळे अनेक ठिकाणीं मुळीच साधलें नाही, हेंहि या ग्रंथांतलें एक वैगुण्य आहे. 'दिवस व रात्र' ही केशवसुतांची कविता केवळ कल्पना-चमत्कृतीच्याच दृष्टीने नव्हे, तर अंतर्मुख मनाला येणाऱ्या काव्यात्म अनुभूतीच्या दृष्टीनेहि सुंदर आहे. पण तिचा चांगुलपणा थोडाफार कबुल करूनहि शेवटीं जोग तिच्यावर शेरा मारतात–'पण मुळांतच 'दिवस व रात्र' या मधला हा विरोध ज्यांना खरा आहे असें वाटत नाही, त्या दोन्हींसहि अनुकूल तसेंच प्रतिकूल असें बोलणें शक्य आहे हें ज्यांच्या लक्षांत येतें, त्यांना या कवितेंत अर्थचमत्कृतीचें कौतुक या पलीकडे कांहीं विशेष दिसत नाहीं हें योग्यच आहे.' कविता म्हणजे शाळेंतली वादविवाद सभा आहे अशी का जोगांची समजूत आहे ? कधी ना कधी तरी रात्रीच्या एकांतांत ज्यांचें मन न कळत अंतर्मुख, चिंतनशील किंवा काव्यात्म झालें नाही असा एक तरी प्रौढ जीव जगांत असेल काय ! मग ही तपासणी

उलट-तपासणीची मानगड काव्यचर्चेत कशाला ? 'रांगोळी घातलेली पाहून' या कवितेची ते अशी ओळख करून देतात—'दररोज दरवाजापुढें सडासंमार्जन करणाऱ्या हजारों युवतींच्या मनांत आणि त्यांनी काढलेल्या रांगोळ्या प्रत्यहीं पाहणाऱ्या तितक्याच व्यक्तींच्या मनांत स्वच्छता व सौंदर्यदर्शन या पलिकडे रांगोळ्या पाहून आणखी कांही विचार येत नसेल. त्यांत कवीनें एखादा आशय न पाहतां आणखी कांही गंभीर आशय न पाहिला तर तो कवि कसचा ? रांगोळ्यांत चंद्र, सूर्य, स्वस्तिक, गोष्पदें, चक्रें, कमळें इत्यादि आकृति येतात. सर्व साधारण सामान्य स्त्रीला काढतां याव्यात अशा या आकृति आहेत. त्यांना कांही थोडा धार्मिक अर्थ प्रथम असेल. नाही असें नाही. पण आज तो बहुशः विस्मृत झाला आहे. आतां सारवलेली जागा अगदीं मोकळी चांगली दिसत नाही म्हणून त्यांतली एकता काढून टाकण्याकरितां काढलेल्या आकृति यापेक्षां रांगोळीला विशेष अर्थ नाही'

विनोदी लेखक म्हणून जोगांचा कांही महाराष्ट्रांत लौकिक नाही. तो असता तर ही टीका हा त्यांच्या विनोदाचा एक प्रकार आहे असें समजुन तरी माझ्या सारख्याला आपलें समाधान करून घेता आलें असतें ! या दहा ओळींच्या टीकेंत चिकित्सा म्हणजे चिरफाड अशी आपली समजूत करून घेऊन त्यांनी जे उद्गार काढेल आहेत ते सौंदर्याच्या तर सोडाच पण तर्कशुद्धतेच्या निकषावर तरी क्षणभर टिकूं शकतील काय ! म्हणे रांगोळी पाहून स्वच्छता व सौंदर्यदर्शन या पलीकडे कुठलाहि विचार ती घालणाऱ्या तरुणींच्या किंवा ती पाहणाऱ्या प्रेक्षकाच्या मनांत येत नाही. कदाचित् येत नसेलहि ! रांगोळीच्या दर्शनाने अंतर्मनांतलें उदात्तत्व जागृत होण्याइतकें किंवा सुंदर कल्पना सुचण्याइतकें त्यांचें व्यक्तित्व विकसित झालेलें असते तर त्यांनी केशवसुतासारखी काव्येंच लिहिली असतीं ! संध्याकाळी मुकी असलेली एक कळी रात्रीं हळुहळु खुलत प्रातःकाळीं संपूर्णपणें फुलते ही गोष्ट अनादि कालापासून जगांतलें अगणित जीव पाहात आले आहेत. पण तिच्यांतून मधुर काव्य फक्त एका बालकवींनीच निर्माण केलें. दाढी करतांना आपल्या चेहऱ्यावर डोकावणारा पांढरा केस प्रथमच पाहून सर्व देशांत शेंकडों प्रौढ पुरुष दररोज दचकत असतील. पण त्या सूक्ष्म अनुभूतीच्या आधारावर सुंदर गुजगोष्ट फक्त फडकेच लिहूं शकले. दारांत घातलेली रांगोळी पाहून ज्या कल्पना सामान्य माणसांच्या मनांत येत नाहीत त्या केशवसुतांना सुचल्या हा कवि या नात्याने जोग त्यांचा गुन्हा समजतात की काय ? रांगोळीविषयीं आतां विशेष धार्मिक कल्पना लोकांच्या मनांत राहिल्या नाहीत, अर्थात् केशवसुतांनी रांगोळींत जें दिव्यत्व, सौंदर्य, आणि पावित्र्य पाहिलें ते कृत्रिम आहे, असेंहि ते जातां जातां सुचवितात. पण केशवसुतांनीं ही कविता पन्नास वर्षांपूर्वी लिहिली आहे या गोष्टीचें त्यांना अचानक विस्मरण कां व्हावें हें कळत नाही. अर्धशतकापूर्वी रांगोळी हिंदुसमाजांत किती पवित्र मानली जात होती याचें संशोधन करण्याची पाळी जोगांसारख्या पंडितावर यावी ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे.

जिथें साध्या सरळ कवितांचा रसास्वाद घेताना जोग सौंदर्याच्या साक्षात्काराचा असा अभाव दाखवितात, तिथे 'क्षणांत नाहींसे होणारे भास' 'झपूर्झा' आणि 'हरपलें श्रेय' या तीन कविता केशवसुतांनीं आयुष्याच्या निरनिराळ्या कालखंडांत लिहिल्या असल्या तरी त्या एकाच प्रकारच्या मनोवृत्तींतून स्फुरल्या आहेत आणि त्या पद्धतीने त्यांचें विवेचन केल्यास केशवसुतांच्या व्यक्तित्वावर अधिक प्रकाश पडण्याचा संभव आहे हें जोगांच्या लक्षांत येईल अशी अपेक्षा बाळगण्यांत काय अर्थ आहे ! आत्मदर्शन, समाजदर्शन व जीवनदर्शन हीं जीं उच्च कलेचीं प्रमुख अंगें असतात त्यांचा केशवसुतांच्या कवितेंत झालेला आविष्कार मोठा हृद्य व अभ्यसनीय

आहे; पण त्याकरितां त्यांच्या कवितांच्या वर्गीकरणाची परंपरागत पद्धत सोडून दिली पाहिजे, त्यांच्या कवित्वाला आधारभूत असलेल्या सतेज व स्वतंत्र व्यक्तित्वाशीं समरस होऊन त्यांच्या अंतरंगांत प्रवेश केला पाहिजे.

'The poet does good for the world not by adding to men's knowledge or their comforts but by extending the range of human sensibility, (कवि हा मानवजातीच्या व्यावहारिक ज्ञानांत किंवा पार्थिव सुखांत भर घालीत नाही, तो तिच्या आत्म्याची संस्कारिता आणि संपन्नता वृद्धिंगत करतो.) या उक्तीचा उपमर्द आपल्या हातून होणार नाही ही दक्षता परीक्षकाने घेतली पाहिजे. जोगांना तें जमलेलें नाही. मात्र प्रत्येक लेखकांत कांही विशिष्ट शक्ति असते, तशा त्याला अनेक मर्यादाहि असतात. जोगांच्या अशा अनेक मर्यादा लक्षांत घेऊन या ग्रंथाकडे पाहिलें तर त्यानी आपले काम चोखपणाने बजावले आहे हें कुणालाही कबूल करावें लागेल. वटवृक्षाला हापूस आंबे लागत नाहीत म्हणून त्याला दोष देण्यांत अर्थ काय आहे? रखरखीत उन्हांत चालून श्रांत झालेल्या वाटसरूंना त्याच्या छायेंत विसावा मिळतो हें काय थोडें आहे ? पुढल्या पिढींतल्या केशवसुताच्या अंतर्मुख अभ्यासकांना सुद्धा जोगांच्या या टीकाग्रंथाविषयीं अशीच आपुकली वाटेल यात शंका नाही.

नवीन सभासद

कै. चिपळूणकर स्मारकासाठी देणगी, दिल्यामुळे झालेले

तहहयात सभासद

(१) श्री. एस. व्ही. कानिटकर, पुणें (रु. १०१)
(२) श्री. वासुदेव माधव भिडे, न्यू दिल्ली (रु. १००)
(३) सौ. पद्मावती वि. गोळे, पुणें (रु. १००)
(४) प्रा. प. वि. पटवर्धन, वाडिया कॉलेज, पुणें (रु. १००)

साधारणचे तहहयात झालेले सभासद

(१) श्री. ना. त्र्यं. भिडे, पुणें
(२) श्री. रामचंद्र सदाशिव ढवळे, सातारा

तहहयात सभासद

(१) श्री. रामचंद्र कोंडो फाटक, मुंबई, १४
(२) सौ. सरोजिनी रामचंद्र फाटक, मुंबई, १४

साधारण सभासद

(१) डॉ. वा. मा. पाठक, पुणें
(२) श्री. गणपतराव रामजी पवार, वरुड (वऱ्हाड)
(३) श्री. वसंत कृष्णाचार्य कऱ्हाडे, मोमिनाबाद
(४) श्री. पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, बडोदें
(५) सौ. विमल पुरुषोत्तम चित्रे, बडोदें
(६) श्री. वामन रामराव कान्त, औरंगाबाद
(७) श्री. बाळ सीताराम मर्ढेकर, पाटणा
(८) श्री. भालचंद्र विष्णु सिधये, पुणें २
(९) श्री. गोपाळ सदाशिव कामत, पुणें २
(१०) श्री. वासुदेव बापू गावडे, मालवण

— परीक्षणें —

इंदिरा —ले०—प्रा. लीला देशमुख, एम्. ए. बी. टी. प्रका०—नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर; मूल्य पावणेतीन रु.

आगगाडीच्या डब्यांत पुष्कळ माणसें बसलेलीं असतात, येतात जातात. पण एखा-द्याच माणसाची अशी सहज छाप पडून जाते कीं त्याचा ऋणानुबंध जडावा आणि वाढावा अशी ओढणी आपणांला न कळत लागते. प्रत्यहीं प्रसिद्ध होणाऱ्या अनेक पुस्तकांतून एखाद्याच पुस्तकाची अशी मोहिनी आपणांवर पडते. नागपूरच्या प्रसिद्ध लेखिका प्रो. लीला देशमुख यांचा "इंदिरा" हा कथासंग्रह वाचकांना असाच चित्तवेधक वाटेल.

या कथासंग्रहांत १३ कथा आहेत. त्यापैकीं काराव्ह, गॉर्की, व रवींद्रनाथ यांच्या गोष्टींची तीन रूपांतरें सोडलीं तर राहिलेल्या दहा कथा स्वतंत्र आहेत. रूपांतर हीहि एक स्वतंत्र कला आहे. रूपांतराकरितां कोणती कथा निवडायची येथपासून मुळांतील रहस्य जसेच्या तसें वाचकांच्या पदरांत टाकावयाचें येथपर्यंत मोठें कौशल्य दाखवावें लागतें. लीला देशमुख यांनी तें फार मोठ्या प्रमाणांत दाखविलें आहे. मापांतरें करतांना रशियन माणसांना हिंदी माणसाची पागोटींकुडतीं चढविलीं नाहींत हें फार चांगलें झालें. यायोगें परकीय वातावरणाचें एक मनोहर नावीन्य अनुभवावयास सांपडतें.

या कथासंग्रहाचें प्रवेशद्वार म्हणून असलेली 'इंदिरा' ही कहाणी फारच सुंदर आहे. तंत्रदृष्ट्या तिला कदाचित् कथा म्हणतां येणार नाहीं, पण इतकी हृदयंगम कथा शोधूं गेल्यास कुठे मिळणार नाही, हेंहि तितकेंच खरें! लीला देशमुख यांनी आपल्या दिवंगत मातेच्या प्रसिद्धीपराङ्मुख व उदात्त जीविताचें सुंदर चित्र यांत रेखाटलें आहे. भावना दुथडी भरून वाहात असतां, संयमपूर्ण कलात्मतेनें मध्यप्रांतीय खानदानी समाजजीवनाच्या पटावर हें चित्रण लीला देशमुख यांनी केलें आहे. भारतीय स्त्रीजीवनांतला सारा खोल व भव्यपणा या हृदयस्पर्शी शब्दचित्रांत पहावयास मिळतो.

शब्दचित्राच्याच धर्तीवर असलेली दुसरी कथा 'बापू' ही म्हणतां येईल. या कथें-तली मुख्य वर्ण्य व्यक्ति ही मालगुजारी खानदानीतलीच आहे. 'बापू' च्या बाह्यात्कारी क्रूर व करड्या दिसणाऱ्या जीवनातला एक एक पडदा दूर होऊन त्याच्या अंतःकरणा-तले सौंदर्य अखेर प्रत्ययाला येतें. एकलेपणाच्या उत्कट वातावरणामुळें या गोष्टीची परिणाम-कारकता फार वाढलेली आहे.

पत्रात्मक कथेचें तंत्रहि लीला देशमुख यांनी उत्तम रीतीनें हाताळलें आहे. "शंका आणि समाधान" ही गोष्ट पत्रात्मक आहे. प्रत्यक्ष दर्शनाच्या अभावीं केवळ वाङ्मयांत कलावंताच्या व्यक्तित्वाचें पडलेलें प्रतिबिंब पाहून एखादी दुरस्थ व्यक्ति त्यावर प्रेम करूं लागेल काय? सामान्यपणें या प्रश्नाचें उत्तर नकारात्मकच यावें असें कुणालाहि वाटेल. पण असेच मत असणारी या कथेची नायिका अखेर या प्रश्नाचे होकारात्मक उत्तर देते, नव्हे तिला तसेंच उत्तर देण्यासारखी परिस्थिति प्रणयाच्या अतर्क्य आक्रमणाने निर्माण होतें या गोष्टीला शेवटीं गमतीदार कलाटणी लेखिकेनें दिली असली तरी तिनें निर्माण केलेला प्रश्न व त्याचे होकारात्मक उत्तर याचा ठसा मनावर कायम राहतोच.

' मावीचें माहेर ' ही कथा सर्वोत्कृष्ट म्हणतां येईल. भावीच्या रुपानें लेखिकेनें एका अहंकारी पण प्रेमळ, रुसणाऱ्या पण विरघळणाऱ्या " शरचचंद्रीय " महिलेचा उत्तम नमुना मराठी वाङ्मयांत उभा केला आहे या कथेंत लीला देशमुख यांचे सारे आत्मीय गुण प्रकर्षाने प्रगट झाले आहेत. सुखवस्तु घरगुती वातावरण, साध्या पण हृद्य घटना, सूक्ष्म भावदर्शन सर्व कांहीं यांत आहे. आपल्या लेखणींत कोणते विशेष आहेत व कोणत्या विशेषांचा उत्कर्ष आपणांस उत्तम रीतीनें करतां येईल याचा पाठ म्हणून लेखिकेनें स्वतःचीच ही कथा पुनःपुन्हां वाचावी अशी शिफारस करावीशी वाटते.

सर्वच गोष्टींत आढळणारी राजकीय पुरोगामी दृष्टि व " पन्नास मिनिटें " यासारख्या कथेंत आढळणारी चिंतनशील वृत्ति कलासौंदर्यास पोषकच होतील. " वठलेला वृक्ष " यांतील आशयाला मक्कम कथासूत्राचें पाठबळ मिळालें असतें तर हीहि कथा अधिक रंगली असती. तथापि लीला देशमुख यांचा विशेष हा कीं रंजकता हा ललित वाङ्मयाचा जो प्रधान गुण तो त्यांच्या अगदीं सामान्य गोष्टींतहि प्रत्ययाला येतो. त्यांच्या भाषेचें अव्याज व निर्मळ ' मराठीपण ' कुणालाहि प्रसन्न करील असें आहे.

या संग्रहाला महाराष्ट्राचे मार्मिक समीक्षाकार प्रा. क्षीरसागर यांच्या सुंदर प्रस्तावनेची जोड लाभली आहे. कृत्रिमतेच्या बाजाराचा फोलपणा दाखवून वाङ्मयाच्या उच्च मूल्यांचें दर्शन वाचकांना ठसठसीतपणें घडवून देणें हें आपलें व्रत क्षीरसागरांनीं या प्रस्तावनेंतहि यथासांग पाळलें आहे. असो. कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, शब्दचित्र अशा ' चतुरंग ' वाङ्मयसेवेनें लीला देशमुख यांनी अल्पावधींत व अल्पवयांत मोठें यश मिळविलें आहे. तेरा कथांचा हा ' त्रयोदश गुणी ' संग्रह त्यांच्या यशांत भर घालणाराच आहे. आरंभी योजलेली उपमा पूर्ण करायची म्हटल्यास गाडींत भेटलेली चित्ताकर्षक व्यक्ति आपल्या मुक्कामाला उतरून गेल्यावर ती पुनः भेटावी अशी जशी हुरहूर लागते त्याप्रमाणे हा संग्रह वाचणारा वाचक लीला देशमुख यांच्या नव्या ललित कृतीची मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात राहील.

—गोपीनाथ तळवलकर.

सत्तावनचें स्वातंत्र्यसमर— ले.—स्वातंत्र्यवीर सावरकर; भाषांतरकार वि. त्रि. पटवर्धन, मूल्य १० रुपये.

हें पुस्तक स्वा. सावरकर यांनी इंग्लंडमध्ये असतांना इ. १९०८ मध्ये प्रथमतः मराठींत लिहिलें होतें. पण तें मुद्रित स्वरूपांत पाहण्याचा योग कांहीं झालें तरी आजवर येऊं शकला नाहीं. येवढेंच नव्हे तर मूळ मराठी हस्तलिखित अजिबात गहाळ झालें अशीच अद्याप समजूत होती. पण नुकतीच बातमी आली आहे कीं, मूळ मराठी हस्तलिखित अमेरिकेंत सांपडलें. ही बातमी खरी ठरून तें हस्तलिखित येथें यावयास आणि त्याची मुद्रित प्रत वाचावयास मिळण्याला अजून पुष्कळ अवकाश लागेल. विशेषतः जेव्हा हें पुस्तक छापावयास घेतलें व प्रकाशित केलें तेव्हा तर वरील बातमीहि नव्हती. आणि याबरील बंदी तर उठविली गेली होती. म्हणून याच्या इंग्रजी आवृत्तीवरून माझे मित्र श्री. वि. वि. पटवर्धन यांनी केलेला हा मराठी अनुवाद छापण्यांत आला. स्वा. सावरकर यांच्या व त्यांच्या या वाङ्मयअपत्याच्या पूर्वीच्या साहसी जीवनाची सांप्रतच्या पिढीस अस्पष्टच

पण औत्सुक्यपूर्ण कल्पना असल्यामुळे जनतेकडून या पुस्तकाचें स्वागत केलें गेलें असेल यांत शंकाच नाही.

या पुस्तकाचें परीक्षण करतांना पुढील मुद्यांचा अवश्य विचार केला पाहिजे. (१) भाषांतरकर्त्यांनी वापरलेलें मराठीचें इंग्रजी भाषांतर कितपत विश्वासार्ह आहे? (२) इंग्रजीचें मराठी भाषांतर कितपत बरोबर साधलें आहे? (३) प्रस्तुत पुस्तक लिहिण्यांत ग्रंथकाराचा हेतु सत्यशोधन की क्रांतीची उठावणी हा होता? (४) मग हा इतिहासग्रंथ की स्फूर्ति-ग्रंथ आहे? पहिल्या मुद्याविषयी भाषांतरकारांनी स्वच्छच सांगितलें आहे की, त्यांना मिळालेली प्रत मूळची लंडनची नसून अत्यंत अशुद्ध व अस्पष्ट अशी होती. यामुळे मूळचें भाषांतर सरस असेलच असें सांगतां येत नाही. पण कधी कधी नातवाचें आपल्या आजाशी आपल्या बापापेक्षांहि अधिक साम्य असतें आणि म्हणूनच कदाचित् आजाचें नांव नातवास ठेवण्याची प्रथा पडली असावी; तद्वत् येथेहि झालें असण्याचा संभव आहे. आतां या भाषांतरांत स्वा. सावरकर यांच्या तेजस्वी लेखणींतून उतरलेले शब्दच आहे असतील असें म्हणवत नसलें, तरी एवढें मात्र खरें की, ज्यास पुस्तकाचें पूर्ववृत्त माहीत नाही त्यास हें भाषांतर आहे असें सहसा वाटणार नाही इतकें तें बेमालूम वठलें आहे.

दुसऱ्या मुद्याचा निकाल वर सांगितल्याप्रमाणे लागला. तिसऱ्या मुद्याविषयी माझ्या मित्रांनी माहिती दिली आहे की, भारतमातेला स्वतंत्र करण्याकरिता आपल्या राष्ट्राने पुनः एकदा उठावणी करावी नि पुनः एकदा दुसरें नि यशस्वी युद्ध राष्ट्राने घडवावें हाच या ग्रंथ-लेखनामागील उद्देश असल्याचे ग्रंथकर्त्यांने स्पष्ट करून सांगितलें होतें, एवढेंच नव्हे तर ग्रंथकर्त्यांची अशीहि अपेक्षा होती की, पुढें लढल्या जाणाऱ्या स्वातंत्र्ययुद्धांत राष्ट्राची सर्वांगीण सिद्धता करण्याकरिता ज्या संघटनेचा नि कार्यपद्धतींचा अवलंब क्रांतिपक्षाच्या अनु-यायांना पुढें करावा लागेल, त्याचीहि रूपरेषा या इतिहासाचें द्वारें क्रांतिकारकांपुढे जाईल. ही माहिती खरी असेल तर—आणि बहुधा खोटी असण्याचा संभव नाही—पुस्तक लिहिण्यांतील हेतू ऐतिहासिक सत्यशोधनापेक्षा स्वातंत्र्यासाठीं करावयाच्या क्रांतीची रूपरेषा देणें व तीसाठी लागणारी स्फूर्ति सत्तावनच्या आंदोलनांतील तपशीलाच्या विशिष्ट दृष्टिकोनाने अर्थ करून मिळ-विणें हा होता हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. सत्यशोधनाचे दृष्टीने लिहिलेल्या इतिहासांतून नेहमी स्फूर्तिदायक व उत्साहवर्धक पेयांचेच घोट मिळतील असें नाही. त्यांतून कडू रसाचे घोटहि तोंड वेडेंवाकडें करून कां होईना घ्यावें लागतील. पण येथें तसें कांही करण्याची जरूरी हेतूच्या स्पष्टतेमुळे उरलेलीच नाही. ह्याचा अर्थ असा नव्हे की स्वातंत्रवीरांनी अघटि-तालाच येथे घटित बनवून त्यांतून मनमानेसा अर्थ काढला आहे. या विषयावरील ग्रंथांचें आलोडन करून त्या आंदोलनाचा तपशील व त्याचा स्फुर्तिप्रद अर्थ देण्याचा प्रयत्न केला आहे. तरीहि कांही ग्रंथ पहावयाचें राहून गेले असल्यास किंवा घटितांच्या अर्थामध्ये मतभेद झाल्यास त्याबद्दल हेतूच्या स्पष्टतेमुळे ग्रंथकारास दोष देतां येणार नाही. अर्थात् वाचकांनीहि ५७ च्या आंदोलनाचा अर्थ लावण्याचा एक प्रयत्न या दृष्टीने या पुस्तकाकडे पाहिलें तर स्वातंत्र्य-वीर त्याबद्दल वाचकांस दोष देणार नाहीत असें वाटतें. हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांत असलेला पण आजवर गुप्त व विश्वास्य म्हणून कोणासही पहावयास न मिळालेला असा पत्रव्यवहार आतां सर्वांस खुला झाला आहे तो तपासून या आंदोलनावर अभिनव प्रकाश पडतो की काय हें पाहणें आवश्यक आहे!

म. सा. प. (१०-४-५)

या ग्रंथाचा मुख्य हेतु जो स्फूर्ति येणें तो याच्या वाचनाने चांगला साधेल यांत शंकाच नाही. भाषांतराची जर ही कर्तबगारी तर स्वातंत्र्यवीरांच्या लेखणींतून उतरलेल्या मूळ ग्रंथाची योग्यता केवढी असेल! त्या मूळाचे स्वागत या भाषांतराहून अधिक प्रमाणांत होईल यांत शंकाच नाही.

ग. ह. खरे.

राजारामशास्त्री भागवत (ले० दुर्गा भागवत, एम्. ए.) प्रका० स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई ४. किं. दोन रु.

कै. राजारामशास्त्री भागवत यांचें हें छोटेसें चरित्र श्री. दुर्गा भागवत यांनी लिहिलें आहे. या चरित्रांत त्यांनी शास्त्रीबुवांचें व्यक्तिचित्रहि काढलें आहे, व त्यांच्या वाङ्मय-गुणांचें मापनहि केलें आहे. भागवत यांच्या सामाजिक मतांबद्दल दुर्गाबाई यांना पराकाष्ठेचा अभिमान वाटत आहे व तो आपुलकीच्या भावनेमुळे द्विगुणित झाला आहे असें या चरित्रावरून दिसून येईल. परंतु हा अभिमान व ही आपुलकी आपल्या सारासार–विवेकांच्या आड त्यांनी कोठेहि येऊं दिलेली नाही. दुर्गाबाई यांचें लिहिणें भावनेनें आर्द्र असूनही अत्यंत निस्पृहपणाचें आणि स्वतंत्र बाण्याचें आहे. कै. भागवत यांची महाराष्ट्रीय सुशिक्षितांनी आतांपर्यंत उपेक्षाच केली आहे असें त्यांचें म्हणणें आहे.

" महाराष्ट्राच्या वाङ्मयक्षेत्रांत निष्ठेने व निरपेक्ष बुद्धीने हमाली केलेल्या (या) साहित्यिकाची कोणाला माहिती आहे? आपलें सारें आयुष्य मराठी भाषेसाठी कष्ट करण्यांत घालविलेल्या या लेखकाचा वारसा उचलण्यास कोणते साहित्यिक पुढे आले? लेखणी, वाणी आणि करणी पणाला लावून कोणत्या कार्याचा पाया त्यांनी घातला याची नोंद कोणी ठेविली आहे? अशी तक्रार श्री. दुर्गाबाई यांनी प्रस्तावनेंत केली आहे, आणि असें मत सांगितलें आहे कीं, " मराठी भाषेच्या निबंध–कालांत शास्त्रीबुवांचें स्थान स्वतंत्र आणि अढळ आहे. इतकेंच नव्हे तर तें उच्चहि आहे ... शास्त्रीबुवांचीं मतें म्हणजे जळती मशाल. विध्वंसक रूढीला आग लावून विधायक कार्याचा मार्ग सतत उजळून ठेवण्याचें सामर्थ्य त्यांच्या मतांत आणि कृतींत होतें. "

दुर्गाबाई यांनी आपल्या कुळांतील या थोर पुरुषांची ओळख करून देण्याचें काम स्वतःच पत्करलें हें फार बरें झालें. कै. राजारामशास्त्री यांच्या संबंधाने त्यानी दिलेली माहिती अर्थात्च साधार असली पाहिजे आणि त्यांनी शास्त्रीबुवांच्या मतासंबंधाने प्रगट केलेले अभिप्राय निर्विकार असले पाहिजेत हें कोणीहि मान्य करील.

शास्त्रीबोवांच्या जीवितांतील. कांही ठळक ठळक प्रसंगाचे सन येथें एकत्र करून देतों:—

इ. स. १८५१ सालीं शास्त्रीबोवांचा जन्म झाला. १८६७ त त्यांची प्रवेश–परीक्षा झाली. १८७५ त त्यांनी शिक्षकाचा धंदा पत्करला. १८७७ त मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजांत संस्कृतच्या अध्यापकाची जागा त्यांना मिळाली. १८८४ त कै. खोत व शास्त्रीबोवा यांनी 'बॉम्बे हायस्कूल' नांवाची संस्था काढली. तेथे पटेनासे होऊन १८८६ त त्यांनी मराठा हायस्कूल काढलें. याच सालीं विधवा-विवाहाला प्रतिकूल असें एक पुस्तक त्यांनी प्रसिद्ध केलें. १९०१ सालापासून त्यांचें 'संमिश्र' विचाराचें सामाजिक लिखाण पुनः चालूं झालें.

१९०२ सालीं मुंबई विद्यापीठानें त्यांना विल्सन फायलॉलॉजिकल लेक्चरर म्हणून नेमिलें. १९०३ सालीं विवाह व लग्न आणि विधवाविवाह असे दोन लेख त्यांनी लिहिले. त्यांत विवाहाचे वैदिक मंत्र कुमारीच्या लग्नालाच उद्देशून म्हटले आहेत, विधवेच्या नव्हेत, असें त्यांनी प्रतिपादन केलें आहे. तरीपण विधवाविवाहाला श्रुतींत आधार आहे असें त्यांनी उदाहरणें देऊन दाखविलें आहे. विधवाविवाह अजून पूर्णपणें त्यांना मान्य नव्हता. १९०५ सालीं त्यांनी विधवाविवाह सशास्त्र आहे इतकेंच नव्हे तर तो योग्य आहे असें प्रतिपादन केलें. १९०८ सालीं शास्त्रीबुवा कालवश झाले.

श्री. दुर्गाबाई यांनी शास्त्रीबुवांचीं जीं सामाजिक मतें दिलेलीं आहेत तीं साराशरूपानें पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

" स्त्रियांच्या विषयीं शास्त्रीबुवांस फार आदर असे. आपल्या मुलीची ते मुंज करणार होते......पण इतकें मात्र खरें कीं एकंदर स्त्रियांच्या प्रश्नाला आगरकर व कर्वे यांच्या इतकें महत्त्व त्यांनीं दिलें नाहीं. ब्राह्मणेतरांचा प्रश्न शास्त्रीबुवांना फार जिव्हाळ्याचा वाटे. ब्राह्मणेतर शब्द देखील प्रथम त्यांनींच रूढ केला. क्षत्रियांबद्दल ते असें म्हणत कीं त्यांची पायरी ब्राह्मणांच्या वरची आहे. जातीभेदावर त्यांचा मोठा कटाक्ष असे. परंतु वैदिक वर्णाश्रम धर्मावर त्यांचा विश्वास होता. मूळचे धर्म व हल्लींच्या जाती एक नव्हत असें त्याचें म्हणणें होतें. गुण व कर्म यांवर वर्ण उभारलेले होते व वेदांत अस्पृश्यतेला काडीमात्र आधार नाही असें त्याचें मत होतें. शास्त्रीबुवांना विरोध करणाऱ्या पुण्याच्या मण्डळींत विष्णुशास्त्री चिपळूणकरांसकट एकहीजण त्यांच्या इतका व्यासंगी किंवा स्वतंत्र बुद्धीनें विचार करणारा नव्हता. ब्राह्मणांच्या पोटजातींची एकी विवाहानें केली पाहिजे असें त्यांचें मत होतें. ब्राह्मणांनी मांसाशन करावें असें त्याचें मत होतें. बौद्ध व जैन धर्मांबद्दल शास्त्रीबुवांचें चांगलें मत नव्हतें. गायत्रीचा मंत्र त्यांना फार मोलाचा वाटे. पोटजातींत विवाह झाले तर मोठमोठ्या जाती तरी एकवटतील असें शास्त्रीबुवांनी म्हटलें आहे. मिश्र विवाहाबद्दल मात्र त्यांनी कांहीच मत प्रदर्शित केलेलें नाही. ते ठाकुरद्वाराला रस्त्यांत उभे राहून इराण्याचा चहा व पाव खात, महाराकडे फराळ करीत."

शास्त्रीबुवांच्या धार्मिक मताची, ऐतिहासिक अनुमानांची आणि विद्याव्यासंगाची छाननी करतांना दुर्गाबाई यांनी प्रकट केलेले विचार पुढे दिल्याप्रमाणें आहेत. हे विचार वेंचून घेताना खुद्द शास्त्रीबुवांच्या मतांना किंवा दुर्गाबाई यांच्या अभिप्रायांना कोठे दंश होऊं नये अशी दक्षता मी ठेविली आहे. पुढील सर्व मजकूर अवतरणचिन्हांकित आहे याकडे वाचकांनीं कृपाकरून लक्ष ठेवावें.

" शास्त्रीबुवांच्या धार्मिक भूमिकेची व त्यांच्या बदललेल्या मतांची छाननी करणें हें फार बिकट काम आहे. श्रुति व स्मृति यांत सांगितलेला धर्म हा खरा धर्म आहे व मूर्तिपूजा गौण असली तरी शास्त्रविहित असून उपयुक्त आहे असें त्यांचें मत होतें. चालू शिमग्यांतला अत्याचार आणि किंचित दुराचार दिसतो तो वजा केला असतां बाळगोपाळांस, राजारंकांस सारख्या रीतीनें रमविणारा दुसरा सणच नाही असें त्यांनी म्हटलें होतें. शेवटीं शेवटीं हिंदुधर्म हा अधर्म आहे असें न कचरतां त्यांनी लिहिलें. शास्त्रीबुवांचा उपनिषदांचा अभ्यास श्रद्धेवर आधारलेला आहे. प्राकृतभाषा या संस्कृतभाषेपूर्वीच्या लोकभाषा आहेत हें प्रतिपादन करणारे शास्त्रीबुवा पहिलेच भाषापंडित झाले. एक भवभूति सोडल्यास काव्य नाटकांबद्दल शास्त्रीबुवांना कमालीचें वैषम्य वाटे. संस्कृत भाषा नको अशाच्याचीं नऊ कारणें शास्त्रीबुवांनी दिलीं आहेत.

त्यांचा आशय असा आहे कीं संस्कृत साहित्याचें अध्ययन आमच्या राष्ट्रीय वाण्यास व संस्कृतीस विघातक आहे. संस्कृत भाषेच्या व्युत्पत्तीसंबधानें लिहितांना भाषाशास्त्राच्या मर्यादेबाहेर पाऊल टाकून अनेक जातिविषयक प्रश्नांचा उहापोह केला आहे. डॉ. भांडारकरांचीं या विषयावरील व्याख्यानें अधिक मुद्देसूद असून संस्कृत, प्राकृत व आधुनिक प्रांतीय भाषा यांचें विवेचन त्यांनी अधिक स्पष्टपणें केलेलें आढळतें. या व्याख्यानांत शास्त्रीबुवांनी केलेलें लोकांचें वर्गीकरण बरेचसें अनुमानावरच आधारल्यामुळे आक्षेपार्ह वाटतें."

"वैदिक देवतांचें शास्त्रीबोवांनी केलेलें वर्णन फक्त ऋग्वेदावरच आधारलेलें आहे व त्या त्या देवतेचीं सर्व अंगें उपांगें लक्षांत घेऊन केलेलें नाहीं त्यामुळे त्यांचीं विधानें अपुरीं वाटतात. कालिदासाच्या शाकुंतलास पानचट व अश्लील म्हणणाऱ्या शास्त्रीबोवांस सप्तशतींतला शृंगार कसा मानवला असावा हें गूढ वाटतें. हें त्यांच्या पूर्वग्रहाचें एक उत्तम उदाहरण आहे. मराठी भाषेच्या उत्क्रांतीबद्दल शास्त्रीबोवांचें लिखाण मौल्यवान आहे यांत शंका नाहीं. पण त्यांच्या अभ्यासांत एक मोठी उणीव दिसून येते; ती ही कीं, त्यांनी ऐतिहासिक गद्य वाङ्मयाची उपेक्षा केली आहे. मराठी भाषेची त्यांनी केलेली सेवा अमूल्य असली तरी त्यांची दृष्टि व्यापक नसल्यानें वेळोवेळीं त्यांचीं मतें पारखून घ्यावीं लागतात. इंग्रजी वाङ्मयाच्या आधारानें बाहेर पडूं लागलेलें काव्य, कथा, कादंबरी व निबंधरूपी वाङ्मय त्यांना आकलितां आलें नाहीं. संस्कृत कवींच्या स्त्रीलंपटपणामुळेच काव्यांत शृंगाराचें स्तोम अवास्तव माजलें व त्यामुळे त्याला रसांत अग्रस्थान मिळालें असें शास्त्रीबुवांचें मत होतें. भक्तिरसाच्या समर्थनार्थ त्यांनी जीं कारणें दिलीं आहेत तीं शास्त्रीय स्वरूपाचीं नसून बरीचशी वैयक्तिक मतावर व आवडीवर उभारलेलीं आहेत. महाराष्ट्राच्या घडामोडीचा संगतवार इतिहास शास्त्रीबुवांस लावतां आलेला नाहीं किंबहुना लोकजागृति हेंच त्यांच्या ऐतिहासिक लेखनाचें ध्येय असल्यामुळे अव्वल दर्जाच्या इतिहासकाराची भूमिका त्यांना राखतां आली नाहीं. महाराष्ट्रासंबंधानें त्यांची भावनावशता, विशिष्ट संस्कृत ग्रंथांबद्दलचीं त्यांचीं पूर्वग्रहदूषित मतें, पुराणाबद्दलचा त्यांचा तिटकारा आणि इतर प्रांतांबद्दल त्यांस वाटणारें औदासिन्य यामुळे प्रतिभा व व्यासंग असूनदेखील त्यांचें हें अव्वल दर्जाचें संशोधन आहे असें म्हणतां येत नाहीं. साधकबाधक प्रमाणानें जरूर विचार करावयास हवा, त्या दृष्टीनें शास्त्रीबुवांचें लिखाण एकांगी वाटतें. गोपाळकृष्ण, कृष्णद्वैपायन व अर्जुन इत्यादि सर्व 'काळ्या' विभूतींना शास्त्रीबुवांनी महाराष्ट्रियांचे पूर्वज बनविलें आहे. पण शास्त्रीबोवांनी या विधानास दिलेलीं सर्व कारणें लक्षांत घेतलीं तरी देखील त्यांस पुष्टि मिळत नाहीं. अशा रीतीनें पायाच डळमळीत राहिल्यामुळे त्यांचें प्रत्येक विधान पूर्णपणें पारखून घ्यावें लागतें. मराठेशाहीवरचें शास्त्रीबुवांचें लिखाण सुबोध आणि चांगलें असलें तरी स्वतंत्र अभ्यासाचें द्योतक नाहीं. त्यांनी आधारग्रंथ दिलेले आहेत ते बहुतेक इंग्रजी आहेत. त्यांनी प्रत्यक्ष बखरी वाचून थोडेंच लेखन केलेलें आढळतें. ह्यावरून ते स्वयंसिद्ध इतिहासकार नसून इतिहासाचे निस्सीम भोक्ते होते असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. शिवाजीविषयीं शास्त्रीबुवांना कमालीचा आदर वाटे. त्यांच्या हयातींत चंद्रराव मोऱ्याचा वध हेंच त्यांच्या मतें काय तें एक किल्मिष होतें. संभाजीवर शास्त्रीबुवांचा मोठा रोष होता. त्याच्या वधासंबंधानें शास्त्रीबुवांस कांहीं अनुकंपा वाटलेली दिसत नाहीं. राजाराम व ताराबाई ह्यांच्याबद्दल शास्त्रीबुवांस सहानुभूति वाटत असे. पण शाहूबद्दल मात्र त्यांस तसें प्रेम वाटत नसे. ताराबाई व शाहू या दोघांना धाब्यावर बसवून पेशव्यांनी मराठ्यांची गादी बळकावली म्हणून त्यांना पेशव्यांचा

फार राग येत असे. स्वामिद्रोहाच्या या पापाचें फळ कुलक्षयाच्या रूपाने पेशव्यांस भोगावें लागलें असें आपल्या लेखांत ते वारंवार प्रतिपादन करीत. शिवाजीने रक्ताचा एक थेंबहि न पाडतां मराठी पातशाहीचा पाया घातला असें शास्त्रीबुवा म्हणतात. ' मराठ्यांच्यासंबंधाने चार उद्गार' हें पुस्तक सकृद्दर्शनीं संशोधनात्मक वाटलें तरी यांतील संशोधनाचा भाग बराचसा वरवरचा आहे......संशोधकाची उच्च भूमिका त्यांना या ग्रंथांत राखतां आली नाही. 'शककाल विचार' या लेखांत शास्त्रीबुवांची प्रकृति विषयांतराकडे बरीच दिसून येते. नंदराजे शूद्र होते याबद्दल अवास्तव चर्चा, मौर्य हें नांव मोरे यावरून आलें याबद्दल व्युत्पत्तीचा आधार इत्यादि या लेखांत दूरान्वयी मुद्दे बरेच असल्यामुळे टीकाकारांची आयतीच सोय झाली आहे. यदुक्षेत्र कोणतें व त्यांत ब्राह्मण आले केव्हां ह्या लेखमालेंतील असंबद्ध व्युत्पत्तीने भरलेले दोन तीन लेख आहेत.''

वरील सर्व मजकूर वाचून कै. शास्त्रीबोवांच्या संबंधाने मनांत आदरबुद्धि बाळगणाऱ्या अनेक वाचकांच्या मनांत थोडी चमत्कारिक कालवाकालव उत्पन्न होईल असा माझा अंदाज आहे. शास्त्रीबोवा यांची सामाजिक आणि धार्मिक मतें सुधारणेच्या बाबतींत फार पुढे गेलेली होतीं असें जें आपण आजपर्यंत ऐकत होतों तें तितकेंसें बरोबर नाही असें त्यांना वाटूं लागेल आणि भागवत यांच्या व्यासंगासंबंधाने दुर्गाबाई यांनी प्रदर्शित केलेले अभिप्राय वाचून तर त्यांच्या मनाला मोठा धक्काच बसेल. पण याला कोणाचाच इलाज नाही. दुर्गाबाई यांच्या ठिकाणीं सहानुभूतीचा ओलावा पुष्कळ आहे. परंतु त्यांची निर्णयबुद्धि अत्यंत प्रखर आहे आणि म्हणून भागवत यांच्याविषयी आदरबुद्धि बाळगूनसुद्धां जेथें जें मत प्रकट करावयास हवें तेथें तें त्यांनी निस्पृहपणाने केलें आहे. सहानुभूतीचा मोह आवरणें ही गोष्ट सामान्य नाही. पण दुर्गाबाई यांनी तो मोह आवरला आणि आपली निर्णयबुद्धीच शेवटी प्रमाण मानली यासाठीं या चरित्राचा प्रत्येक वाचक त्यांचें मनापासून अभिनंदन करील.

मला असें वाटतें कीं शास्त्रीबुवांच्या बुद्धिगुणांपेक्षां त्यांचे हृदयधर्म अधिक उज्वल होते. त्यांना अन्यायाची चीड असे आणि आपत्तींत सापडलेल्या लोकांच्या संबंधाने त्यांना पराकाष्ठेचें ममत्व वाटत असे. आपण सध्यां जिला मानवता मानवता, म्हणून म्हणतों तिचें स्फुरण शास्त्रीबुवांच्या चित्तांत सदैव झगझगत होतें व हेंच त्यांच्या सामाजिक सुधारणा–बुद्धीचें उगमस्थान होय. दुर्गाबाई यांनी एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं मतप्रदर्शनाच्या कामीं शास्त्रीबुवा फार घाई करीत असत. नातीनें दिलेला आजोबावरचा हा अभिप्राय वाचतांना मनाला थोडा आचका बसतो हें खरें; पण नातीचा हा अभिप्राय बरोबर मात्र आहे. आणि शास्त्रीबोवा मतप्रदर्शनाच्या कामीं फार घाई करीत याचें कारण तरी इतकेंच कीं अन्यायाची चीड आणि सहानुभूतीची भावना हे त्यांचे विकार फार प्रखर असत, असें दुर्गाबाई यांच्या लिखाणावरून दिसून येतें. शास्त्रीबोवा यांनी व्यक्त केलेल्या मतांत अस्पृश्यतानिवारणासंबंधाचें त्यांचें मत शेवटपर्यंत ग्राह्य ठरत गेलें आहे. काळानेच हा निकाल त्यांच्या बाजूनें दिला आहे. पुनर्विवाहाविषयीं आपल्या मताचा निकाल करावयास त्यांना १९०५ साल उगवावें लागलें, याचा मात्र अतिशय विस्मय वाटतो. आगरकरांच्या जोरदार प्रतिपादनाचा सगळा लोंढा आंगावरून पुरता वाहून गेला तरी १९०५ सालापर्यंतसुद्धां बालविधवेचें लग्न करावें कीं नाही यासंबंधाचा निश्चय त्यांना करतां आला नाही! पण याहि ठिकाणीं टीकाकारांनी सावध असावयास हवें, जो ज्या परिवेषांत जन्माला आलेला असतो, आणि ज्या परिस्थितीचे व

शिक्षणाचे संस्कार त्याचे मनावर झालेले असतात, ते सर्व झाडत झाडत त्याला पुढें जावें लागतें. हे क्लेश शास्त्रीबुवांना फार दिवस सोसावे लागले असें दिसतें. असो, वाङ्मय, इतिहास, भ्युत्पत्ति, समाजरचना इत्यादि विषयांवरचींही त्यांचीं मतें कोणी प्रमाण मानील असें वाटत नाही.

दुर्गाबाई यांनी महाभड दिलेले शेरे वाचले म्हणजे कै. राजारामशास्त्री यांची सुशिक्षितानी उपेक्षा केली या त्यांच्या तक्रारीतील सारा जोर लयास जातो असें वाटतें. जीं मतें दुर्गाबाईनासुद्धां बिलकूल मान्य नाहींत तीं महाराष्ट्रांतील विद्वानांनी मान्य करावीं आणि मोठमोठाल्या पंडितांना योग्य असलेला मान सुशिक्षितांनी भागवतांना द्यावा अशी अपेक्षा दुर्गाबाईनी का बरें करावी? पण त्यांचे हे अभिप्राय वाचल्यानंतर भागवतांचे मूळ ग्रंथच आपण वाचले पाहिजेत अशी ऊर्मि कोणाच्या मनांत उत्पन्न झाली तर दुर्गाबाई यांनासुद्धां आनंदच वाटेल. भागवतांचें खरें बळ माझ्या मतानें कोणचें हें मीं वर सांगितलेंच आहे.

श्री. म. माटे.

आचार्य कृपलानी (निवडक भाषणें व लेख यांचा संग्रह) :
संपा० व अनु० श्री. माऊ धर्माधिकारी, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुष्प ४० वें; मूल्य ३ रुपये.

हिंदुस्थानचें स्वातंत्र्य आणि विच्छेदन ज्यांच्या कारकीर्दीत झालें अशा जबाबदार कॉंग्रेसपतीच्या निवडक भाषणांच्या व लेखांच्या संग्रहाने मराठी भाषेच्या वैभवांत भरच पडली आहे. एक निष्ठावन्त राष्ट्रसभासेवक आणि गांधीजींच्या अनुयायांपैकीं एक तर्कवादी 'प्रोफेसर' अशा भूमिकेंत आचार्य कृपलानी आपणापुढे आहेत. शिवाय नुकताच त्यांनी राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या नांवाभोवती एक निराळेंच वलय निर्माण झालेलें आहे. अशा वेळीं प्रस्तुत संग्रहाने त्यांच्या मनाची घडण समजून घ्यायला फारच मदत होणार आहे. त्यांचे "गांधीजी"विषयक लिखाण पुस्तकरूपाने मराठींत अन्यत्र प्रसिद्ध झालेंच आहे. या संग्रहांत त्यांचे इतर विशेष प्रतिबिंबित झालेले आपणांस आढळतील.

जुने पुढारी नको असतील तर त्यांना बदलण्याचा मार्ग म्हणून श्री. कृपलानींनी नव्यांनी सेवाभावाने त्यांची उमेदवारी करीत करीत त्यांचा विश्वास संपादावा व मग त्यांच्याकडूनच नेतृत्वाची वस्त्रें मिळवावी असे आपल्या "हिंदी राष्ट्रीय सभा" या प्रदीर्घ लेखांत प्रतिपादिलें आहे. स्वतः आचार्यांनी त्याच मार्गाचा अवलंब केलेला आहे. ते गांधीजींच्या अत्यंत विश्वासांतील असून त्यांनी आज अनेक वर्षें राष्ट्रसभेच्या प्रमुख कार्यवाहाचें बिकट काम प्रत्यक्षपणें करून दाखविलें आहे. हें प्रत्यक्ष संघटनेचें कार्य होय. पण त्यांनी विधायक कार्यहि केलें असून त्यामुळे जनतेच्या मानसिक व नैतिक मूल्यांत फरक घडवून आणण्याची खटपटहि केली आहे. "अहिंसक क्रांति" या लेखांत त्यानी या उभयविध कार्याचा विचार केलेला आहे. "राजकारण आणि अध्यात्म" या लेखांत अध्यात्माचा लौकिक अर्थ आणि राजकारणाचें आध्यात्मीकरण यांतील अर्थ यांचे स्पष्टीकरण केलेलें असून राजकारणांत आणावयाचें अध्यात्म वैयक्तिक आत्मसाक्षात्कारवादी नसून समूहमानसांतील सामाजिक मूल्यकल्पनांचें उदात्तीकरण होय असें प्रतिपादिलें आहे. "राजकारणाला आध्यात्मिक बनवा असें जेव्हा सांगण्यांत येतें तेव्हा त्याला नैतिक बनविलें पाहिजे असाच कदाचित् सांगणाऱ्यांचा भाव असतो." "अध्यात्माचें मूलक्षेत्र मुख्यत्वें मनुष्यहृदयाचें आंतर जीवन हें आहे. पण राजकारणाचा मूळ संबंध समूहाशीं म्हणून शेवटीं त्याच्या सामाजिक बाह्य जीवनाशीं आहे." पण त्यानी नीतिधर्म व आध्यात्मिकता यांमधील संबंध मात्र संपूर्णपणें अमान्य केला नाही. आणि

पूर्वीच अनुवादित झालेले "आकाशांतील फुलें आणि पृथ्वीवरील तारे" व "गांधीजींचें पारिवें दर्शन" हे दोन्ही लेख यांत पुन्हा संग्रहीत केलेले आहेत. तें विविधतेच्या व प्रातिनिधिकतेच्या दृष्टीने योग्यच आहे. यांतील पहिल्या लेखांत श्री. कृपलानींचें भावना-जीवनहि आपणांस दिसतें. तो सबंध लेख मोठा काव्यमय झाला आहे. इतर तर्कप्रधान लेखनाच्या परिसरांत हे दोन लेख भावकोमल म्हणून निराळेच उठून दिसतात.

या संग्रहाला संपादक-अनुवादकांनी एक विस्तृत प्रस्तावना जोडली आहे. श्री. काका कालेलकरांचा कृपलानी-परिचयहि सोबत दिला आहे. हे दोघे आचार्य दीर्घकालीन मित्र आहेत. आचार्य कृपलानींनी श्री. कालेलकरांचाहि आपल्या "जुने दोस्त" या लेखांत प्रेमाने उल्लेख केला आहे.

शेवटी एक उतारा देऊन त्यांनी दिलेल्या राजीनाम्यामागील मनोवृत्ति कळते की काय तें पाहूं या. कारण बऱ्याच वर्षांपूर्वी लिहिलेल्या "हिंदी राष्ट्रीय सभा" या लेखांत त्यांनी नेतृत्व व जबाबदारी यांसंबंधी विवेचन केलें आहे. त्यांत ते म्हणतात : "नेतृत्व राहावयाचें तें वर्किंग कमिटीकडेच राहिलें पाहिजे...बिकट परिस्थितींत आदेश देण्याची व कृति करण्याची कुवतहि तिच्या ठायीं असली पाहिजे...सभासदांत परस्परांविषयीं विश्वास आणि समजूत घेण्याची वृत्ति पूर्णपणें बाणलेली असली पाहिजे. देशांत त्याचें स्थान कांहीहि असो, त्यांनी कोणत्याहि कारणाकरिता स्वतंत्र व्यक्ति या नात्याने वागतां कामा नये..." असे विचार असल्यामुळें मतभेदांचें कारणच नाहीसें करून टाकावें म्हणून आचार्य कृपलानी या व्यक्तीने राजीनामा देऊन वर्किंग कमिटीच्या मार्गांतील अंतराय दूर केला. पण तसें करतांना पक्षाची संघटित संस्था व पक्षाचें सरकार यांमधील संबंधाचें जें नवीन वातावरण निर्माण झालें आहे त्याबद्दल सर्वांस विचार करावयास लावलें आहे. वरील लेखांत स्वाभाविकपणेंच त्याचा विचार आलेला नाही. पण बीज रूपाने तो सूचित झालेला आहे. संस्थेचें सर्वोपरित्व हाच तो त्यांचा विचार.

ना. ग. जोशी

आचार्य परीक्षेसंबंधी सूचना

गेल्या दोन वर्षांचे या परीक्षेचे निकाल ध्यानांत घेतल्यावर परीक्षा समितीने या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांसाठी नवीन नियम वगैरे योजना करण्याचे ठरविलें आहे. तरी यासंबंधींची चौकशी कार्यालयाकडे केल्याविना उमेदवारांनी परीक्षेसाठीं अर्ज करूं नये.

चिटणीस
म. सा. परिषद्

—शोकसमाचार—

(१) ना. वि. कुलकर्णी—हे मराठी कादंबरीकार ता. १२ जानेवारी १९४८ रोजीं कालवश झाले. सातारा जिल्ह्यांतील सुरली गांवचे हे राहणारे. ' गोविंदानुज ' ह्या सहीने एक काळीं त्यांच्या कविता प्रसिद्ध होत असत. तथापि कथावाङ्मय हेंच त्यांचें प्रधान कार्य आणि हेंच त्यांच्या उपजीविकेचें साधन ठरलें. सामान्य कुटुंबियांच्या सुखदुःखांशी त्यांची लेखणी समरस होऊन श्रमत राहिली. त्यांनीं आपल्या महाराष्ट्र कुटुंब मालेंतून प्रसिद्ध केलेल्या मजूर, कारकून, शिपाई, वगैरे कादंबऱ्या ह्याची साक्ष देतील. चित्रपटकथाहि त्यांनी लिहिल्या. " अयोध्येचा राजा " ही चित्रपटकथा त्यांना विशेष यशोदायक झाली. नाटककार म्हणूनहि त्यांनी बरेंच श्रेय संपादिलें असून सांगली येथें भरलेल्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपदाचा मान त्यांना मिळाला होता.

मराठीचें क्षेत्र आणि मराठी वाचकांची स्थिति ही दोन्हीं माफकच असल्यामुळें वाङ्मयावर उपजीविका करणें मराठी साहित्यिकांना अवघड जातें. तथापि " स्वयेंचि कष्टत गेला ! तोचि भला " अशा दृष्टीने श्री. कुलकर्णी सर्वांच्या आदरास पात्र असत. पण प्रसिद्धीच्या प्रांगणांत पुढेंपुढें करणारे ते नव्हते. भपका त्यांना मान्य नसे. साधेपणा हा त्यांच्या वाङ्मयनिर्मितीचा तसाच चारित्र्याचाही गुणविशेष होता.

(२) वि. ल. बरवे (कवि आनंद)—श्री. कुलकर्णी यांच्या पाठोपाठच म्हणजे ता. २६ जानेवारी १९४८ रोजीं. चिपळुणचे वि. ल. बरवे ह्यांचें देहावसान झालें. कवि आनंद ह्या नावाने ते विशेष विश्रुत होते. लघुनिबंध, लघुकथा इत्यादि गद्य वाङ्मयप्रकारांत त्यांची लेखणी चालत असे. त्यांचे त्या वाङ्मयप्रकारांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. तरीपण त्यांची वृत्ति कवितेइतकी अन्य वाङ्मयप्रकारांत रंगत नसावी. कोंकणी जीवनाचे पाझर त्यांच्या वाङ्मयांत खळाळत आहेत. भाषा शाहिरी घाटणीची आणि वृत्ति रंगेली. तडफही तशीच असे. 'समता' ह्या आपल्या कवितेबद्दल " ही पोरगी जराशी बोल्शेव्हिक घाटाची आहे " असें त्यांनींच म्हटलें आहे. तरीपण केशवसुतांनी प्रवर्तिलेल्या मूर्तिभंजक युगाचे हेही एक पुरस्कर्ते होते असेंच कोणीही त्या कवितेवरून म्हटलें असेल.

(३) श्री. काशीबाई कानिटकर—ह्या विदुषी ता. ३० जानेवारी रोजीं दिवंगत झाल्या. कै. गोविंदराव कानिटकर ह्या जुन्या पिढींतील नामवंत कवीच्या ह्या पत्नी. पतीच्या संगतीने आणि हरिभाऊ आपटे ह्यांच्यासारख्या बंधुतुल्य स्नेह्यामुळें काशीबाईंना साहित्यसेवेची प्रेरणा लाभली. "पालखीचा गोंडा" ही त्यांची कादंबरी त्याकाळीं कुतूहलाचा विषय होती. याशिवाय रंगराव, सती विरक्तीचें आत्मवृत्त, इत्यादि साहित्य त्यांनीं निर्मिलें आहे. निधन-समयीं काशीबाईंचें वय अठ्याऐंशीच्या आसपास होतें.

ह्या साहित्यिकांच्या निधनाने मराठी वाङ्मयाच्या झालेल्या हानीबद्दल कोणासहि हळहळ वाटल्याशिवाय राहिली नसेल.

—संपादक

महाराष्ट्र-साहित्य-परिषद्

घटना

[कोल्हापुरी ता. २८-१२-३२ च्या साधारण सभेने मंजूर केलेल्या व नागपुरास ता. २४-१२-३३ च्या वार्षिक साधारण सभेत दुरुस्ती झालेल्या परिषदेच्या घटनेची पुन्हा दुरुस्ती जळगांवी ९-११-३६ या तारखेस वा. सा. सभेने केली. ही दुरुस्त केलेली घटना ता. १-१-३७ पासून अंमलांत आली. ता. ७-२-३७ च्या वि. सा. सभेत व ता. ७-४-४१ च्या वा. सा. सभेत कांही दुरुस्त्या करण्यांत आल्या. नंतर धुळे येथें ता. २५-१२-४४ रोजीं भरलेल्या वा. सा. सभेत घटनेंतील सरनाम्यांत दिलेलें संमेलन-परिषद् ऐकात्मतेचें ध्येय सिद्ध होण्याचा विचार करण्याची वेळ व परिस्थिति प्राप्त झाली आहे असा ठराव झाला. त्या ठरावान्वयें परिषदेची ता. ३१-३-४५ रोजीं वि. सा. सभा भरून संमेलन-परिषद् ऐकात्मता समिति घटनेंत योग्य त्या दुरुस्त्या करण्यास नेमण्यांत आली. त्या समितीने तयार केलेली घटना परिषदेच्या ता. २३-९-४५ च्या वि. सा. सभेत संमत करण्यांत आली. पुढे बेळगांव येथे भरलेल्या परिषदेच्या वा. सा. सभेत घटनेमध्यें बदल करण्यासाठी एक समिति नेमली गेली. त्या समितीने केलेल्या शिफारशी परिषदेच्या ता. १२-१-४७ रोजीं भरलेल्या वि. सा. सभेमध्ये विचारांत घेण्यांत आल्या, व प्रस्तुत घटना संमत करण्यात आली.]

१. नांवः —महाराष्ट्र-साहित्य-परिषद्.

२. उद्देशः—मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न करणें, उपाय योजणें, व इतर रीतीने झटणें आणि त्यांच्या अभ्यासाउ प्रोत्साहन देणें हे परिषदेचे प्रधान उद्देश आहेत.

३ साधनें—वरील उद्देश साध्य होण्याकरितां व त्यास अनुसरून खालील, तसेंच इतर अवश्य व योग्य वाटतील त्या साधनांचा उपयोग करणें.

(अ) दरसाल परिषदेची प्रादेशिक व अखिल महाराष्ट्रीय संमेलनें भरविणें व भर-विण्यास प्रोत्साहन देणें.

(आ) ठिकठिकाणीं परिषदेच्या शाखा-सभा स्थापन करणें, व स्वतंत्र रीतीने कार्य करणाऱ्या साहित्य-संस्था संलग्न करून घेणें, वं सहकारी म्हणून जोडून घेणें.

(इ) अन्य भाषांच्या साहित्य संस्थांशी व साहित्यविषयक चळवळींशी अवश्य व शक्य असेल तेथे सहकार्य करणें.

(ई) व्याकरण व कोश, इतिहास, विज्ञान व समाजशास्त्र, तसेंच कला, साहित्य इत्यादि विषयांवरील ग्रंथ लिहून घेणें, प्रसिद्ध करणें व अशा तऱ्हेच्या ग्रंथनिर्मितीस द्रव्य-द्वारां अगर अन्य रीत्या साहाय्य करणें.

(उ) ज्ञानाचीं सर्व साधनें मराठी वाचकांना सुलभ करून देण्याकरिता चर्चा, उत्सव व प्रदर्शन आदि प्रसंग घडवून आणणें; मासिकें, नियतकालिकें चालविणें; संशोधनास मदत व उत्तेजन देणें.

(ऊ) शास्त्रीय विषयांची परिभाषा ठरविणें व पारिभाषिक कोश तयार करणें.

(ए) प्राचीन व अर्वाचीन मराठी, तसेंच अन्य भाषांतील नामवंत लेखक व ग्रंथकार यांचीं चरित्रें व त्यांच्या साहित्याची माहिती मराठी वाचकांस उपलब्ध करून देणें.

(ऐ) मराठी भाषेच्या व साहित्याच्या आड येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी जरूर ती उपाययोजना करणें. तसेंच मराठी भाषा बोलणाऱ्या बहुजनसमाजाचा पाठिंबा मिळावा म्हणून अशा प्रश्नाविषयी योग्य व शक्य त्या साधनांनी जागृति उघडून आणणें.

(ओ) सामान्यतः परिषदेचे उद्देश साध्य होण्याकरिता जरूर वाटतील त्या सर्व गोष्टी करणें.

४. वर्षगणनाः— परिषदेचें वर्ष १ एप्रील ते ३१ मार्च असावें.

५. कचेरीः—परिषदेची मुख्य कचेरी पुणें येथे राहावी. परिषदेचें शिलकी दप्तर, पुस्तकालय आणि परिषदेची जी इतर जिंदगी वगैरे, परिषदेची साधारण सभा नेमून देईल, त्या सर्वांचा संग्रह आणि संरक्षण या मुख्य कचेरींतच होईल. शिवाय या कचेरींत परिषदेचा इतर कोणताहि व्यवहार साधारण सभेच्या ठरावान्वयें चालवितां येईल. परिषदेचें चालू काम व चालतें दप्तर किंवा अन्य कांही विवक्षित कार्यें हीं परिषदेच्या साधारण सभेने तसा स्पष्ट ठराव केल्यास अन्य स्थळीं त्या ठरावाने चालवितां येतील. अशा वेळीं मुख्य कचेरी आणि फिरत्या पोटकचेऱ्या यांचे संबंध सुसूत्र राहण्यासाठी वेळोवेळीं साधारण सभेने निर्बंध घालून द्यावे. कार्यकारी मंडळाच्या मुदतींत चालू कचेरीचें स्थलान्तर होणार नाही.

६. सभासदवर्गः— परिषदेचे सभासद पुढीलप्रमाणें आठ प्रकारचे असतीलः—

(१) उपकर्तेः—परिषदेस पांच हजार (५०००) किंवा अधिक रुपये देणारे.

(२) आश्रयदातेः—परिषदेस एक हजार (१०००) किंवा अधिक रुपये देणारे.

(३) साहाय्यकः—परिषदेस पांचशें (५००) किंवा अधिक रुपये देणारे.

(४) हितचिंतकः—परिषदेस दीडशें (१५०) किंवा अधिक रुपये देणारे.

(५) **तहह्यात सभासदः**—परिषदेस पन्नास (५०) किंवा अधिक रुपये देणारे.

(६) **साधारण सभासदः**—वार्षिक वर्गणी रु. ३ किंवा अधिक रुपये देणारे.

(७) **प्रतिनिधि सभासदः**—घ. नि. ११ (इ) प्रमाणें संलग्न संस्थांनी नेमलेले प्रतिनिधि.

(८) **सन्मान्य सभासदः**—अलौकिक विद्वत्ता अथवा मराठी भाषेची विशेष सेवा या गुणांसाठी कोणाहि साहित्यिकास परिषदेचे सन्मान्य सभासद करावें अशी लेखी सूचना परिषदेच्या दहा सभासदांनी केल्यास त्या सूचनेवर कार्यकारी मंडळाने परिषदेच्या सभासदांचीं, वार्षिक किंवा विशेष सा. सभेच्या सूचनांच्या लगत लेखी मतें मागवावीं व परिषदेच्या दोनतृतीयांश सभासदांचें त्या सूचनेस अनुकूल मत असल्यास अशा साहित्यिकास परिषदेचे सन्मान्य सभासद निवडल्याचें त्या त्या साधारण सभेंत जाहीर करण्यांत यावें. म. सा. सं. चे सर्व अध्यक्ष हे म. सा. प. चे सन्मान्य सभासद समजले जातील.

७. सभासद मंजुरीः—सभासद होऊं इच्छिणाऱ्या २१ वर्षांवरील कोणाहि स्त्रीने अगर पुरुषाने परिषदेचे उद्देश, घटना व नियम मान्य करून ठरलेल्या नियमांप्रमाणे वर्गणीसह अर्ज करावा. कार्यकारी मंडळाने आपल्या प्रथमच्या सभेंत कार्याध्यक्ष, परिषदेचे एक चिटणीस आणि आपणांतून निवडून दिलेले दोन सभासद अशा चार सभासदांची एक उपसमिति नेमावी. या उपसमितीने सभासदत्वाच्या सर्व अर्जांचा निर्णय

करावा. अर्ज पोचल्यापासून एक महिन्याचे आंत त्या अर्जांचा निकाल अर्जदारांस कळविला पाहिजे. सदर समितीने नामंजूर केलेले अर्ज ताबडतोब कार्यकारी मंडळाकडे पाठवावे व त्यांचा निर्णय कार्यकारी मंडळाने करावा.

८. सभासद अधिकार:— (अ) कोणाहि अर्जदारास त्याच्या सभासदत्वास मंजुरी मिळाल्यापासून परिषदेच्या सर्व सभांस हजर राहण्याचा, तेथे होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा, मत देण्याचा, कार्यकारी मंडळाने गुप्त म्हणून ठेवलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्त हिशेब, दप्तर, व अितर कागदपत्र पाहण्याचा, हे व इतर सर्व प्रकारचे सभासदत्वाचे अंगभूत हक्क राहतील. परंतु घटनाविषयक प्रश्न, सर्व प्रकारचे आर्थिक प्रश्न, म. सा. प. चा वार्षिक अहवाल, अंदाजपत्रक व घटनानियमानुसार होणाऱ्या निवडणुकी अित्यादि बाबींसंबंधाने मत देण्याचा अधिकार फक्त अशाच सभासदांस राहील कीं जे सभासद म्हणून मंजूर झाल्यापासून बारा महिने पूर्ण झाले असतील.

(आ) परिषदेचें दप्तर, कागदपत्र, हिशेब, वगैरे पाहणें असल्यास तशा अर्थाची कमींत कमी तीन दिवसांची पूर्वसूचना चिटणिसांस दिल्याने पाहिजे असलेले कागदपत्र, कार्यकारी मंडळाने गुप्त म्हणून ठरविलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्त, कचेरीच्या वेळांत कचेरीच्या सोईने पाहावयास मिळतील.

९. सभासद वर्गणी, थकबाकी अित्यादि:—(अ) साधारण सभासदांनी प्रत्येक वर्षाच्या पहिल्या तिमाहींत आपली सभासदत्वाची वर्गणी भरली पाहिजे. कोणत्याहि सभेत किंवा निवडणुकींत वर्गणी बाकी असणाऱ्या कोणाहि सभासदास मत देतां येणार नाही.

(आ) लागोपाठ दोन वर्षांची वर्गणी थकली असेल अशा सभासदास व्यक्तिशः लेखी पंधरा दिवसांची पूर्वसूचना देऊन कार्यकारी मंडळाच्या संमतीने चिटणिसांस त्याचें नांव पटावरून काढून टाकतां येईल; अशा व्यक्तीस पुन: सभासद होणें असल्यास बाकी थकलेली सर्व वर्गणी सभासदत्वाच्या नूतन अर्जासोबत भरली पाहिजे.

१०. अधिकारिमंडळें:— परिषदेची दोन अधिकारी मंडळें असावींतः (१) नियामक मंडळ, व (२) कार्यकारी मंडळ.

११. नियामक मंडळ:— नियामक मंडळाची रचना खालीलप्रमाणे असावीः—

(अ) अधिकारपरत्वें सभासदः— १ परिषदेचे अध्यक्ष, ५ परिषदेचे उपाध्यक्ष, १ परिषदेचे कार्याध्यक्ष, व १ खजिनदार असे ८

(आ) प्रादेशिक सभासदः— या निवडणुकींकरिता सभासदाचे पुढीलप्रमाणे गट करण्यात येत आहेत; यांपैकीं प्रत्येक गटामागे कमींत कमी १ आणि अधिकांत अधिक २० सभासद खालीलप्रमाणे निवडतां येतील:— ज्या गटांत १५ किंवा १५ पेक्षा कमी सभासद असतील त्या गटामागे १ सभासद, व (२) ज्या गटांत १५ पेक्षा अधिक सभासद असतील त्या गटाकरिता दर १५ च्या पूर्ण संख्येस १ याप्रमाणें अधिक सभासद निवडतां येतील. पण कोणत्याहि गटातर्फे २० पेक्षा अधिक सभासद नियामक मंडळावर निवडले जाणार नाहीत.

(१) मुंबई व उपनगर, ठाणें जिल्हा व जव्हार संस्थान. (२) पुणें जिल्हा, सातारा जिल्हा, भोर, औंध, फलटण हीं संस्थानें. (३) अहमदनगर, सोलापूर हे जिल्हे, अक्कलकोट व मुधोळ संस्थानें. (४) नाशिक व खानदेश जिल्हे. (५) कोंकण (कुलाबा, रत्नागिरी हे जिल्हे, गोमंतक, सावंतवाडी संस्थान, कारवार जिल्हा). (६) दक्षिण महाराष्ट्र (बेळगांव,

धारवाड, विजापूर हे जिल्हे, कोल्हापूर, सांगली व इतर दक्षिणी संस्थानें). (७) विदर्भ. (८) मध्यप्रांत. (९) मराठवाडा व उर्वरित निजाम संस्थान (१०) बृहन्महाराष्ट्र.

(इ) संलग्न संस्थांचे प्रतिनिधिः— ५० किंवा अधिक समासद असल्यास प्रत्येक संस्थेस अेक. ५० पेक्षा कमी समासद असल्यास अेकाच प्रादेशिक विभागांतील संस्था अेकत्र होऊन ५० संख्या झाल्यास त्या सर्वांस मिळून अेक.

(ई) स्वीकृत सभासदः— आवश्यक वाटल्यास नियामक मंडळास १० पर्यंत सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार आहे.

१२. अध्यक्ष निवडणूकः—जाहीर सूचना देऊन चिटणीसांनी सर्वांकडून संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी म. सा. परिषदेचे सभासद असलेल्यांतून नांवें मागवावींत. आलेल्या नावांची यादी करून म. सा. परिषदेच्या सभासदांकडे नांवें निवडण्यासाठीं पाठवावीं. ही निवडणूक क्रमसार पद्धतीने व्हावी. ज्यांची संमति असेल अशा निवडून आलेल्या पहिल्या तिघांचीं नांवें स्वागत मंडळाकडे पाठवावीं व स्वागत मंडळाने त्यांतील एक नांव वर्षाच्या संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवडावें. अशा रीतीने निवडून आलेला संमेलनाचा अध्यक्ष पुढील संमेलनापर्यंत म. सा. परिषदेचा अध्यक्ष राहील.

१३. नियामक मंडळाची निवडणूकः— (अ) नियामक मंडळांतील अध्यक्षाखेरीज इतर पदाधिकारी व प्रादेशिक सभासद यांची निवडणूक त्रैवार्षिक असावी व ती गुप्त मतदान पद्धतीने करण्यांत यावी. या निवडणुकीकरिता त्या त्या विभागांतील उमेदवारासच त्या त्या विभागातील मतदार सभासदांचीं लेखी मतें मागवून त्या त्या विभागातर्फे निवडून येतां येईल.

[नियामक मंडळांचीं कामें वगैरे नियम पाहाः—- २४ ते २८]

(आ) परिषदेच्या कचेरींत पत्ता नोंदला असेल त्याप्रमाणें सभासदाचा विभाग समजण्यांत यावा. पत्ता बदलला असल्यास सभासदाने निवडणुकीच्या दिवसाच्या निदान तीन महिने आधीं कचेरीकडे तसें लेखी कळविलें पाहिजे.

(इ) निवडणुकीच्या आधी दोन महिने मतदानास पात्र असलेल्या सभासदांची यादी कार्यकारी मंडळाने तयार करावी व विभागवार सभासदांची यादी त्या त्या विभागांतील सभासदांकडे पाठवून सभासदांकडून निरनिराळया जागांसाठी सूचितांचीं नांवें मागवावीं.

(ई) सूचना करणाराने सूचित उमेदवारांची लेखी अनुमति कचेरीकडे पाठविली पाहिजे.

(उ) निवडणुकीच्या दिवसाच्या आधी निदान एक महिना सूचितांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीने चिटणीसांकडे आलीं पाहिजेत. चिटणीसांनी प्रत्येक निवडणुकीच्या मतदानपत्रिका व सूचित उमेदवारांच्या याद्या मतदारांकडे निवडणुकीच्या दिवसाच्या निदान पंधरा दिवस आधी रवाना केल्या पाहिजेत.

(ऊ) सूचित उमेदवारांपैकीं ज्यांना अधिक मतें पडतील ते निवडून आले असें समजावें. एकाहून अधिक उमेदवारास सारखीं मतें पडल्यास चिठ्या टाकून त्यांतील एक निवडला जाईल.

(ऋ) प्रत्येक संलग्न संस्थेने पुढील नियामक मंडळावर पाठवायाच्या आपल्या प्रतिनिधीचें नांव परिषदेच्या कचेरीकडे निवडणुकीपूर्वी एक महिना पाठवावें.

१४. कार्यकारी मंडळाची रचनाः— (अ) कार्यकारी मंडळाचे ११ सभासद गुप्त, लेखी मतदानपद्धतीने नियामक मंडळाने आपणांतून निवडावे. हे ११ सभासद, कार्याध्यक्ष व

खजिनदार मिळून १३ जणांचें कार्यकारी मंडळ होईल. या कार्यकारी मंडळाने आपल्या पहिल्या सभेत दोन अधिक समासद स्वीकृत करून घ्यावे. हे दोन समासद इतर रीतीने नियामक मंडळाचे समासद नसल्यास ते अधिकारपरत्वें नियामक मंडळाचे समासद होतील.

[कार्यकारी मंडळाचीं कामें वगैरे नियम पाहा: — ६ (८), २९ ते ३४, ३७ ४५, ४७ ४८, ४९, ५२, ५४, ५५]

(आ) परिषदेची चालू कचेरी जेथे असेल तेथीलच कार्याध्यक्ष, खजिनदार असावेत. कार्यकारी मंडळांतील ११ समासदांपैकी चालू कचेरी जेथे असेल तेथील किमान ५ व बाहेरील किमान ६ असावे. ३ चिटणीसांपैकी एक तरी स्थानिक असावा.

(इ) कोणासहि एकाच वेळीं पदाधिकाऱ्यांच्या एकाहून अधिक जागांकरितां उभें राहतां येणार नाही. परंतु पदाधिकारी व नि. मं. चा समासद या दोन जागांस उभें राहण्यास हरकत नाही.

१५. परिषदेच्या साहित्य पत्रिकेसाठी कार्यकारी मंडळाने एक संपादक निवडावा. तो कार्यकारी मंडळाचा समासद नसल्यास १४ [अ] मध्ये असलेल्या स्वीकृति नियमाप्रमाणे स्वीकृत करून घ्यावा. या व इतर संपादकीय कार्यासाठी कार्यकारी मंडळाने संपादकासुद्धां ५ समासदांचें एक संपादकमंडळ निवडावें. पत्रिकेचा संपादक हा त्या संपादकमंडळाचा अध्यक्ष असावा.

[संपादक मंडळाचीं कामें वगैरे नियम पाहा:— ४२].

१६. परिषदेची वार्षिक साधारण सभा: — १. महाराष्ट्र साहित्य परिषदेची वार्षिक साधारण सभा वर्ष संपल्यापासून तीन महिन्यांच्या आंत भरविली पाहिजे.

२. ही वा. सा. सभा (अ) या सभेसाठी अन्यत्र दिलेल्या नियमान्वयें निश्चित केलेल्या निमंत्रित स्थळीं किंवा (आ) म. सा. प. च्या मुख्य कचेरीच्या गांवीं भरेल.

३. वर (२ अ) दर्शविलेल्या स्थळीं वरील (१) प्रमाणे दिलेल्या मुदतीच्या आंत ही सभा भरविणेस अडचण उद्भवल्यास कार्यकारी मंडळाने नियामक मंडळाची विशेष सभा बोलवावी. नियामक मंडळाने आणखी अेक महिन्याचे आंत म्हणजे वर्ष संपून चार महिने पूर्ण होणेचे आंत वरील (२) प्रमाणे ही सभा भरविणेची तजवीज करावी. याप्रमाणे भरविलेल्या सभेत खाली (४) मधील नमूद केलेलें कारभारी कामच फक्त करण्यांत येअील.

(४) वार्षिक साधारण सभा:— १. या सभेंत म. सा. प. चें गतवर्षाचें कार्यवृत्त, २. गतवर्षाचे रीतसर तपासून घेतलेले हिशेब, ३. पुढील वर्षाचें अंदाजपत्रक, ४. हिशेबतपासनीसांची निवडणूक, ५. घटनेंत करावयाच्या दुरुस्त्या- पुरत्या, ६. पोटसमित्यांची व विशेष समित्यांची नेमणूक, ७. सेवकवर्ग, जिंदगी वगैरे कारभारासंबंधींचे प्रश्न, नवीन योजना किंवा ठराव इत्यादि सर्व प्रकारचे विषय रीतसर लेखी पूर्वसूचना देऊन ठेवण्यांत येतील. याशिवाय कार्यकारी मंडळ, नियामक मंडळ किंवा समासद यांजकडून आलेले ठराव, अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळीं आलेले विषय, साहित्य संमेलनाकडून आलेले ठराव यांचाहि या सभेंत विचार होईल.

१७. परिषदेची विशेष साधारण सभा:— याशिवाय जरूर लागेल तेव्हां अध्यक्षांनी अथवा कार्यकारी मंडळाने परिषदेची विशेष साधारण सभा बोलवावी. [इतर नियम, २२; ५१ पाहा]

१८. गणसंख्याः— परिषदेच्या सभांस एकूण सभासदांच्या $\frac{१}{२५}$ किंवा ५० यापैकी कमी असेल ती संख्या ही गणसंख्या मानली जाईल. गणसंख्येच्या अभावीं तहकूब राहिलेली सभा त्याच दिवशीं व त्याच ठिकाणीं पहिल्या सभेच्या वेळेपासून अर्ध्या तासाचे अवधीनंतर भरेल. अशा सभेंत कार्यक्रमपत्रिकेवर असलेल्या प्रश्नांचाच फक्त विचार करतां येईल.

१९. पोटमंडळें:— परिषदेचे उद्देश सिद्धीस नेण्याकरिता किंवा दुसऱ्या कोणत्याहि विशिष्ट कार्याकरिता जरूर वाटल्यास एक किंवा अनेक पोटसमित्या किंवा विशिष्ट मंडळें नेमण्याचा अधिकार परिषदेच्या साधारण सभेस आहे.

२०. ठराव, सूचना इत्यादि:— (अ) म. सा. परिषदेचा वार्षिक अहवाल व हिशेब, वार्षिक सभेच्या आधी निदान पंधरा दिवस चिटणीसांनी प्रत्येक सभासदाकडे पाठवावे. कोणाहि सभासदास अहवाल अथवा हिशेब यासंबंधी वार्षिक सभेंत ठराव मांडणें असल्यास त्याने ठरावाची लेखी सूचना सभेच्या अगोदर सात दिवस कार्याध्यक्षांस पाठविली पाहिजे.

(आ) वा. सा. सभेपुढे यावयाचे ठराव वा. सा. सभेपूर्वी एक महिना कार्यालयाकडे आले पाहिजेत.

२१. सभेची सूचना:— परिषदेच्या कोणत्याहि सभेची सूचना सभासदांकडे सभेच्या दिवसापूर्वी निदान पंधरा दिवस चिटणीसांनी पाठवावी.

२२. मागणी सभाः— परिषदेचा मताधिकार असलेल्या पन्नास सभासदांनी लेखी मागणी केल्यास परिषदेची विशेष सभा अध्यक्षांनी बोलवावी. मागणीचें रीतसर पत्र त्यांस पोहोचल्यापासून दोन महिन्यांच्या आंत ही सभा अध्यक्षांनी बोलाविली पाहिजे; न बोलावली तर सदर मागणी करणाऱ्या सभासदांनी तीन प्रमुख मराठी वर्तमानपत्रांतून आपल्या सह्यांच्या निमंत्रणपत्राने सभा बोलवावी. अशा सभेंत मागणीपत्रांत लिहिलेल्या कामाव्यतिरिक्त दुसरें काम करतां येणार नाही.

२३. अध्यक्षः— परिषदेच्या व नियामक मंडळाच्या कोणत्याहि सभेंत परिषदेचे अध्यक्ष हेच अध्यक्ष होतील; अध्यक्ष हजर नसल्यास हजर असलेल्या उपाध्यक्षांपैकीं एक उपाध्यक्ष सभेचा अध्यक्ष म्हणून निवडावा. कोणीहि उपाध्यक्ष हजर नसल्यास सभेने खजीनदार. चिटणीस व निधिधारक यांखेरीज इतर कोणाहि सभासदास त्या सभेपुरता अध्यक्ष निवडावा.

२४. नियामक मंडळाचीं कामें:— (१) नियामक मंडळाचीं कामें सर्वसाधारणपणें खालीलप्रमाणें आहेत:—

(अ) परिषदेचे मूलभूत उद्देश व तिच्या साधारण सभेचे ठराव यांस अनुसरून कार्याची दिशा ठरविणें, कार्यकारी मंडळ निवडणें व त्याच्या कामावर देखरेख ठेवणें.

(आ) कार्यकारी मंडळाने तयार केलेलें वार्षिक अंदाजपत्रक योग्य वाटतील ते फेरफार करून मंजूर करणें.

(इ) कार्यकारी मंडळाने तयार केलेला वार्षिक अहवाल व हिशेब विचारांत घेऊन ते मंजूर करणें.

(ई) वार्षिक सभेपुढे मांडावयाच्या प्रश्नांचा विचार करणें.

(२) संमेलनानंतर नियामक मंडळाची एक सभा भरेल. या सभेंत वा. सा. सभेने मंजूर केलेल्या ठरावाच्या अंमलबजावणीची योजना, पोटसमित्यांची निवड, पुढील कार्याची रूपरेषा ठरविणें वगैरे कामें केलीं जातील.

२५. नि. मं. ची जादा सभाः-- याशिवाय अध्यक्ष किंवा कार्यकारी मंडळ यांस नियामक मंडळाची जादा सभा बोलाविण्याचा अधिकार राहील.

२६. नि. मं. सभेची सूचनाः-- नियामक मंडळाच्या कोणत्याहि सभेची सूचना सभासदांकडे सभेच्या दिवसापूर्वी निदान पंधरा दिवस चिटणीसांनी पाठवावी.

२७. नि. मं. ची गणसंख्याः-- नियामक मंडळाच्या सभेस २० ही गणसंख्या राहील. गणसंख्येच्या अभावीं तहकूब राहिलेली सभा त्याच दिवशीं, त्याच ठिकाणीं पहिल्या सभेच्या वेळेपासून अर्ध्या तासाचे अवधीनंतर भरेल. अशा सभेंत कार्यक्रमपत्रिकेवर असलेल्या प्रश्नांचाच फक्त विचार करतां येईल. [३३ आ नियम पाहा].

२८. नि. मं. चीं मागणी सभाः-- नियामक मंडळाच्या अस्तित्वांत असलेल्या सभासदापैकीं एकपंचमांश सभासदांनी विशिष्ट कारण दर्शवून सभेची लेखी मागणी केल्यास तशी सभा चिटणीसांनी पंधरा दिवसांच्या आंत बोलाविली पाहिजे. अशा सभेंत मागणीपत्रांत लिहिलेल्या कामाव्यतिरिक्त दुसरें काम करतां येणार नाहीं.

२९. कार्यकारी मंडळाचीं कामें:-- कार्यकारी मंडळाचीं कामें सर्वसाधारणपणें खालीलप्रमाणें राहतीलः--

परिषदेच्या नियमांप्रमाणें साधारण सभा भरविण्याची व्यवस्था करणें; महाराष्ट्र-साहित्य पत्रिका चालविणें; साधारण सभेने केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करणें; परिषदेमार्फत होणाऱ्या प्रकाशनाची व्यवस्था करणें; वार्षिक अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक हीं तयार करून नियामक मंडळापुढे मंजुरीकरिता मांडणें; परिषदेच्या कार्याकरिता द्रव्यनिधि जमविणें; उपकर्ते; आश्रयदाते वगैरे मिळविणें; नियमानुसार निधीची व्यवस्था करणें; शाखासभा स्थापन करणें; संलग्न संस्था नोंदविणें; नियामक मंडळाच्या निवडणुकीची व्यवस्था करणें; परिषदेच्या मूलभूत उद्देशास धरून व ठरावांस विरोधक नसतील असे जरूर वाटतील ते उपाय योजणें; उद्देशांत व ठरावांत दर्शविलेल्या गोष्टी घडवून आणण्यासाठीं झटणें व चळवळ करणें; वेळोवेळीं उत्पन्न होणाऱ्या किंवा उत्पन्न होणें संभवनीय असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांबद्दल मराठी भाषा बोलणाऱ्या समाजांत जागृति करून तशा प्रश्नासंबंधी परिषदेचें धोरण ठरविण्यास साहाय्यभूत होतील असे निबंध, ठराव वगैरे परिषदेपुढे आणण्याची व्यवस्था करणें; परिषदेचे उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं इतर जरूर ते प्रयत्न करणें; परिषदेकडे आलेल्या सर्व पैशांचा विनियोग अंदाजपत्रकाबरहुकूम करणें; नियामक मंडळ व सर्वसाधारण सभा नेमून देईल तीं सर्व कार्यें वेळोवेळीं पार पाडणें; परिषदेचें दप्तर संभाळणें आणि सोपाविलेल्या जिंदगीचें रक्षण करणें. [कार्यकारी मंडळ निवडणूक नियम १४ पाहा]

३०. का. मं. ची सभाः—कार्यकारी मंडळाची सभा दर तिमाहीस निदान एकदा तरी व्हावी.

३१ का. मं. सभेची सूचनाः—(अ) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना निदान सात दिवस आगाऊ दिली पाहिजे.

(आ) कार्यकारी मंडळाच्या व पोटसमितीच्या सभांच्या सूचना व वृत्तान्त अध्यक्षांकडे पाठविले पाहिजेत.

३२. का. मं. ची मागणी सभाः—कार्यकारी मंडळाच्या पांच सभासदांनी विशिष्ट कामाकरितां लेखी मागणी केल्यास तशी सभा चिटणिसांनी भरविली पाहिजे आणि सभासदांस तिची सूचना चार दिवस पूर्वी दिली पाहिजे. चिटणिसांनी सभा न भरविल्यास मागणी

करणारांनी कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांस चार दिवसांची लेखी सूचना देऊन तशी सभा त्या कामाकरितां भरवावी. त्या कामाबाबतचे या सभेचे ठराव कार्यकारी मंडळाला बंधनकारक राहतील.

३३. का. मं. ची गणसंख्या:—(अ) कार्यकारी मंडळाच्या सभेस पाच सभासदांची गणसंख्या मानली जाईल.

(आ) गणसंख्येच्या अभावीं तहकूब राहिलेल्या सभेला गणसंख्येची जरूरी नाही.

३४. जरूरीची कार्यमंजुरी:—कार्यकारी मंडळाची सभा बोलावण्यास सवड नसेल तेव्हां जरुरीची कामें सभासदांचे लेखी अभिप्राय मागवून करतां येतील. त्यानंतर होणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या सभेला असें झालेलें कार्य कळविलें पाहिजे; मात्र कार्यकारी मंडळाच्या एकचतुर्थांश सभासदांनी लेखी अभिप्रायांनी काम करण्यास असंमति लिहून कळविली तर त्या कामासाठी सभा बोलाविली पाहिजे.

३५. द्रव्यनिधि व खर्च:—वर्गण्या, देणग्या, बाकी रकमा वगैरे वसूल करण्याचें व पावत्या देण्याचें काम चिटणिसाचें आहे. अशा वसुलींतून किरकोळ खर्चाकरितां ५० रुपयेपर्यंतची रक्कम स्वतःजवळ ठेवून बाकीच्या वसूल झालेल्या रकमा चिटणिसाने खजिनदाराकडे जमा कराव्या व खर्चाकरितां मंजुरी असेल त्याप्रमाणें मंजूर केलेल्या रकमा वेळोवेळीं खजीनदाराकडून मागवून घ्याव्या आणि अंदाजपत्रकानुसार किंवा कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार खजीनदाराने त्या चिटणिसास द्याव्या.

३६. द्रव्यनिधीचे प्रकार:—परिषदेच्या द्रव्यनिधीचे चार वर्ग असतील:—(१) निधिधारकांकडे असलेला पैसा, (२) उपकर्ते, आश्रयदाते, साहाय्यक, हितचिंतक व तहह्यात सभासद यांच्या वर्गण्या (सदरहू रक्कम कायम निधि म्हणून समजण्यांत येईल. (३) साधारण सभासद, संलग्न व सहकारी संस्था यांच्या वर्गण्या, किरकोळ देणग्या व इतर उत्पन्न, आणि (४) विशेष कार्याकारिता दिलेल्या देणग्या किंवा वर्ग २ ते ४ या सभासदांनी विशेष कार्याकरिता दिलेल्या वर्गण्या, पारितोषिक वगैरे रकमा. यापैकी दुसऱ्या वर्गातील रकमा निधिधारकांकडे कायम निधींत जमा होतील. तिसऱ्या वर्गातील रकमा व पहिल्या वर्गातील रकमेवरील व्याज किंवा नफा खजीनदाराकडे भरून नित्य व नैमित्तिक खर्चाकडे लावण्यांत येईल. चवथ्या वर्गातील रकमा, होतां होईल तों, दात्यांच्या इच्छेप्रमाणे व शर्तीप्रमाणे खर्च कराव्या. कोणत्याहि वर्षी जमा होणाऱ्या दुसऱ्या वर्गातील वर्गणीपैकी निम्म्या वर्गणीइतकी रक्कम नियामक मंडळाला त्या वर्षाच्या चालू खर्चासाठी मंजूर करण्याचा अधिकार आहे.

३७. कायम निधीची व्यवस्था:—कायम निधि व स्थावर मिळकत निधिधारकांच्या नांवें असावी व त्यांच्यांच ताब्यांत राहावी. कायम निधिव्यतिरिक्त सर्व पैसा खजीनदाराकडे राहावा. वसूल झालेल्या सर्व रकमा चिटणीसांनी वरील ३५ व ३६ या नियमांना अनुसरून खजीनदार व निधिधारक यांच्याकडे जमा कराव्या. वार्षिक अहवाल व हिशेब तयार करण्याच्या वेळीं निधिधारकांनी कायमनिधीचा व आपल्या ताब्यांतील मालमत्तेचा वार्षिक हिशेब कार्यकारी मंडळाला द्यावा.

३८. विश्वस्तत्व रद्द करणें:—परिषदेने अविश्वासदर्शक ठराव पास केल्यास ट्रस्टींनी आपल्या अधिकाराचा राजीनामा देऊन आपल्या ताब्यांतील परिषदेची सर्व मालमत्ता व द्रव्यनिधि कार्यकारी मंडळाच्या स्वाधीन केला पाहिजे. तसेंच द्रव्यानिधि किंवा

मालमत्ता यांबद्दल ट्रस्टी व कार्यकारी मंडळ यांच्यामध्ये मतभेद उत्पन्न झाल्यास परिषदेचें बहुमत उभय पक्षांनी मान्य केलें पाहिजे. वार्षिक अहवालाच्या वेळीं ट्रस्टींनी आपल्या ताब्यांतील मालमत्तेचा अहवाल चिटणीसांकडे पाठवावा. हा ठराव ट्रस्टी व सभासद यांस पूर्वसूचना दिल्याशिवाय विचारांत घेऊं नये. असल्या ठरावास तीनपंचमांश बहुमताचें बंधन असावें.

३९. ठराव बंधनः— परिषदेच्या निधिधारणाबाबत इंडियन ट्रस्ट, ॲक्ट सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, व परिषदेचें ट्रस्टडीड यांस अविरोधी असे परिषदेच्या साधारण सभेचे सर्व ठराव ट्रस्टींवर बंधनकारक राहतील.

४०. नवीन विश्वस्तपत्रः— १।१।३७ पासून जी घटना अमलांत आली, त्यानंतर परिषदेकडे येणाऱ्या रकमा व मिळकत यांबाबत नवें ट्रस्टडीड व नियम परिषदेने करावे.

४१. बँकखातें व हिशेबः— कायम निधीवरील वार्षिक व्याज, साधारण सभासदांच्या वर्गण्या, तसेंच किरकोळ देणग्या या रकमा परिषदेच्या नांवाने बँकेंत जमा राहतील. बँकेंतील जमेपैकी रकमा काढावयाच्या असल्यास त्या खजीनदार व अध्यक्ष किंवा चिटणीस यांपैकी एक अशा दोघांच्या सह्यांनी काढतां येतील अशी व्यवस्था करावी.

४२. संपादकमंडळाचीं कामें:— (अ) साहित्य परिषदेच्या कार्यासंबंधाचा मजकूर चिटणीसांकडून येईल तो संपादकाने पत्रिकेमध्ये दाखल केला पाहिजे. पत्रिकेच्या सर्वसामान्य धोरणासंबंधी कार्यकारी मंडळाचे ठराव संपादकावर व संपादकमंडळावर बंधनकारक असतील.

(आ) नियम ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ तयार करण्याची योजना करणें; तसेंच बाहेरून येणारे ग्रंथ तपासून त्यासंबंधीं कार्यकारी मंडळास सल्ला देणें.

(इ) याशिवाय कार्यकारी मंडळाच्या सल्ल्याने परिषदेचे उद्देश साध्य करण्यासाठी जरूर तें कार्य करणें. [संपादकमंडळ निवडणूक नियम १५ पाहा.]

संमेलन विषयक नियम

४३. (अ) परिषदेच्या शाखा सभेने किंवा शाखा सभा नसल्यास संलग्न संस्थेने ज्या ठिकाणीं आमंत्रण दिलें असेल तेथे परिषदेची वा. सा. सभा व परिषदेचें महाराष्ट्र साहित्य संमेलन हीं भरतील.

(आ) वा. सा. सभा आणि म. सा. संमेलन यांना निमंत्रण देऊं इच्छिणाऱ्या संस्थेने पुढील वर्षाच्या बैठकीसाठीं द्यावयाचें निमंत्रण चालू वर्षाच्या बैठकीपूर्वी निदान एक महिना अगोदर म. सा. प. च्या कचेरीकडे पाठविलें पाहिजे. याप्रमाणें आलेल्या सर्व निमंत्रणाचा विचार वा. सा. सभेच्या बैठकींत होऊन ज्या ठिकाणचें निमंत्रण बहुमतानें स्वीकारलें जाईल, तेथे वा. सा. सभा आणि म. सा. संमेलन यांच्या बैठकी भरतील.

४४. निमंत्रक संस्थेने वा. सा. सभा व म. सा. संमेलन यांच्या अधिवेशनापूर्वी निदान चार महिने स्वागत मंडळ बनवावें, व स्वागत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक करावी. या निवडणुकीनंतर वा. सा. सभेसंबंधीच्या सर्व स्थानिक व्यवस्था व सोयी करण्याची

व नियमान्वयें स्वागत मंडळावर सोंपविलेली सर्व कामें पार पाडण्याची जबाबदारी स्वा. मं. वर राहील. स्वा. मं. चे पदाधिकारी निवडले जाईपावेतों निमंत्रक संस्थेचे पदाधिकारी तात्पुरते अधिकारी म्हणून काम करतील. येणेंप्रमाणें करण्याचीं सर्व कामें स्वा. मं. ने म. सा. प. च्या कार्यकारी मंडळाच्या संमतीने करावयाचीं आहेत.

४५. निमंत्रित स्थळीं वा. सा. सभा व म. सा. संमेलन यांच्या बैठकींच्या पूर्व तयारीच्या सिद्धतेसाठी मार्गदर्शन करण्यासाठी म. सा. प. च्या का. मं. ने आपले नियुक्त प्रतिनिधि पाठवून स्वा. मं. ला साहाय्य करावें. स्वा. मं. ने या प्रतिनिधीस सर्व प्रकारची माहिती पुरवून त्यांच्या सल्ल्याप्रमाणें काम केलें पाहिजे.

४६. म. सा. संमेलन विषयक नियमः— (१) प्रतिनिधित्वः— म. सा. प. चे उद्देश मान्य असणाऱ्या २१ वर्षांवरील कोणाहि पुरुषास अगर स्त्रीस संमेलनाच्या कार्यक्रमांत त्यावेळच्या बैठकीसाठी केलेल्या नियमांस लेखी मान्यता देऊन व त्यासाठी ठरलेला आकार देऊन मतदार प्रतिनिधि म्हणून भाग घेतां येईल. इतरांना फक्त निमंत्रित पाहुणे किंवा प्रेक्षक म्हणून बैठकीसाठी केलेल्या नियमांप्रमाणें त्या कार्यक्रमांत भाग घेतां येईल.

(२) अध्यक्ष निवडणूकः— (नि. १२ पाहा.)

(३) ठराव— संमेलनाच्या अधिवेशनांत म. सा. प. च्या उद्देश कक्षेत येणाऱ्या कोणत्याहि विषया संबंधीचे ठराव मांडतां येतील. म. सा. परिषद, शाखा सभा, संलग्न संस्था व त्या वेळेपर्यंत नोंदलेले प्रतिनिधि यांनांच फक्त हे ठराव पाठविण्याचा अधिकार आहे. असे ठराव संमेलनाच्या अधिवेशनापूर्वी निदान एक महिना स्वागत मंडळाकडे आले पाहिजेत. स्वागत मंडळाने सर्व ठरावांची एकेक प्रत म. सा. प. च्या कार्यालयाकडे अधिवेशनापूर्वी निदान पंधरा दिवस आधीं पाठवावी.

(४). विषय नियामक मंडळः— संमेलनापुढे यावयाचे ठराव व उपसूचना विषय नियामक मंडळापुढे आलीं पाहिजेत.

विषय नियामक मंडळाचे घटक — १. म. सा. प. चे भूतपूर्व अध्यक्ष २. म. सा. सं. चे भूतपूर्व अध्यक्ष ३. त्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष, ४. त्या संमेलनाचे अध्यक्ष ५. म. सा. प च्या नियामक मंडळाचे संमेलनाचे प्रतिनिधि झालेले सभासद. ६. स्वागत मंडळाचे सर्व पदाधिकारी. ७. स्वागत मंडळाचे सभासद व प्रतिनिधि (स्थानिक) यांतून निवडलेले १५ पर्यंत प्रतिनिधि, ८ उपस्थित असलेल्या स्थानिकेतर प्रतिनिधींतून प्रत्येक म. सा. प. च्या प्रादेशिक विभागाप्रमाणें त्या त्या प्रतिनिधींनी निवडून दिलेले प्रतिनिधि.

टीपः— ही निवडणूक पुढीलप्रमाणें होईल. प्रत्येक प्रादेशिक विभागांतील उपस्थित प्रतिनिधींच्या संख्येंतील पाहिल्या दहापर्यंत एक प्रतिनिधि. दहाहून अधिक सभासद उपस्थित असल्यास प्रत्येक पूर्ण दहा संख्येच्या हजर असलेल्या सभासदांच्या मागे आणखी एक.

येणेंप्रमाणे विषयनियामक मंडळ सिद्ध करण्यांत यावें. विषय नियामक मंडळांत तीनपंचमांश मतांनी नामंजूर झालेला ठराव किंवा उपसूचना संमेलनाच्या खुल्या अधिवेशनापुढे येऊं शकणार नाहीत. परंतु तीनपंचमांशाहून कमी बहुमतांनी नामंजूर झालेले ठराव किंवा उपसूचना खुल्या अधिवेशनापुढे मांडावयाचें असल्यास विषय नियामक मंडळांतील २० सभासदांच्या किंवा संमेलनाच्या ४० प्रतिनिधींच्या सह्यांनिशी तशी लेखी सूचना मंडळाच्या त्या बैठकीनंतर होणाऱ्या खुल्या अधिवेशनाच्या सुरवातीला अध्यक्षांकडे आल्यास ती खुल्या अधिवेशनांत सादर केली जाईल. खुल्या अधिवेशनापुढे यावयाचे

ठराव व त्याचे सूचक व अनुमोदक मुकर करणें इत्यादि कामें करण्याचा अधिकार विषय-नियामक मंडळाकडे राहील.

(५) ठराव मंजुरी— म. सा. संमेलनांत मंजूर झालेल्या ठरावांची अधिकृत प्रत संमेलनाच्या अध्यक्षांच्या सहीने म. सा. प. च्या चिटणीसांकडे पाठविली पाहिजे. त्या ठरावांची अंमल बजावणी परिषद् करील.

(अ) संमेलनाच्या कोणत्याहि ठरावाची अंमल बजावणी करण्यासाठी विशेष खर्च लागणार असल्यास त्याची तरतूद संमेलनाने करावी.

(आ) परिषदेच्या सर्व साधारण धोरणाशी विसंगत म्हणून संमेलनाच्या एखाद्या ठरावाची अंमलबजावणी करता न आल्यास तसें परिषदने पुढील संमेलनास कळवावें.

(इ) मागील संमेलनांत पास झालेल्या ठरावांची अंमलबजावणी काय केली याचा अहवाल दर संमेलनांत परिषदेने सादर करावा.

(६) प्रास्ताविक कामः— साहित्य संमेलनाचें प्रास्ताविक काम स्वागताध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली सुरू होईल. प्रास्ताविक काम संपल्यावर संमेलनाचे नियोजित अध्यक्ष स्थानापन्न होऊन पुढील काम त्यांच्या अध्यक्षतेखाली चालवावें.

(७) अध्यक्षीय निर्णयः— वा. सा. सभेच्या किंवा म. सा. संमेलनाच्या कोणत्याहि कामाकाजासंबंधीं कसलीहि अडचण उत्पन्न झाल्यास किंवा कोणत्याहि नियमाच्या अर्थासंबंधीं अगर कामाच्या व्यवस्थेसंबंधीं प्रश्न उद्भवल्यास म. सा. प. च्या अध्यक्षांचा निर्णय बंधनकारक समजण्यांत येईल. कोणत्याहि अधिवेशनापुढे आलेल्या सर्व ठरावांचा निकाल उपस्थित प्रतिनिधींच्या बहुमताने होईल. एखाद्या ठरावावर दोन्ही बाजूस सारखीं मतें पडल्यास त्याचा निकाल बैठकीच्या अध्यक्षांच्या निर्णायक मताने होईल.

(८) इतिवृत्त, हिशेब वगैरेः—(अ) संमेलनाचें काम संपल्यावर व तत्संबंधीं इतिवृत्त व हिशेब पुरे झाल्यावर संमेलनाचें सर्व दप्तर स्वा. मं. ने म. सा. कडे पाठवावें. (आ) संमेलनाच्या अधिवेशनानंतर सहा महिन्यांच्या आंत संमेलनाचा वृत्तांत तयार करून अधिवेशनाच्या सर्व प्रतिनिधींकडे पाठविण्याची व्यवस्था स्वा. मं. ने करावी. वरील वृत्तांत छापून वाटण्यासंबंधाचा सर्व खर्च करण्याची जबाबदारी स्वा. मं. वर राहील. (इ) साहित्य संमेलनाचे सर्व कार्य पार पाडण्यासाठी संमेलनाचे प्रतिनिधि व स्वागत मंडळाचे सभासद यांच्या वर्गणींतून रुपयास एक आणा याप्रमाणें जमा होणारी रक्कम संमेलन संपल्यापासून दोन महिन्याच्या आंत स्वा. मं. ने म. सा. परिषदेस द्यावयाची आहे.

४७. संलग्न व सहकारी संस्था मान्यताः—(अ) महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचे उद्देश मान्य असणाऱ्या व परिषदेच्या कार्याशी सहानुभूति असणाऱ्या अशा वाङ्मयविषयक संस्थां अनुक्रमें (१) संलग्न संस्था, किंवा (२) सहकारी संस्था म्हणून परिषदेशी जोडून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. ह्या दोन्ही तऱ्हेच्या सभा जोडून घेण्यासंबंधी अटी, नियम वगैरे करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला आहे.

(आ) साहित्याच्या उन्नतीसाठी स्थापन झालेल्या ज्या संस्थांना महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचे हेतु व नियम मान्य असतील, व ज्यांचे हेतु परिषदेच्या हेतुंशी विसंगत नसतील, अशा संस्थांना त्यांच्याकडून मागणी आल्यास संलग्न संस्था म्हणून जोडून घेण्यांत येईल.

(इ) संलग्न संस्थांनी नोंदणी-आकार पांच रुपये द्यावा व पुढे दरवर्षी तीन रुपये वर्गणी द्यावी.

(ई) प्रत्येक संलग्न संस्थेला परिषदेच्या उद्देशांस अनुसरून कार्यकारी मंडळाला सूचना करण्याचा हक्क आहे व कार्यकारी मंडळाने त्यांचा विचार करून आपला निर्णय करावा.

(उ) महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या कार्याशी सहानुभूति असणाऱ्या संस्था, त्यांनी तशी इच्छा प्रदर्शित केल्यास, परिषदेशी सहकारी संस्था, म्हणून जोडून घेण्याचा व त्या-संबंधी अटी वगैरे ठरविण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला आहे.

(ऊ) संलग्न व सहकारी संस्था नोंदून घेण्याचा अधिकार महाराष्ट्र साहित्य परि-षदेच्या कार्यकारी मंडळास आहे; मात्र अशा संस्था पटावरून कमी करणें झाल्यास त्यासंबं-धीचा ठराव कार्यकारी मंडळाने नियामक मंडळाच्या सभेपुढे मंजुरीसाठी ठेवला पाहिजे.

(ऋ) संलग्न व सहकारी संस्थाशीं अंतर्गत व्यवस्था व आर्थिक परिस्थिति यांची जबाबदारी परिषदेवर कोणत्याहि प्रकारें राहणार नाही; मात्र संलग्न संस्थेने आपला छापील अथवा हस्तलिखित वार्षिक अहवाल परिषदेच्या कार्यकारी मंडळाकडे पाठवावा.

(ए) प्रत्येक संलग्न संस्थेने आपल्यातर्फे आगाऊ नोंदलेला एक प्रतिनिधि प्रतिपदेचा नियम ६ (७) वर्गाचा त्या संस्थेतर्फे सभासद गणला जाईल.

(ऐ) साहित्यपत्रिकेची एक प्रत प्रत्येक संलग्न संस्थेस फुकट दिली जाईल.

४८. शाखा सभा स्थापणें वगैरे:—(१) नियम ३ 'आ' मध्ये सांगितल्या-प्रमाणें निरनिराळ्या प्रादेशिक विभागाच्या मुख्य स्थानीं परिषदेच्या शाखासभा स्थापन कर-ण्याचा प्रयत्न कार्यकारी मंडळाने करावा.

(२) त्या त्या प्रादेशिक विभागांतील परिषदेचे सभासद त्या शाखासभेचे सभासद राहतील. त्यांतील साधारण सभासदांच्या वर्गणीपैकीं एकतृतीयांश रक्कम परिषदेच्या कार्यकारी मंडळाकडून सभेस तिचें कार्य चालविण्याकरिता देण्यांत यावी.

(३) शाखासभेने आपल्या कार्याकरितां विशेष देणग्या वगैरे मिळविल्यास त्यांतील एकतृतीयांश भाग परिषदेच्या खर्चाकारिता म्हणून मुख्य कचेरीकडे पाठवावा.

(४) शाखासभेने नियुक्त केलेले दोन सभासद व कार्यकारी मंडळाचे दोन सभासद यांनी मिळून शाखासभेची घटना, परिषदेच्या घटनेस अविरोधी अशी तयार करावी.

(५) शाखासभेने आपलें कार्य सर्वसाधारणपणें कार्यकारी मंडळाच्या देखरेखीखालीं करावे. कार्यकारी मंडळाने कांहीं विशिष्ट कार्यें तिजकडे सोपविल्यास तींहि करावी आणि प्रादेशिक संमेलने शक्य तो दरवर्षी भरविण्याचा प्रयत्न करावा.

(६) ज्या प्रादेशिक विभागांत शाखासभा असेल तेथील नियामक मंडळाच्या निवडणूकी शाखासभेनेच कराव्या. निवडणूकीबाबत तक्रार उपस्थित झाल्यास तिचा निकाल परिषदेच्या अध्यक्षांनी करावा व तो अखेरचा मानला जावा.

(७) शाखासभेने नियामक मंडळाचे सर्व आदेश मान्य केले पाहिजेत.

(८) रु. ५०० पेक्षा कोणत्याहि प्रकारची आर्थिक जबाबदारी म. सा. प. कार्य-कारी मंडळाच्या लेखी संमतीविना शाखासभेस अंगावर घेतां येणार नाही.

(९) शाखासभेच्या कारभाराची चौकशी करण्याचा नियामक मंडळास अधिकार आहे व तशी चौकशी करण्याची जबाबदारीहि नियामक मंडळावर राहील. या चौकशीच्यां

कामीं नियामक मंडळ मागेल ती माहिती शाखासभेने दिली पाहिजे; शाखासभेने आपले हिशेब व दप्तर व्यवस्थित ठेविलें पाहिजे; शाखासभेचा कारभार असमाधानकारक होत असल्याचें आढळून आल्यास शाखासभेचें म्हणणें ऐकून शाखासभेची मान्यता रद्द करण्याची शिफारस नियामकमंडळाने साधारण सभेस करावी.

(१०) शाखा सभेचा अध्यक्ष हा म. सा. परिषदेच्या नियामक मंडळावर पदसिद्ध सभासद होईल. सभासदांच्या १५ च्या संपूर्ण गटाला १ इतके सभासद शाखासभेने नियामक मंडळासाठी निवडून द्यावयाचे आहेत. (सध्या असलेल्या शाखासभा एक होईपावेतो आहेत तशाच राहतील व जेथे एका गटांत दोन किंवा अधिक शाखासभा असतील तेथे अध्यक्षाबद्दलचे सभासदत्व त्यांना पाळीपाळीने दिले जाईल.)

४९ सभावृत्तान्त पुस्तकः—परिषदेच्या नियामक मंडळाच्या, कार्यकारी मंडळाच्या, इतर व विशिष्ट सभांच्या कामांची नोंद स्वतंत्र पुस्तकात लिहून ती त्या त्या सभांच्या पुढील बैठकींत मंजूर झाली पाहिजे.

५० दप्तरः—परिषदेचें सर्व दप्तर, पत्रव्यवहार व निरनिराळ्या सभांच्या वृत्तान्तांची पुस्तकें हीं सर्व सुरक्षित व व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी चिटणीसांवर राहील.

५१ घटना बदलः—(अ) परिषदेच्या घटनेंत फेरफार करणें झाल्यास तो एक महिन्याची पूर्वसूचना देऊन परिषदेच्या वार्षिक सभेंत किंवा त्यासाठी बोलाविलेल्या विशेष सभेंत हजर असून मतें देणाऱ्या सभासदांच्या तीनपंचमांश बहुमताने करतां येईल. याशिवाय जेथे विशिष्ट बहुमताचा निर्देश केला नाही, अशा सर्व कामांचा निकाल साध्या बहुमताने होईल.

(आ) साधारण सभेंत तीनपंचमांश बहुमताने जे ठराव मान्य होतील त्यांस कोणत्याहि तऱ्हेने विरोध येईल असे ठराव सहा महिनेपर्यंत पुढें आणले जाऊं नयेत.

(इ) कोणताहि मान्य ठराव झाल्यापासून तीन महिने पूर्ण होण्याचा आंत त्या ठरावाला विरोधक असा दुसरा कोणताहि ठराव पुढे आणतां येणार नाही.

५२ पोटनियमः—परिषदेची कामें होण्याकरिता तिचे हेतु व नियम यांना अविरोधी असे पोटनियम कार्यकारी मंडळाने व नियामक मंडळाने जरूर वाटल्यास करावे; मात्र त्यांना परिषदेच्या पुढील साधारण सभेची संमति घेतली पाहिजे.

५३ प्रकाशनः—(अ) परिषदेने जे निबंध, लेख, पुस्तकें यांस इनाम दिलें असेल किंवा त्यांच्या प्रकाशनाचा खर्च केला असेल, त्यांची निदान एकेक प्रत सभासदास सवलतीच्या दराने मिळावी. हे दर कार्यकारी मंडळ ठरवील.

(आ) परिषदेच्या प्रत्येक सभासदास साहित्यपत्रिकेची एक प्रत फुकट पाठविण्यांत येईल.

५४ सभासदांची रिकामी जागा भरणें:—कार्यकारी मंडळ, नियामक मंडळ अथवा कोणतीहि समिति यांतील सभासदांची जागा कोणत्याहि कारणाने रिकामी असल्यास त्या मंडळाला किंवा समितीला बहुमताने परिषदेच्या सभासदांतून निवड करून ती भरतां येईल.

५५ मंडळांतील सभासदत्व रद्द करणें:—योग्य कारण न कळवितां नियामक मंडळ, कार्यकारी मंडळ व कोणतीहि पोटसमिति यांच्या तीन सभांस लागोपाठ अनुपस्थित राहणाऱ्या सभासदांचें त्या त्या समितीचें सभासदत्व रद्द झालें असें समजण्यांत यावें.

———

महाराष्ट्र साहित्य परिषद्

१९४७–४८ चें इतिवृत्त

वर्ष अखेर समासदांची संख्या एकूण १४३६ आहे. त्यापैकी १०९१ साधारण समासद असून उपकर्ते २, आश्रयदाते ५, साहाय्यक ४, हितचिंतक २२, तहहयात समासद ३१० अशी वर्गवारी आहे. परिषदेच्या निरनिराळ्या योजनांसाठी साधारण समासदांपैकी कांहींनीं उदार देणग्या दिल्यामुळे तहहयात समासदांच्या संख्येंत वाढ झालेली आहे. राजीनामे, यकबाकी वर्गणी व मृत्यु या कारणांमुळे यावर्षी बऱ्याच समासदांचीं नांवें कमी झाल्यामुळे एकंदर समासदांच्या संख्येंत थोडीच वाढ झालेली दिसेल. शाखासभा समासदांखेरीज करून बाकीदार समासदांची संख्या सुमारे १५० आहे.

आर्थिक परिस्थिति—सोबत जमाखर्चाचा तक्ता, पडताळा व ताळेबंद अशीं तीन पत्रकें जोडलीं आहेत. त्यांवरून परिषदेच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना समासदांस येईल.

स्वाध्याय मंडळ— परिषदेमार्फत होत असलेल्या परीक्षांना बसूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या वर्षीहि दरवर्षीप्रमाणे प्राज्ञ व विशारद या परिक्षांचे वर्ग चालू होते. प्रा. श्री. म. माटे, प्रा. गं. बा. सरदार, प्रा. श्री. रा. पारसनीस, डॉ. न. का. घारपुरे, प्रा. वा. दा. गोखले, प्रा. श्री. के. क्षीरसागर, श्री. गोपीनाथ तळवलकर, प्रा. गं. मा. निरंतर, श्री. म. दा. साठे, श्री. चंद्रकुमार डांगे, कु. सरोजिनी बाबर, श्री ह. श्री. शेणोलीकर श्री. द. के. बर्वे, प्रा. दु. का. संत, प्रा. अरविंद मंगरुळकर, प्रा. रा. शं. वाळिंबे, श्री. प्र. न. जोशी, यांनी या वर्गांकरिता नेमलेल्या पुस्तकांवर व्याख्यानें दिलीं.

संमेलन—मराठवाडा साहित्य परिषदेने बेळगांव येथील संमेलनांत दिलेल्या निमंत्रणान्वयें महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें ३१ वें अधिवेशन दक्षिण हैद्राबाद मुक्कामीं प्रा. न. र. फाटक यांचे अध्यक्षतेखालीं दि. २२-२३-२४ मे १९४७ रोजीं भरलें. संमेलनाची सर्व प्रकारची व्यवस्था स्वागत मंडळाने उत्तम रीतीने ठेवली होती. संमेलनाच्या प्रमुख कार्यक्रमाव्यतिरिक्त इतरहि वाङ्मयीन कार्यक्रम झाले. संमेलनांत संमत झालेल्या ठरावांपैकीं मराठवाड्यासंबंधींचा ठराव फार महत्त्वाचा होता व त्यासंबंधीं जी खटपट करावयाची त्यासाठी एक कृतिसमिति नेमली होती. म. सा. परिषदेनेंहि या कृतिसमितीच्या कार्याला साहाय्य करण्याचें ठरविलें होतें परंतु राजकीय परिस्थितीमुळे कृतिसमितीला विशेष कांही कार्य करतां आलें नाही. संमेलनप्रसंगीं ऐतिहासिक महत्त्वाचें असें प्रदर्शन कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने भरविलें होतें. करमणुकीसाठी काव्यगायन व नाट्यप्रयोग यांची योजना केली होती.

घटना—परिषदेची अद्ययावत् व पूर्ण घटना पत्रिकेच्या ८५ व्या अंकांत जोडली आहे.

स्मृतिदिन—परिषदेचे माजी अध्यक्ष कै. वा. म. जोशी यांच्या चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त रविवार दि. २०-७-४७ रोजीं विल्सन कॉलेज (मुंबई) मधील मराठीचे प्राध्यापक श्री. वा. ल. कुलकर्णी यांचें 'दोन महायुद्धांमधील मराठी वाङ्मय' या विषयावर व्याख्यान झालें,

गुरुवार दि. २७-११-४७ रोजीं महात्मा फुले स्मृतिदिनानिमित्त प्रा. गं. बा. सरदार यांचे 'महात्मा फुले व त्यांचे जीवितकार्य' या विषयावर व्याख्यान झालें. शनिवार दि. २९।११।४७ रोजीं कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांचा स्मृतिदिन इंदूरचे सुप्रसिद्ध राजकवि श्री. रा. अ. काळेले यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला.

व्याख्यानें—शुक्रवार दि. २०-६-४७ रोजीं डाक्का विद्यापीठांतील संस्कृताचे प्राध्यापक डॉ. सुशिलकुमार दे यांचे 'वंगीय वाङ्मय' या विषयावर व्याख्यान झालें. लंडन येथील प्राच्यविद्या संस्थेतील प्राध्यापिका मिस् लँबर्ट यांचे शनिवार दि. ९-८-४७ रोजीं 'प्राच्यविद्या संस्था व तिचें कार्य' या विषयावर मराठींत व्याख्यान झालें. रविवार दि. २४-८-४७ रोजीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल डॉ. दि. धों. कर्वे यांचे 'परमाणु आणि शक्त्युत्पादन' या विषयावर व्याख्यान झालें. शनिवार, रविवार व सोमवार दि. ४, ५, ६ आक्टोबर रोजीं तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचीं 'तर्कशास्त्र' या विषयावर व्याख्यानें झालीं. रविवार दि. २-११-४७ रोजीं प्रा. सखारामपंत आपटे यांचे 'डॉ. हर्षे-संपादित-ज्ञानदेवी-सिद्धनाथ प्रतीचा कालनिर्णय' या विषयावर व्याख्यान झालें.

व्याख्यानसत्र—कै. डॉ. माधवराव पटवर्धन स्मृतिदिनापासून परिषदेचें वार्षिक वाङ्मयसमालोचन व्याख्यानसत्र सुरू झालें. गेल्या वर्षांतील काव्य, कादंबरी, चरित्र, नाट्य, टीका, कोश, कथा आणि इतिहास या विषयांचीं समालोचनें झालीं. समालोचनप्रसंगीं अध्यक्ष व व्याख्याते वरील विषयानुक्रमाने खालीलप्रमाणें होते—अध्यक्ष—राजकवि रा. अ. काळेले, प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे, प्रा. श्री. म. माटे, श्री. गोविंदराव टेंबे, प्रा. म. गो. भाटे, प्रा. कृ. पां. कुळकर्णी, प्रा. श्री. के. क्षीरसागर, महामहोपाध्याय प्रा. द. वा. पोतदार. व्याख्याते—प्रा. म. ना. अदवंत, प्रा. गं. भा. निरंतर, प्रा. वि. बा. आंबेकर, प्रा. म. वि. फाटक, प्रा. रा. शं. वाळिंबे, श्री. चिं. ग. कर्वे, श्री. गोपीनाथ तळवलकर व श्री. ग. ह. खरे.

शाखासभा—नाशिक, सातारा, अहमदनगर, कोल्हापूर, नागपूर, सांगली, सोलापूर या ठिकाणी परिषदेच्या शाखा सभा आहेत व त्यांचें कार्य समाधानकारक रीत्या चालू आहे.

भेट व सत्कार—दि. ४।५।४७ रोजीं ११ व्या म. सा. संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. न. र. फाटक यांचा परिषदेतर्फे सत्कार करण्यांत आला. पुणें जिल्हाधिकारी व परिषदेचे एक सभासद श्री. स. गो. बर्वे, आय्. सी. एस्. यांनी बुधवार दि. ३०।७।४७ रोजीं परिषदेस भेट दिली. पुण्याचे नगराध्यक्ष श्रीमान् बाबूराव सणस यांनीहि परिषदेस भेट दिली. दोघांहि मान्यवरांचा परिषदेतर्फे सत्कार करण्यांत आला.

परिभाषा चर्चा मंडळ—या मंडळातर्फे विमाविषयक व श्री. बा. ग जगताप यांच्या नेतृत्वाखालीं शिक्षणशास्त्र-परिभाषा तयार करण्याचें कार्य सुरू आहे.

कार्यकारी मंडळ—कार्यकारी मंडळाच्या सहा सभा झाल्या. मंडळाने अनेकविध कार्यांसाठी नेमलेल्या उपसमित्या व मंडळ यांच्या परस्परसंबंधांचे अधिकार ठरविण्यांत आले. पत्रिकेच्या संपादकाच्या जागीं राजकवि य. दि. पेंढरकर यांची निवड करण्यांत आली. श्री. के. नारायण काळे यांच्या राजीनाम्यामुळे रिकाम्या झालेल्या जागेवर प्रा. श्री. रा. पारसनीस यांची निवड झाली. पुणें येथे मराठी माध्यम असलेलें स्वतंत्र नभोवाणी केंद्र स्थापन करावें

अशा अर्थाची केंद्रीय सरकारकडे विनंती करण्यांत आली. मुंबई विद्यापीठाकडे मराठीच्या अभ्यासक्रमाबद्दल महत्त्वाच्या सूचना पाठविण्यांत आल्या. पुणें येथे भरलेल्या गोमांतक साहित्य संमेलनांत मराठी हीच मुख्य भाषा व इतर उपभाषा अशा अर्थाचें अधिकृत मत परिषदेतर्फे मांडण्यांत आलें.

नियामक मंडळ—दि. ६।७।४७ रोजीं नियामक मंडळाची सभा अध्यक्ष प्रा. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. मंडळाचे उपाध्यक्ष श्री. ना. गो. चापेकर यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांचे जागीं म. म. प्रा. द. वा. पोतदार यांची एकमताने निवड झाली. मागील सभेचा वृत्तांत वाचून संमत करण्यांत आला व ३१ व्या सा. संमेलनांत संमत झालेल्या ठरावांच्या अंमलबजावणीचा विचार होऊन सभेचें काम संपलें.

साधारण सभा—परिषदेची वार्षिक साधारण सभा हैद्राबाद येथे संमेलनप्रसंगी म. म. प्रा. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. मागील सभेचें इतिवृत्त व नियामक मंडळाने मांडलेला जमाखर्च व अंदाजपत्रक संमत करण्यांत आलीं. मंडळाने शिफारस केलेला घटनाविषयक ठराव (घ. नि. ५३ आ) फेरतपासणीसाठी परत नियामक मंडळाकडे पाठविण्यांत यावा व तो पुढील वा. सभेपुढे ठेवण्यांत यावा अशा अर्थाचा ठराव संमत करण्यांत आला.

इतर कार्यक्रम—परिषदेने हाती घेतलेल्या कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर सभागृहाच्या मदतीसाठीं पुणें येथील उत्कर्ष मंडळाने दि. २०।८।४७ रोजीं लिमये नाट्य-चित्र मंदिरांत संगीत 'एकच प्याला' या नाटकाचा प्रयोग केला व प्रयोगाला झालेलें उत्पन्न चिपळूणकर स्मारक समितीच्या हवालीं केलें. गोमंतक साहित्य संमेलनप्रसंगीं पुण्यास आलेल्या गोमंतकांतील प्रतिनिधींचा परिषदेमार्फत सत्कार करण्यांत आला.

दुखवटा-सभा-ठराव—रविवार दि. २६ आक्टोबर रोजीं कै. तात्यासाहेब केळकर यांच्या दुखवट्याची सभा परिषदेचे अध्यक्ष प्रा. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखाली भरून दुःख व्यक्त करण्यांत आलें. त्याचप्रमाणे परिषदेच्या कार्यकारी मंडळाने पुढील परिषदेचे सभासद व साहित्यभक्त यांच्या निधनानिमित्त दुखवटा ठराव संमत केले—महात्मा गांधी, कै. कविवर्य बी ऊर्फ ना. मु. गुप्ते, कै. ल. ना. जोशी, कै. प्रि. वि. के. भागवत, कै. राजेसाहेब श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धन जमखंडी, कै. प्रा. ग. ह. केळकर, कै. अं. गो. पुणतांबेकर, कै. ना. वि. कुलकर्णी, कै. ले. क. अ. बा. गजेंद्रगडकर, कै. वि. ल. बर्वे, कै. श्री. काशीबाई कानिटकर, कै. बाबुराव साळवेकर.

महाराष्ट्र साहित्यपत्रिका—वृत्तांतावधींत राजकवि श्री. य. दि. पेंढरकर यांच्या संपादकत्वाखाली पत्रिकेच्या २० व्या वर्षाचे तीन अंक निघाले. पत्रिकेला परतभेट म्हणून पुढील नियतकालिकें येत असतात.

मासिकें—१ विशाल भारत–(हिंदी), २ किर्लोस्कर, ३ स्त्री, ४ मनोहर, ५ सह्याद्रि, ६ यशवंत, ७ चित्रमय जगत्, ८ ध्रुव, ९ व्यायाम, १० पुरुषार्थ, ११ महाराष्ट्र विस्तार, १२ वाङ्मयशोभा, १३ वऱ्हाड शालापत्रक, १४ अभिरुचि, १५ युगवाणी, १६ सत्यकथा, १७ नवजीवन, १८ कुमार, १९ राष्ट्रवाणी, (हिंदी)२० रोहिणी, २१ वसंत, २२ गोवर्धन, २३ पराग, २४ महात्मा, २५ प्रसाद, २६ नवभारत, २७ पूजा, २८ प्रेमबोध, २९ प्रतिभा, ३० महाराष्ट्र, ३१ शिवप्रसाद.

त्रैमासिकें—१ भारत इतिहाससंशोधक त्रैमासिक, २ Bulletin of the Deccan College Post Graduate Research Institute, Poona. ३ नागरी प्रचारिणी पत्रिका.

द्वैमासिकें—साहित्य.

साप्ताहिकें—१ नवयुग, २ धनुर्धारी, ३ मौज, ४ भवितव्य, ५ लोकयुग, ६ नवा मनु, ७ समाधान, ८ युगांतर, ९ प्रकाश, १० राष्ट्रमत, ११ लोकमत, १२ अर्थ, १३ महाराष्ट्र.

द्विसाप्ताहिकें—केसरी.

दैनिकें—१ ज्ञानप्रकाश, २ सकाळ, ३ लोकशक्ति, ४ समाचार, ५ प्रभात, मुंबई ६ जयहिंद, ७ तरुण भारत.

परीक्षा—१९४७ मधील परीक्षांना पुढीलप्रमाणे उमेदवार बसले व उत्तीर्ण झाले.

		पैकी	उत्तीर्ण	
आचार्य	७	,,	,,	०
विशारद	११४	,,	,,	४८
प्राज्ञ	५७४	,,	,,	२३६
प्रवेश	५७८	,,	,,	३३०
प्रथमा	६४७	,,	,,	३९२

कैं. वा. गो. आपटे (आनंदकर्ते) ट्रस्टमधून निरनिराळ्या परीक्षांत पहिल्या क्रमांकाला उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना पारितोषिकें देण्यासाठी रु. १०० ची रक्कम आपटे ट्रस्टकडून आली. तींतून पुढीलप्रमाणें पारितोषिकें देण्यांत आलीं.

विशारद—	श्री. मो. वि. डोंगरे	(वर्धा केंद्र)	रु. ४०
प्राज्ञ—	,, म. रा. खाडिलकर	(पुणें केंद्र)	रु. ३०
प्रवेश—	,, का. पु. जोशी	(पारोळें केंद्र)	रु. १५
प्रथमा—	,, अ. रा. देव	(पुणें केंद्र)	रु. १५

परीक्षांच्या बाबतींत कै. वा. गो. आपटे ट्रस्टने उमेदवारांस जें प्रोत्साहन दिलें त्याबद्दल परिषद् त्यांची ऋणी आहे.

परीक्षा केंद्रें १९४७

क्रमांक	केंद्राचें नांव	परीक्षेचें ठिकाण	केंद्राधिकाऱ्याचें नांव
१	मुंबई	सरस्वती गर्ल्स् स्कूल	कु. पिरोज आनंदकर
२	परळ	आर. एम्. भट हायस्कूल	प्रि. मो. वा. दोंदे
३	दादर	ज. ए. इ. गर्ल्स् हायस्कूल	श्री. स. ह. कुलकर्णी (साधना)
४	बांद्रा	म्युनिसिपल हायस्कूल	श्री. ग. य. कुलकर्णी
५	पुणें	नूतन मराठी विद्यालय	प्रा. ब. वें. बापट
६	पुणें	रास्तापेठ ए. सो. हायस्कूल	श्री. डी. पी. अत्रे.
७	जुन्नर	न्यू इंग्लिश स्कूल	श्री. वि. रा. नगरकर

क्रमांक	केंद्राचें नांव	परीक्षेचें ठिकाण	केंद्राधिकाऱ्याचें नांव
८	सातारा	न्यू इंग्लिश स्कूल	प्रा. ना. वि. वैद्य
९	अष्टे	इंग्लिश हायस्कूल	श्री. ग. त्रिं. जोशी
१०	कऱ्हाड	श्री शिवाजी विद्यालय	श्री. वि. गं. सप्रे
११	किर्लोस्करवाडी	किर्लोस्कर हायस्कूल	श्री. के. रा. जोशी
१२	तासगांव	हायस्कूल	श्री. कृ. गं. मराठे
१३	इस्लामपूर	हायस्कूल	श्री. र. वि. कुलकर्णी
१४	अहमदनगर	सोसायटी हायस्कूल	श्री. शं. ना. आंबेकर
१५	नाशिक	पेठे हायस्कूल	श्री. मो. वि. जोशी
१६	येवलें	म्युनिसिपल हायस्कूल	श्री. का. बा. कसरेकर
१७	सटाणा	मराठा हायस्कूल	श्री. ना. आ. पगार
१८	मनमाड	जी. आय्. पी. इं. हायस्कूल	प्रि. द. वि. केतकर
१९	जळगांव	न्यू. इं. स्कूल	श्री. मनुभाई देसाई
२०	जळगांव	वु. ट्रे. कॉलेज	प्रि. स. वि. पैसास
२१	बामणोद	प्रा. शि. मं. दुय्यम शाळा	श्री. भि. जी. बोंडे
२२	भुसावळ	द. शि. हायस्कूल	श्री. त्र्यं. दा. काळवीट
२३	सांगवी बु॥	प्रायमरी स्कूल	श्री. ह. मो. बोखले
२४	फैजपूर	म्युनिसिपल हायस्कूल	श्री. आर. पी. चौधरी
२५	मालोद	न्यू. इं. स्कूल	श्री. मा. मो. पाटील
२६	असोदा	न्यू. इं. स्कूल	श्री. ल. ह. भाकरे
२७	पारोळें	हायस्कूल	श्री. मो. रा. कुलकर्णी
२८	आमोदें	मराठी शाळा	श्री. गो. चिं. चौधरी
२९	धोरगव्हाण	डी. एस्. डी. हायस्कूल	श्री. मा. वा. काकडे
३०	अंमळनेर	प्रताप कॉलेज	प्रा. म. वि. फाटक
३१	धरणगांव	पी. आर. हायस्कूल	श्री. मा. रं. बोपर्डीकर
३२	रावेर	सरदार जी. जी. हायस्कूल	श्री. द. त्र्यं. कुलकर्णी
३३	शिर्डी	धी रूरल ए. सो. स्कूल	श्री. हि. रू. चौधरी
३४	चाळीसगांव	प्रा. अ. विद्यालय	प्राचार्य ल. नी. छापेकर
३५	न्हावी	भारत विद्यालय	श्री. दि. के. पाटील
३६	वरणगांव	नूतन विद्या मंदिर	श्री. म. श्री. भंडारी
३७	सावदा	आ. गं. हायस्कूल	श्री. स. मि. बारके
३८	धानोरे	मराठी शाळा	श्री. भुधो धना कोळी
३९	धुळें	आ. प्रा. ट्रे. कॉलेज	प्रि. ह. रा. बागवे
४०	शहादें	न्यू. इं. स्कूल	श्री. का. गं. गलगले
४१	नंदूरबार	म्युनिसिपल हायस्कूल	श्री. शं. रा. जोशी
४२	तळोदें	के. डी. हायस्कूल	श्री. शं. का. घाटे
४३	भिवंडी	प. रा. हायस्कूल	श्री. ग. र. केळकर
४४	सोलापूर	ह. दे. हायस्कूल	श्री. कृ. ना. पिले

क्रमांक	केंद्राचें नांव	परीक्षेचें ठिकाण	केंद्राधिकाऱ्याचें नांव
४५	पंढरपूर	व्ही. जे. हायस्कूल	श्री. गो. गो. नेने
४६	कुर्डूवाडी	लो. मु. शाळा	श्री. चिं. पां कुलकर्णी
४७	बार्शी	सि. ज्यु. हायस्कूल	श्री. श. शि. धनशेटी
४८	बार्शी	मॉडेल हायस्कूल	श्री. शी. वा. कुर्लेकर
४९	ठाणें	ज. ए. इ. हायस्कूल	श्री. नी. त्र्यं. केळकर
५०	कल्याण	ज. ए. इ. हायस्कूल	श्री. म. गं. चोळकर
५१	अंबरनाथ	इंग्रजी शाळा	श्री. नी. अ. कोर्डे
५२	कर्जत	अभिनव ज्ञानमंदिर	श्री. ना. वा. कोडीलकर
५३	मालवण	लक्ष्मीबाई टोपीवाला स्कूल	श्री. वि. अ. आजगांवकर
५४	रत्नागिरी	महिला विद्यालय	श्री. कृ. वा. मोडक
५५	वेंगुर्लें	श्रीमंगेश विद्यालय	श्री. नी के कोटणीस
५६	देवरूख	न्यू इं. स्कूल	श्री. प्र. ना. जोशी
५७	महाड	को. ए. सो. हायस्कूल	श्री. वि. भि. चांदे
५८	पनवेल	ट्रेनिंग कॉलेज	प्रि. नी. शं. नवरे
५९	अलिबाग	चित्रे हॉल	श्री. प्र. कृ. केळकर
६०	बेळगांव	वाङ्मय चर्चामंडळ	श्री. बा. रं. सुंठणकर
६१	रामदुर्ग	स्टेट हायस्कूल	श्री. गो. द. किणीकर
६२	नागपूर	सिटी कॉलेज	प्रा. पां. कृ. सावळापूरकर
६३	जबलपूर	महाराष्ट्र विद्यालय	श्री. न. गो. ओक
६४	एलिचपूर	कन्याशाळा	श्री. न. पु. पागी
६५	वर्धा	स्वावलंबी विद्यालय	श्री. बलराम बनमाली
६६	अमरावती	श्रीरामकृष्ण विद्यालय	श्री. पु. रा. पारनेरकर
६७	वाशिम	राजस्थान आर्यन कॉलेज	प्रि. वि. प्र. मोहगांवकर
६८	अकोला	सीताबाई आर्टस् कॉलेज	प्रि. ग. द. जोशी
६९	शिंदी	आयू. इ. एम्. स्कूल	श्री. ने. वि. फुर्सुले
७०	नांदेड	प्रतिमा निकेतन	श्री. ग. ना. आंबेकर
७१	अंबेजोगाई	योगेश्वरी नूतन विद्यालय	श्री. ए. मा. कुलकर्णी
७२	उंबरगें	हायस्कूल	श्री. श्री. ल. देशमुख
७३	उमरी	नूतन विद्यालय	श्री. विश्वनाथ महाराज
७४	शांतिसदन	अनंत विद्यालय	श्री. व्यंकटराव पटवारी
७५	सेलू	नूतन विद्यालय	श्री. सो. ना. कुलकर्णी
७६	निपाणी	म्युनिसिपल हायस्कूल	श्री. बा. रा. कुलकर्णी
७७	सांगली	ट्रेनिंग कॉलेज	प्रि. ग. गो. बाटवे
७८	कोल्हापूर	राजाराम हायस्कूल	श्री. ल. दे. सुर्वे
७९	इंदूर	म. सा. सभा भुवन	श्री. ब. वी. वावीकर
८०	ग्वाल्हेर	पार्वतीबाई इंटर कॉलेज	श्री. श्री. गो. कुंटे
८१	बडोदें	म. वि. हायस्कूल	श्री. ना. म. पटवर्धन

पुढील सद्‌गृहस्थांनी परीक्षक म्हणून काम केलें:—

प्रा. श्री. म. माटे, प्रा. श्री. रा. पारसनीस, प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे, प्रा. वि. भि. कोलते, प्रा. रा. कृ. लागू, प्रा. कृ. पां. कुलकर्णी, श्री. गो. कृ. मोडक, डॉ. के. ना. वाटवे, प्रा. रा. श्री. जोग, प्रा. न. र. फाटक, प्रा. गं. बा. सरदार, प्रा. म. वि. फाटक, डॉ. न. का. घारपुरे, प्रा. गं. भा. निरंतर, श्री. बा. रा. ढवळे, श्री. चिं. ग. कर्वे, प्रा. शं. के. कानेटकर, डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. ग. वा. तगारे, प्रा. श्री. के. क्षीरसागर, प्रा. रा. शं. वाळिंबे, प्रा. म. ना. अदवंत, श्री. म. दा. साठे, प्रा. ज. के. रानडे, प्रा. श्री. र. भिडे, प्रा. द. ल. माजरेकर, प्रा. वि. म. कुलकर्णी, श्री. ह. श्री. शेणोलीकर, प्रा. सौ. सरोज शेंडे, श्री. वा. शि. आपटे, प्रा. अ. ना. देशपांडे, श्री. वि. अ. कुलकर्णी, प्रा. शं. गो. वाळिंबे, श्री. बा. वा. देवधर, श्री. ह. स. गोखले, श्री. व. बा. मगेरीकर, श्री. द. के. बर्वे, श्री. चंद्रकुमार डांगे, श्री. रा. पु. सगदेव, सौ. सुलभा घारपुरे.

परिषदेच्या कार्यांत अनेकांचें अनेक तऱ्हेने साहाय्य होत आहे त्याबद्दल सर्वांची परिषद ऋणी आहे.

वा. दा. गोखले
गं. भा. निरंतर
चिटणीस.

महाराष्ट्र साहित्य परिषद्

अंदाजपत्रक १९४८–१९४९

जमा

खात्याचें नांव	
१. ट्रस्टीकडून येणारें व्याज	१०००–०–०
२. वर्गणी साधारण सभासद	३०००–०–०
३. वर्गणी पत्रिका	२००–०–०
४. वर्गणी संलग्न संस्था	८१–०–०
५. ग्रंथ विक्री	१०००–०–०
६. परीक्षा शुल्क	७०००–०–०
७. मा. प. सा. मंदिर	१५०–०–०
८. जाहिरात खातें	४०–०–०
९. व्याज व इतर	४०–०–०
१०. संमेलन देणगी	२००–०–०
	१२७११–०–०
(–) तूट	३४०१–०–०
	१६११२–०–०

खर्च

खात्याचें नांव	
१. कचेरी खातें	
अ. पगार	२५८२– ०–०
ब. बीज	१००– ०–०
क. भुईभाडें	१५– ०–०
ड. म्यु. कर	३७–१०–०
इ. प्रॉपर्टी टॅक्स	२७– ६–०
ई. कार्यालय छपाई	३००– ०–०
फ. टपाल	२००– ०–०
ग. सादिल	१००– ०–०
ह. आतिथ्य	२००– ०–०
ळ. उपसमिति	५०– ०–०
क्ष. किरकोळ	३००– ०–०
ज्ञ. ठराव अं. बजावणी	५०– ०–०
२. कार्यकारी, नियामक, सभा	२००–०–०
३. पत्रिका	३०००–०–०
४. इमारत दुरुस्ती	१००–०–०
५. प्रचार	५००–०–०
६. नवीन सामान	२००–०–०
७. निवडणूक	७००–०–०
८. परीक्षा खातें	४०००–०–०
९. शाखा सभा	३५०–०–०
१०. प्रवास	५००–०–०
११. प्रकाशन	२०००–०–०
१२. घसारा	६००–०–०
एकूण खर्च	१६११२–०–०

महाराष्ट्र साहित्य परिषद्

१ एप्रिल १९४७ ते ३१ मार्च १९४८ पर्यंतचा

जमाखर्च

खातें		जमा
ट्रस्टींकडील व्याज		९००–०–०
वर्गणी खातें		२४९५–८–०
सा. स. वर्गणी	२२३४-८-०	
पत्रिका व.	२२०-८-०	
स. संस्था	४०-८-०	
	२४९५-८-०	
ग्रंथविक्री		११०–८–०
परीक्षा शुल्क		७५१८–९–०
मा. प. सा. मं. देणगी		१६०–०–०
जाहिरात खातें		८०–०–०
व्याज व इतर		११३–२–२
संमेलन देणगी		०–०–०
एकूण जमा		११४५७–११–२
तूट		९४४–९–१०
एकूण		१२४०२–५–०

खातें		खर्च
कचेरी खातें—		३२९८-१२-३
पगार	२१३८-१४-०	
वीज	८५–४–६	
भुईभाडें	१५–०–०	
म्यु. कर	३७-१० ०	
जिंदगी कर	२७–६–०	
का. छपाई	२६०-११-०	
का. टपाल	१४९-१५ ०	
सादील	९६-११-३	
आतिथ्य	१४९–२–६	
उपसमिति	३१–८–०	
किरकोळ	३०६-१०-०	
	३२९८-१२-३	
कार्य. नियां. सभा खर्च		१८०-११-६
पत्रिका (ट. सह)		३०११-१०-९
इमारत दुरुस्ती		२२–८–०
प्रचार		३७४–७–०
निवडणूक		१०१-१५-०
परीक्षा खातें		४२७६–२–६
शाखा सभा हिस्सा		२६१–८–०
प्रवास		२७४-१०-०
घसारा		६००–०–०
एकूण खर्च		१२४०२–५–०

तपासलें. बरोबर आहे.

(सही) जी. एम्. ओक आणि कंपनी,

रजिस्टर्ड अकौंटंट्स्.

महाराष्ट्र साहित्य

१९४७–४८

	निधि व देणें	
१२४६६–३–६	सामान्य निधि	
	१९४६–४७ अखेर	१३४१०-१३-४
	१९४७–४८ तूट	९४४-९-१०
		१२४६६–३–६
२३९३८–२–०	इमारत निधि	
१९१२–२–६	ग्रंथ संग्र. खातें	
	१९४६–४७ अखेर	१२७३–२–०
	१९४७–४८ त. स.	
	वर्गणी/ग्रं. सं.	२९८–०–६
	समितीकडून	३४१–०–०
		१९१२–२–६
१९६६–०–०	इतिहास योजना	
	१९४७–४८ अखेर	२००१–०–०
	खर्च	३५–०–०
		१९६६–०–०
१०९५४-१२-०	चिपळूणकर स्मारक समिति	
१३८०–८–०	अनामत खातें :	
	ग. शं. देव	५–०–०
	नागपूर शाखा	२४-१२-०
	शाखा सभा	१४५–०–०
	सा. स. व. (१९४८)	४५-१२-०
	केळकर स्मारक	१०१–०–०
	चिपळूणकर ,,	१६–०–०
	प्रा. फंड	५-१०-०
	सं. म. समितीकडून	४३७–६–०
	घसारा	६००–०–०
		१३८०–८–०
५२६१७-१२-०		

परिषद्, पुणें

(मार्चअखेर) ताळेबंद

	जिंदगी व येणें	
२९२०२-५-६	इमारत	
१४५८-८-९	कार्यालय सामान	
	१९४६-४७	१०२४-८-९
	१९४७-४८	४३४-०-०
		१४५८-८-९
६८८-०-०	मा. प. सा. मंदिर सामान	
१९७५-८-०	ग्रंथ खरेदी	
	१९४६-४७	८८७-६-९
	१९४७-४८	१०८८-१-३
		१९७५-८-०
१४८८-६-९	ट्रस्टी	
१२७२-०-०	ग्रंथ संग्रहालय	
१२०००-०-०	डे. ए. सोसायटीकडे प्रॉ. नोट	
४५३२-१५-०	शिल्लक	
	बँक	४१६५-९-३
	रोख	३६७-५-९
		४५३२-१५-०
५२६१७-१२-०	एकूण	

आम्ही " महाराष्ट्र साहित्य परिषद् " पुणें या संस्थेचा ३१ मार्च १९४८ अखेरचा ताळेबंद व ते दिवशीं संपणाऱ्या वर्षाचें आवक खर्च पत्रक तपासलें. परिषदेच्या हिशेबाच्या पुस्तकावरून व आम्हास मिळालेल्या माहिती व खुलाशावरून सदरहू ताळेबंद परिषदेची खरोखर वस्तुस्थिति दर्शवीत आहे. सदरहू ताळेबंदामध्ये परिषदेच्या ट्रस्टची जिंदगी व त्याचे हिशेब यांचा समावेश केलेला नाही.

(सही) जी. एम्. ओक आणि कं.
रजिस्टर्ड अकौंटंट्स्.

महाराष्ट्र-साहित्य-परिषद्, पुणें

१९४७–१९४८ जमाखर्चाचा अंदाजपत्रकाशीं पडताळा

जमा

खातें	अंदाजपत्रक १९४७–१९४८	प्रत्यक्ष १९४७–१९४८		अंतर १९४७–१९४८
ट्रस्टी व्याज	१०००–०–०	९००–०–०	–	१००–०–०
वर्गणी खातें	३५८१–०–०	२४९५–८–०	–	१०८५–८–०
ग्रंथविक्री	१०००–०–०	११०–८–०	–	८८९–८–०
परीक्षा शुल्क	७०००–०–०	७५९८–९–०	+	५९८–९–०
मा. प. सा. मंदिर	१५०–०–०	१६०–०–०	+	१०–०–०
जाहिरात	४०–०–०	८०–०–०	+	४०–०–०
व्याज	४०–०–०	११३–२–२	+	७३–२–२
संमेलन देणगी	२००–०–०	०–०–०	–	२००–०–०

खर्च

खातें	अंदाजपत्रक १९४७–१९४८	प्रत्यक्ष १९४७–१९४८		अंतर १९४७–१९४८
कचेरी खातें	३४०२-१०-०	३२९८-१२-३	–	१०३-१३-९
कार्यकारी, नियामक	२००–०–०	१८०-११-६	–	१९–४–६
पत्रिका	३०००–०–०	३०११-१० ९	+	११-१०-९
इमारत दुरुस्ती	१००–०–०	२२–८–०	–	७७–८–०
प्रचार	५००–०–०	३७४–७–०	–	१२५–९–०
निवडणूक	२००–०–०	१०१-१५-०	–	९८–१–०
परीक्षा	४०००–०–०	४४४६–२–६	+	४४६–२–६
शाखासभा	३५०–०–०	२६१–८–०	–	८८–८–०
प्रवास	५००–०–०	२७४-१० ०	-	२२५–६–०
प्रकाशन	२०००–०–०	....	–	२०००–०–०
घसारा	६००–०–०	६००–०–०	–	....
नवीन सामान	२००–०–०	२६४–०–०	+	६४–०–०

साभार स्वीकार

१ गीतगुंजारव (कवितासंग्रह)—कवि कुंजविहारी; प्रका० गीतगुंजारव मंडळ, सोलापूर, मूल्य रुपये तीन

२ मायबोलीची कहाणी—ले० प्रा. ना. गो. नांदापूरकर; प्रका० कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणें, मूल्य दीड रुपया.

३ प्रेमघोटाळा (सामाजिक कादंबरी)—ले० वि. द. चिंदरकर प्रका—नीलिमा प्रकाशन. मुंबई ४, मूल्य सव्वा रुपाया.

४ शिवशाहीची पहाट (ऐतिहासिक कादंबरी) ले० वि. वा. हडप, प्रका० स्वाधीन साहित्य संस्था, पुणें २, मूल्य तीन रुपये.

५ दिव्यावरती अंधेर (कथासंग्रह) ले० अनंत काणेकर; प्रका० स्वाधीन साहित्य संस्था, पुणें २, मूल्य पावणे दोन रुपये.

६ रा. ब. काने आणि गोविंदराव साने (पत्रसंग्रह)—ले० व. प्रका० ग. र. इनामदार; मूल्य अडीच रुपये.

७ संयुक्त महाराष्ट्रांतील बेळगांव जिल्हा—ले० मा. न. नरगुंदकर; प्रका० सरचिटणीस म. एकि. समिति, बेळगांव; मूल्य चार आणे.

८ पद्मपराग (कवितासंग्रह)—कवि व प्रका० गं. दा. सगरे, मूल्य दोन रुपये.

९–१० विवाहितांचे नंदनवन (आवृत्ति चवथी) मूल्य सव्वातीन रुपये. आणि वैयक्तिक जीवन—ले० वा. वि. जोशी; प्रका० कृ. वा. मराठे, बडोदे; मूल्य चार रुपये.

११–१३ अंजनी (बाळगाणी) मूल्य सव्वा रुपया. क्रांतिपुरुष व क्रांतिमहिला—मूल्य प्रत्येकी चार आणे. संपा० व प्रका० पां. श्री. टिल्लू, मुंबई २.

१४ ज्ञान आणि विज्ञान ले० रमातनय; प्रका० आर्यसंस्कृती मुद्रणालय, पुणें २; मूल्य एक रुपाया.

१५ बंद पडलेले घड्याळ (कथासंग्रह) ले० व प्रका० व. र. पंडित, गुजरी, कोल्हापूर; मूल्य दीड रुपया.

१६ परिवर्तन (व्यायामविषयक संवाद)-ले० व प्रका० श्री. ज. बारट, धारवाड; मूल्य पाच आणे.

१७ महाराष्ट्राचा पोवाडा—ले० व प्रका० बा. बा. कारेकर, कोल्हापूर; मूल्य दोन आणे.

१८ रेडिओ (हिंदी पुस्तक)—ले० रा. र. खाडिलकर; प्रका० नागरी प्रचारिणी सभा, काशी; मूल्य बारा आणे.

१९ सनातनांचे धर्मबुडवे—ले० ग. रा. परांजपे; प्रका० आर्यसंस्कृति मुद्रणालय, पुणें २; मूल्य बारा आणे.

२० एकतारी कीर्तनें—ले० अज्ञात प्रकाशिका—रुक्मिणीबाई जहागिरदार, महावीर बिल्डिंग, मुंबई १९; मूल्य दीड रुपया.

२१ हिंगणें दप्तर (दुसरा खंड) मा. इ. सं. मंडळ, पुणें २;मूल्य तीन रुपये.

२२ हिंदुस्थानच्या धार्मिक इतिहासाचें सामान्य निरीक्षण—ले० डॉ. शं. दा. पेंडसे; प्रका० नागपूर विद्यापीठ, नागपूर.

२३ कांचन (कादंबरी)—ले० माधव कामत; प्रका० निर्मल प्रकाशन, कोल्हापूर; मूल्य सव्वा दोन रुपये

२४ Library Development Plan-By S. R Ranganathan; Published by Aundh Publishing Trust Ltd., Poona 1; Price Rs. Three.

२५ सौभाग्य लक्ष्मी (नाटक) ले० स. अ. शुक्ल; प्रका० के. भि. ढवळे; मुंबई ४; मूल्य दोन रुपये.

२६ सुबोधन आणि धर्मचिंतन (श्री. वा. अ. गरूड यांची प्रवचनें)-संपा० वि. ग. कर्वे; प्रका० आर्यसंस्कृति मुद्रणालय, पुणें २; मूल्य दीड रुपया.

२७–२८ महात्मा गांधी—ले० पां. श्री. टिल्लू, मूल्य सहा आणे. बापू गेले, पांडुरंग बोराटे, शिरीषकुमार (पोवाडे) प्रका० ललिता प्रकाशन मुंबई २; मूल्य चार आणे.

मुद्रक — लक्ष्मण नारायण चापेकर, 'आर्यसंस्कृति मुद्रणालय,' १९८/१७ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २.

प्रकाशकः — रामचंद्र श्रीपाद जोग, महाराष्ट्र-साहित्य-परिषद्, टिळक रस्ता, पुणें २.

अनुक्रमणिका